मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

अनुक्रमणिका

युगवाणी
१९८६

'महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृति मंडळ' पुरस्कृत विदर्भ साहित्य संघाचे मुखपत्र

या मासिकाला वापरलेला कागद हा महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याने उपलब्ध करून दिलेला सवलतीच्या दरातील कागद आहे.

जून–जुलै १९७६

ज्येष्ठ–आषाढ शके १८९८

संपादक : मधुकर आष्टीकर

कार्यकारी संपादक : वि. भा. प्रभुदेसाई


४५०–४७०) याच्या काली घडून आली ...ी. पण नंतर त्याचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याने ...ना विदर्भातून पिटाळून लावले एवढेच नव्हे तर ...ची बस्तर जिल्ह्यातील राजधानी पुष्करी हीही ...उध्वस्त केली ...पे कोरीव लेखांच्या पुराव्यावरून

मूल्य तीन रुपये

वर्ष ३२ अंक ३–४

संपादकीय

बहुरूपी 'बाबा'



व्यंकटेश शंकर वकील २८ मे १९७६ रोजी निवर्तले. हे मूळ वर्ध्याचे. पण त्यांनी उत्तर आयुष्य घालविलं ते मुंबईत. वृत्तीने भटका आणि कलंदर कलावंत. मास्तर, कारकून, लेखक, प्रचारक, अनुवादक आणि संपादक, असल्या विविध रूपात त्यांनी नाव गाजवलं. समाजाच्या सगळ्या स्तरातून हा कलावंत वावरला; सगळ्यात मिसळला; सगळे अनुभव जगला. ह्याच अनुभवाचं देणं सरस्वतीला वाङ्मयीन लेणं म्हणून चढविलं त्यानं. उपजीविकेचं साधन म्हणून साहित्यनिर्मिती केली त्यानं. विकेल तो वाङ्मयप्रकार हाताळला त्यानं. पण म्हणून बिगार नाही भरली कधी. अनुभूतीसमृद्ध वाङ्मय जीवननिरपेक्षपणे नाही रंगवलं कधी. इमान राखलं काव्यसौंदर्याशी आणि जीवनाच्या गडद वास्तवतेशी.

पण नाव मिळालं नाही ह्या साहित्यिकाला मिळावं तेवढं. अनास्था, लेखकाची स्वतःबद्दल; आणि उपेक्षा, समाजाची त्याच्या वाङ्मयाबद्दल, अशा दुधारी शस्त्रामुळं 'प्रसिद्धी' 'कतलेआम' झाली! शेकडोंनी विविध वाङ्मय प्रकार हाताळणाऱ्याचे नावही फारसे ठाऊक नसावे कुणाला! फारशा कलाकृतीही अगदी शोधूनसुद्धा सापडू नयेत बहुतांश ग्रंथालयात – असे अभागी की लापत्ता साहित्यिक म्हणावं वकीलांना?

सुप्रसिद्ध साहित्यिक, काकासाहेब कालेलकरांनी वकीलांना बहुरूपी म्हटलं आहे. ते यथार्थच होय. विदर्भातील त्यांच्या साहित्यिक मित्रांत ते 'बाबा' म्हणून परिचित होते.

समाजाचेहि, साहित्यसंस्थांच्या द्वारा काही कर्तव्य असावे. विदर्भातील सामान्य आळस आणि उपेक्षावृत्ती, ह्या पायी इथल्या बऱ्हंश साहित्यिकांचे वाङ्मय दुष्प्राप्य होण्याचाच संभव अधिक. तेव्हा साहित्य-संस्थांनी वैदर्भीय लेखकांचे वाङ्मय जतन करण्याची काही पद्धतशीर योजना आखावी. भविष्यकाळात ह्या वाङ्मयाच्या अभ्यासाची कुणाला गरज वाटल्यास तो निकड भागावी.

त्यांच्या दुःखद निधनाबद्दल मी व्यक्तिशः व विदर्भ साहित्य संघातर्फे, हार्दिक शोकसंवेदना व्यक्त करतो.

—संपादक

अनुक्रमणिका

संपादक - मंडळ : डॉ. वि. बा. प्रभुदेसाई, डॉ. सुरेश डोळके, प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. म. शं. वावगावकर, प्रा. भी. रा. जहागीरदार, प्रा. यशवंत मनोहर.

निवड–उपसमित्यांचे सदस्य

कविता : प्रा. श्रीधर शनवारे, प्रा. यशवंत मनोहर, प्रा. या. मु. पाठक, प्रा. सौ. उषा लिमये, **समीक्षा व** भ. श्री. पंडित, प्रा. श्री. मा. कुळकर्णी, प्रा. भा. श्री. परांजपे, श म. डोळके, डॉ. ना. कृ. शनवारे, प्रा. म रा. जोशी, प्रा. म. ना. लोही, [सुधारित किंॉ. सौ. शकुंतला खोत, प्रा. तारा शास्त्री, प्रा. भी. रा. जहागीरदार

पुस्तके

१. कै. हरिभाऊ नेने यांचा संशोधन लेख

एकोणीस कवी–सव्वीस कविता

तीन लेख

एक व्यक्तिचित्र

चार कथा

एक ग्रंथ समीक्षण

एक श्रद्धांजली

रसिक पत्रे

अनुक्रमणिका

विश्रुतचरितातील 'वानवास्य' कोण?

वा. वि. मिराशी

'युगवाणी'च्या एप्रिल–मे १९७६ च्या जोड अंकात डॉ के. रा. जोशी यांचा 'दशकुमार–चरिततील वानवास्य' या शीर्षकाचा संशोधन–लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यातील सत्यासत्यता उपलब्ध पुराव्याच्या कसोटीवर पारखून पाहणे इष्ट आहे.

गेल्या अर्धशतकात विदर्भाच्या प्राचीन काळच्या वाकाटक राजवंशाविषयी पुष्कळच माहिती उपलब्ध झाली आहे. त्यांतील बहुतांश आमच्या परिश्रमामुळे प्राप्त झाली आहे हे त्या इतिहासाच्या अभ्यासकांस माहीत आहे. डॉ जोशी यांसही ही गोष्ट मान्य असावी. कारण आपल्या लेखाच्या शेवटी त्यांनी जे संदर्भ दिले आहेत त्यांतील बहुतेक आमच्या 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' आणि 'संशोधन–मुक्तावलि : सर २' यातील आहेत. प्रस्तुत वादग्रस्त प्रश्नाविषयीही आमचे मत त्यांस विचाराअंती पटेल अशी आशा आहे.

पुढील विवेचन समजण्यासाठी वाकाटकांचा इतिहास संक्षेपाने देणे जरूर आहे.

आतापर्यंत वाकाटकांच्या दोन शाखांविषयी माहिती मिळाली आहे. वाकाटक–नृपती प्रथम प्रवरसेन (सुमारे इ. स. २७०–३३०) याच्या निधनानंतर त्या राजवंशाच्या दोन शाखा झाल्या एकीच्या अमलाखाली सामान्यत: पूर्व विदर्भ असून तिची राजधानी आरंभी नन्दिवर्धन (रामटेक जवळचे नंदरधन) येथे होती. पुढे ती वर्धा जिल्ह्यात प्रवरपुर (हल्लीचे पवनार) येथे नेण्यात आली. या शाखेने सुमारे इ. स. ३३० ते ४९० या कालात राज्य केले. या कालात सध्याच्या मध्यप्रदेशातील बस्तर जिल्हा व त्याच्या लगतचा पूर्वेचा प्रदेश यांवर राज्य करणाऱ्या भवदत्तवर्मा नामक नलवंशी राजाने विदर्भावर आक्रमण करून कांही प्रदेश बळकावला होता. त्याने वाकाटकांची पूर्वीची राजधानी नंदिवर्धन येथूनच दिलेला ताम्रपट प्रसिद्ध झाला आहे ही गोष्ट वाकाटक नृपति नरेन्द्रसेन (सु. इ. स. ४५०–४७०) याच्या काली घडून आली असावी. पण नंतर त्याचा पुत्र द्वितीय पृथिवीषेण याने नलांना विदर्भातून पिटाळून लावले एवढेच नव्हे तर त्यांची बस्तर जिल्ह्यातील राजधानी पुष्करी हीही उद्ध्वस्त केली असे कोरीव लेखांच्या पुराव्यावरून दिसते. त्याच्या ताम्रपटात त्याला 'निमग्नवंशस्योद्धर्ता' (आपल्या संकटग्रस्त वंशाचा उद्धार करणारा) असे म्हटले आहे. त्यावरूनही हे स्पष्ट दिसते. डॉ. जोशी मात्र नलांचे हे आक्रमण पुढे वाकाटक नृपति हरिषेण याच्या काली झाले असे प्रतिपादितात त्याचा पुढे विचार करू.

ही नन्दिवर्धन–प्रवरपुरशाखा द्वितीय पृथिवीषेणा-नंतर अस्त पावून तिच्या अमलाखालील विदर्भ दुसऱ्या वत्सगुल्म (अकोला जिल्ह्यातील वाशीम) येथे राज्य करणाऱ्या, शाखेच्या राज्यात समाविष्ट झाला. त्या-काळचा वत्सगुल्म शाखेचा शेवटचा ज्ञात राजा हरिषेण हा महाप्रतापी निघाला. त्याने आपले साम्राज्य उत्तरेस नर्मदेपासून दक्षिणेस तुंगभद्रेपर्यंत, आणि पश्चिमेस अरबी समुद्रापासून पूर्वेस बंगालच्या उपसागरापर्यंत पसरविले. पण त्याच्या निधनानंतर त्याचा मुलगा नादान निघाला. आपल्या राजनिष्ठ वृद्ध मंत्र्याचे न ऐकता तो आपला काळ व्यसनांत घालवू लागला. तेव्हा अश्मक या गोदातीरच्या देशाच्या त्याच्या सामन्ताने आपल्या हस्तकांकरवी राज्यांत बेबंदशाही माजवून सर्व शासन पोखरले. आणि वानवास्य राज्याला चियावून विदर्भावर स्वारी करविली. तत्कालीन विदर्भराजाने आपल्या सामन्तांना आपल्या साहाय्यार्थ बोलावले. तेव्हा, कोंकण, कुनाल, नासिक्य, ऋचीक इत्यादि देशांचे राजे त्याला येऊन मिळाले. अश्मक नृपतिही आला. पण त्याने कुन्तलादि देशांच्या राजांना फितवून वान-वास्याशी सामना देत असलेल्या विदर्भराजाच्या पिछाडी-वरच हल्ला केला. तेव्हा विदर्भ राजाचा पराभव होऊन तो मारला गेला. नंतर अश्मक देशाच्या सामन्ताने वानवास्याला थोडासा लूटीचा भाग देऊन परत जाण्या-

करिता त्याचे मन वळविले आणि स्वत: विदर्भ घशात घातला.

दण्डीच्या 'दशकुमारचरिता'त दहा कुमारांच्या कथा आल्या आहेत त्यांतील विश्रुत नामक कुमाराची कथा वर दिली आहे. तीत ऐतिहासिक सत्यता असावी हे आम्ही पंचवीस–तीस वर्षांपूर्वी साधार दाखविले होते. विदर्भातील वाकाटक साम्राज्याचा एकाएकी ऱ्हास कसा झाले हे कोडे प्राचीन भारतीय इतिहासाच्या अभ्यासकांस पडले होते. ते वरीलप्रमाणे सोडविता आले. विश्रुतचरितातील कथेत तत्कालीन राजकीय परिस्थितीचे प्रतिबिंब कसे दिसते हे आम्ही 'वाकाटक नृपति आणि त्यांचा काल' आणि 'संशोधन मुक्तावलि : सर २' या ग्रंथांत साधार व सविस्तर दाखविले आहे. जिज्ञासूंनी ते ग्रंथ पाहावे.

डॉ. जोशींना विश्रुतचरितातील घटना ऐतिहासिक आहेत हे मान्य दिसते. पण त्यांचा मतभेद पुढील मुद्द्यांसंबंधी आहे –

(१) विदर्भावरील आक्रमण करणारा वानवास्य हा वनवासीचा (उत्तर कानडा जिल्ह्यातील तन्नामक राजधानीचा) नसून वनप्रभु होता आणि तो बस्तर जिल्ह्यातील नलवंशी राजा होता.

(२) वरील आक्रमण वत्सगुल्म शाखेतील हरिषेणाच्या पुत्राच्या कारकीर्दीतील नसून नन्दिवर्धन–प्रवरपुर शाखेच्या नरेन्द्रसेनाच्या कारकीर्दीतील असावे.

वरील मुद्द्यांचा थोडा विस्ताराने विचार करू.

(१) 'वानवास्य' हा शब्द उच्चारल्याबरोबर त्याने 'वनवासीच्या राजा'चा बोध होतो हे सुस्पष्ट आहे. आणि तसा तो अनेक विद्वानांनी घेतला आहे. उत्तर कानडा प्रदेशातील वनवासी नामक प्राचीन नगरी अद्यापि सुप्रसिद्ध आहे. महाभारतात तेथील लोकांचा उल्लेख 'वनवासिका' असा येतो (आगाशे यांची दशकुमारचरिताची आवृत्ति, टिप्पणी, पृ. ३६० पाहा.) शिवाय विश्रुतचरितातील राजनामे देशसंबद्ध अशी योजिली आहेत. उदाहरणार्थ, मुरलेश, ऋषीकेश्वर, कोङ्कणपति, नासिक्यनाथ ही पाहा. वानवास्य (वनवासीचा राजा) हे नावही त्यांसारखेच आहे. एका टीकाकाराचा हवाला देऊन डॉ. जोशी ते नाव 'वनप्रभु' (वनात राहणारा अधिपति) या अर्थी घेतात. ते त्या प्रकरणातील इतर सामन्तनामांशी जुळणारे नाही. केवळ 'वनात राहणारा' एवढाच अर्थ विवक्षित असता तर दण्डीने 'वनवासी' असा शब्द योजिला असता. त्याला तो स्वार्थिक ष्यञ् प्रत्यय कशाला लावता? संस्कृत टीकाकारांना प्राचीन देशनामांची माहिती नसल्याने त्यांनी अशा चुकीच्या व्याख्यानांनी अनेक घोटाळे करून ठेवले आहेत त्या प्रकारचाच हा होय.

'वानवास्य' हे रूप 'वनवासीचा राजा' या अर्थी व्याकरणाच्या नियमांप्रमाणे सिद्ध होऊ शकत नाही असे डॉ. जोशी म्हणतात. पाणिनीने 'वृद्धेत्कोशलाजादाञ्ञ्यङ्' (४।१।१७०) या सूत्रात ह्रस्व इकारान्त अवन्ति, कुन्ति इत्यादि देशनामांपासून 'य' प्रत्यय लागून 'आवन्त्य', 'कौन्त्य' अशी तत्तद्देशीय राजवाचक रूपे होतात हे सांगितले आहे. फरक एवढाच की येथे मूळ देशनाम 'वनवासी' हे ह्रस्व इकारान्त नसून दीर्घ ईकारान्त आहे. पाणिनि हा उत्तर भारतातील पंजाबात राहणारा. त्याच्या कालाला दण्डीच्या काळी सहस्राधिक वर्षे झालेली. तेव्हा पाणिनीला वनवासी देशनाम व त्यापासून होणारे 'वानवास्य' हे राजशब्दार्थक रूप माहीत नसले तर आश्चर्य नाही. पण तशी रूपे होऊच शकत नाहीत असे म्हणणे सयुक्तिक होणार नाही. पाणिनीला माहीत नसलेली 'पाण्ड्य' सारखी रूपे साधण्याकरिता कात्यायनाने आपली काही वार्त्तिके रचली आहेत हे डॉ. जोशींना माहीत असेलच.

शिवाय विश्रुतचरितातील हा 'वानवास्य' अरण्यमय प्रदेशाचा राजा दिसत नाही. कारण तो विशाल विदर्भ साम्राज्यावर स्वारी करण्याइतका प्रबळ होता. त्याला उद्देशून अश्मकपति 'वनवासी' म्हणणे शक्य नाही. नल राजांच्या ताम्रपटांत त्यांचे राज्य वनप्रदेशावर होते असे कोठेही म्हटले नाही.

(२) हे आक्रमण नन्दिवर्धन–प्रवरपुर शाखेच्या प्रदेशावर नरेन्द्रसेनाच्या कारकीर्दीत झाले नसून वाकाटक कालाच्या अखेरीस, हरिषेणाच्या पुत्राच्या राजवटीत, झाले होते हे विश्रुतचरितातील वर्णन जरा काळजीपूर्वक वाचल्यास दिसून येईल. पूर्वोक्त आक्रमणानंतर नलराजा भवदत्तवर्मा परत गेला नाही. तर त्याने नन्दिवर्धनजवळच्या प्रदेशावर काही काल राज्य केले, हे नन्दिवर्धनाहून दिलेल्या त्याच्या ताम्रपटाने सुस्पष्ट झाले

आहे. विश्रुतचरितात वर्णिलेल्या आक्रमणानंतर वानवास्य राजा मात्र विदर्भात राहिला नाही. अश्मकराजाने त्याला लुटीचा काही भाग देऊन आपल्या देशाला परत जाण्याविषयी त्याचे मन वळविले असे स्पष्ट म्हटले आहे. खालील उतारा पाहा – [अश्मकेन्द्रः] वानवास्य केनचिद्दंशेनानुगृह्य प्रत्यावृत्य सर्वमनन्तवर्मराज्यमात्मसादकरोत् । (आगाशे आवृत्ति, पृ. १३९)

तेव्हा वानवास्य हा वनप्रदेशावर राज्य करणारा नलवंशी भवदत्तवर्मा हा होय हा डॉ. जोशी यांचा तर्क विनवुडाचा आहे. तो राजा उत्तर कानडा प्रदेशातील वनवासी येथील कदम्बनृपति होता. दण्डीने आपल्या कथेत ऐतिहासिक नावे बदलली असल्याने तो अमुकच कदम्ब नृपति होय हे सांगता येत नाही.

♡ ♡ ♡

अनोळखी पहाट

गोष्टीच्या पुस्तकातल्या
कुठल्यातरी पानावर
वाचायला सुरवात करावी तशी
ती बसली होती
डोक्यावर सूर्य घेऊन
सावल्यांचे तुकडे वाळवीत,
तिच्या गर्भातली ओली रात्र
अनोळखी पहाट
कुशीत घेऊन जाताना
रस्त्यारस्त्याला
कुंपणा कुंपणाला
डोळे फुटणार होते
त्यावेळी
तिच्या विस्कटलेल्या यौवनाचा
एक व्रण – तसाच ठेऊन
पुस्तकाची बरीच पानं
अजून वाचायची असतानाच
ती पुस्तक मिटणार होती
अनोळखी पहाट
बेवारस
बेवारसच
पोरक्या पूर्ण विरामासारखी.

––सुधाकर नेर्लेकर

कंदील

तमोगर्भी अरण्यात
माझ्यासारखे अनेक होते,
संपूर्ण परके, चेहरा पुसलेले–
दबा धरल्या कोलाहलात
आपापला कंदील शोधता–शोधता,
एकमेकांस तुडवणारे !

धडपडलो, ठेचकाळलो,
भेगाळलो, रक्ताळलो,
खूप दूर एकटा आलो...

शांत अरण्यात रेशमी गारवा,
माझ्यावरती पांघरून आला,
दाट धुक्यात हळू – हळू
प्रकाशणारा माझा कंदील,
मला धुक्यात घेऊन गेला.....

—निरंजन उजगरे

एक अनामिक वादळ

अविनाश खंडकर

एखादा दिवस कसा सोनियाचा होऊन उगवतो. त्या दिवशी आयुष्य एकदम चांगलं वाटायला लागतं. उबवून टाकणारं, पावसानंतरचं कडकडीत उन्ह, त्या दिवशी त्रासदायक वाटत नाही. अंगातून लागलेल्या घामाच्या धारा सह्य वाटायला लागतात. चुकलेली बस तोंडून शिवी उमटवत नाही. आपल्या अपॉइंटमेंटची वेळ येऊन ठेपली असताना असं एखादं माणूस येतं की त्याला टाळता येत नाही. पण त्याबद्दल आपल्याला आपलाच राग येत नाही. आपण, एकदम उदार वगैरे होऊन जगाकडे बघायला लागतो.

त्या दिवशी तसंच झालं. डॉ. प्रभुदेसायांकडे गेलो होतो. पु. यं. च्या भेटीचा योग होता. वेळही ठरली होती. आम्ही निघणार, तेवढ्यात डॉ. ग. त्र्यं. देशपांडे येऊन बसले. ग. त्र्यं. देशपांडे म्हणजे संस्कृतचे ज्ञानतपस्वी ! खरं म्हणजे, पु. य. देशपांड्यांशी काय बोलायचं, त्यांना काय काय विचारायचं, याची मनातल्या मनात जुळणी चालली होती. त्यावेळी कोणी भेटू नये असं वाटत होतं. म्हणून त्यांना नमस्कार करून, अलिप्तपणाने बसून राहिलो. पण ग. त्र्यं. इतकं मनापासून बोलत होते की, अनिच्छेनंच त्यांचं बोलणं ऐकणाऱ्या कानांना एकदम 'अवधान' आलं. त्यांचं बोलणं ऐकता ऐकता, ज्ञानसाधनेतला आनंद पाहता पाहता, भान विसरायला होत होतं. आदल्या दिवशी, पु. यं. ना मुद्दाम भेटून वेळ ठरविली होती. त्याची आठवणही राहिली नाही. 'संध्याकाळी सहाला मी फिरायला जातो, त्यापूर्वी केव्हाही या', असं खास वऱ्हाडी थाटातलं 'आवंतण' होतं. तरी 'सकाळी दहाला येतो', असं त्यांना सांगितलं होतं. पण डॉ. देशपांडे असं काही बोलत होते की, त्यांनी बोलणं थांबवूच नये असं वाटत होतं. व्यावहारिक फायदे होवोत अथवा न होवोत, ज्ञानाच्या Pursuit मध्ये एक उच्च, दैवी आनंद असतो त्याचं वर्णन चाललं होतं. ज्ञानाची प्रत्यक्ष साधना न करताही त्या उच्च आनंदाची धुंदी चढत होती. ती उतरूच नये असं वाटत होतं. तेथून पु यं. च्या घरी येईपर्यंत ग. त्र्यं. चे शब्द कानात घुमत होते.

तसं पु. य. देशपांडे या नावाभोवती एक वलय आहे. कसल्याही बंधनांच्या पलिकडे असलेला हा माणूस अनामिक बनून चिंतनही करू शकतो, आणि अनुभवामृताचा रससिद्ध आध्यात्मिक आनंदही चाखू शकतो, हे एक कोडंच वाटे. नव्या जगाची स्वप्ने पाहणारा आणि नव्या मूल्यांची स्थापना करण्यासाठी जिवाचा आटापिटा करणारा हा बुद्धिनिष्ठ मार्क्सिस्ट, चतु:श्लोकी भागवताचे निरूपण करताना पाहिला की, नवल वाटे. सिंदखेड दरोडा प्रकरणात ४२ च्या भूमिगतांना बिनधोकपणे आपल्या घरात लपविणारा आणि त्यासाठी बेदरकारपणे तुरुंगवास भोगणारा, बडनेऱ्याच्या गिरणी कामगारांच्या पिळवणुकीने संतापून संपाचे शस्त्र उगारणारा, अमरावतीच्या अंबेच्या देवळात हरिजनांना प्रवेश मिळवून देणारा आणि त्यासाठी बहिष्कार ओढवून घेणारा, जिथं जिथं अन्याय दिसेल, त्या अन्यायाने पेटून त्याचा प्रतिकार करणारा, 'भवितव्या'चे दर्शन घडविणारा, जे पटेल ते परखडपणे बोलणारा, सत्तास्पर्धेच्या राजकारणापासून अलिप्त राहणारा, एके काळी पुरोगामी काँग्रेसजनांचे केंद्र तरीही प्रसिद्धीपासून शतयोजने दूर, वाराणसीच्या जे. कृष्णमूर्ति फाउंडेशनमध्ये चिंतनात मग्न असणारा, पण corruption ची anatomy जाणून तिचे विच्छेदन करणारा, अशी पु. यं. ची किती तरी रूपे. एकाच्याच आकलनाने, मान लवावी असं व्यक्तिमत्त्व ! एक बेफाम, बेदरकार माणूस ! त्यांच्या त्या एवढ्याशा शरीरात केवढं प्रचंड वादळ सामावलेलं आहे, या कल्पनेनंच माणूस त्यांच्यापासून आदराचे अंतर राखील. त्यांच्या भेटीचा योग म्हणजे एक पर्वणीच. एका धुंदीतून माणूस दुसऱ्या धुंदीत बुडावा असा प्रसंग.

आणि बाबा त्या भेटीत म्हणत होते, "प्रत्येक जीवाचं या विश्वाशी अस्तित्वात्मक नातं आहे. आधुनिक विज्ञानालासुद्धा हे मान्य आहे. आपल्याकडे आपण पूर्वीपासूनच ते मानत आलो आहोत. आज विज्ञान म्हणतं की आपण जो श्वास घेतो, तो वायु विश्वाच्या अंतापासून आपल्यापर्यंत असा तरंगत येतो. आणि आपण सोडलेला श्वास, विश्वाच्या अंतापर्यंत पसरत पसरत जातो. अहो, असं पहा, गीतेत प्रत्येक अध्यायाला नाव आहे. हा काय अर्जुन विषाद योग, हा ज्ञान योग, हा कर्म योग. हे 'योग' म्हणजे काय? योग म्हणजे मीलन आपण आणि विश्वात्मक परमेश्वर यांचं एक नातं आहे. हे नातं ज्या माध्यमातून प्रतीत होतं ते 'विषाद', 'ज्ञान', 'कर्म.' त्याच माध्यमातून जीवाचा परमेश्वराशी संवाद होतो. म्हणून 'ज्ञानयोग', 'कर्मयोग', 'भक्तियोग' अशी नावं प्रत्येक अध्यायाला आहेत. ती माध्यमं आहेत 'दर्शना'ची! माझ्या एका लेखात मी असंच प्रतिपादन केलं आहे. 'मैत्रेयी'त निर्मलेने केलेला त्याचा अनुवाद विनोबांनी वाचला, तेव्हा ते अगदी थक्क झाले." बाबांच्या लिहिण्याकडे पाहून 'थक्क होण्या'पलिकडे दुसरं काही होत असेल, असं वाटत नाही. विनोबाच कशाला? रावसाहेब पटवर्धन, धुंडीराजशास्त्री विनोद यांचंही तेच झालं. रावसाहेबांकडे पुण्याला गेले, तेव्हा त्यांनी बाबांना साष्टांग दंडवत घातला. बाबा संकोचले. "अहो, हे काय, हे काय?" असं बावचळून विचारू लागले. रावसाहेब म्हणाले, "बाबासाहेब, हा दंडवत तुम्हाला नाही, 'नासदीय सूक्त नीराजना'ला आहे. बाबा, कमाल केलीत. 'चिंतनिका' काय, 'नासदीय' काय! काय, विचार काय आहे तुमचा?" 'अनुभवामृत' वाचून न्यायरत्न धुंडीराजशास्त्री गुंग होऊन गेले. विनोबा, धुंडीराजशास्त्री अशा माणसांनाच समजू शकेल, असं व्यक्तिमत्त्व! ज्यांच्या नावाचा उच्चारसुद्धा, मनातल्या मनात नमस्कार केल्याशिवाय आम्ही करीत नाही, अशी ही माणसं बाबांपुढे नतमस्तक होतात. सामान्यांना 'बाबा' समजू नयेत, स्वाभाविक आहे.

त्या दिवशी घनवटे रंगमंदिराच्या पोर्चमध्ये पु. य. आणि विमलाबाई दिसले तेव्हाही या विलक्षण माणसाशी भीत भीतच बोललो होतो. "मला आपली भेट घेऊन आपल्याशी निवांत बोलायचं आहे." या प्रास्ताविकाने कोणताही माणूस 'अंतरी फुलून' आला असता. प्रसिद्धी आणि प्रतिष्ठेची मदिरा कुणाला नकोशी वाटेल. पण बाबांचा आवाज कमालीचा थंड! "काय बोलायचं आहे?" प्रश्नातही त्रयस्थाची वृत्ति! "पु. य. देशपांड्यांच्या साहित्याचा अभ्यास करतो आहे. त्यातल्या वैचारिक प्रवासाबद्दल थोडं बोलायचं आहे." भाषेत सौष्ठव, प्रगल्भपणा इ. इ. आणण्याच्या भरात मी पुरा गोंधळून गेलो होतो. "I have absolutely nothing to say about पु. य. देशपांडे! मला जे काय म्हणायचं आहे, ते माझ्या लिखाणात आहे. त्यातून तुम्हाला समजेल ते घ्या. माझा त्याच्याशी आता काही संबंध नाही." आपल्या साहित्याबद्दल इतक्या अलिप्तपणे बोलणारा 'जगी असा कोण लेखकु आहे' असा प्रश्न पडावा. तेवढ्यात डॉ. प्रभुदेसाई मदतीला धावून आले. "आपल्या साहित्याबद्दल यांना काही शंका उपस्थित झाल्या आहेत. माझे विद्यार्थी आहेत. आपल्या व्यक्तिगत जीवनाची माहिती मिळवून, त्या शंका सोडविण्याची यांची इच्छा आहे." 'प्रभुदेसायांचा विद्यार्थी' एवढी शिफारस पुरेशी झाली असेल कदाचित. एकदा त्यांना आपादमस्तक न्याहाळून घेतलं अन् म्हणाले, "संध्याकाळी सहाला मी फिरायला जातो. त्यापूर्वी केव्हाही या." "बारा वाजता आप्पासाहेबांकडे जायचंय् जेवायला, लक्षात आहे ना?" बाबांच्या 'सचिव' विमलाबाईंनी विचारलं. "हो, हो. दुपारी येऊ नका हं! सकाळी या ९/१० वाजता." आप्पासाहेब तथा कवि अनिल जुने मित्र! त्यांच्याशी किती तरी बोलून घ्यायचं होतं. या उपऱ्या माणसाला दहा ते बाराच्या दरम्यान आटोपता येईल, असाही विचार असेल. भेट पदरात पडल्याच्या आनंदात मी 'हो' म्हणून गेलो. मग प्रभुदेसायांचं कौतुक करून, हातातल्या काठीला झोके देत बाबा फाटकाकडे निघाले. कोणी, अगदी विमलाबाई सुद्धा आपल्याबरोबर येताहेत की नाहीत याचा विचार नाही. मला वाटतं, हा त्यांचा स्वभावच असावा. सतत पुढे जायचं, आणि तेही एकटंच! अशी ही कलंदर वृत्ती, त्यांच्या आयुष्यातल्या कित्येक अध्यायात प्रकटली आहे.

फर्ग्युसनमध्ये शिकत असतानाची गोष्ट. विमलाबाई, कवि अनिल हे त्याच काळातले फर्ग्युसनचे विद्यार्थी! त्यांना काव्य विषयात रमण्याची हौस, तर बाबा टेनिसच्या मागे लागलेले. टेनिस तेही असं की

सकाळ–दुपार–संध्याकाळ बाबा आपले टेनिस कोर्टवर! टेनिसच काय, पण हॉकी, क्रिकेट जो खेळ हाती येईल त्यात बाबा दंग व्हायचे. एकदा असंच दुपारचं टेनिस खेळत होते. त्यांच्याच 'तव्येती'चा एक पार्टनरही मिळाला होता. ऐन दुपारी यांच्या व्हॉलीज् चाललेल्या. साहेबाच्या राज्यात फर्ग्युसन कॉलेज म्हणजे और चीज होती. दुपारी वर्गावर्गात शिकविण्याचेच काय ते आवाज येत. त्या शांत वातावरणात चेंडूचे 'पॉक् पॉक्' आणि 'फिफ्टिन थर्टी' 'फिफ्टिन फॉर्टी' हे आवाज केवढ्यानं घुमत होते. प्रिंसिपॉलला त्यांच्या ऑफिस-मध्येही ते ऐकायला गेले. लगेच त्यांनी बाबांना बोलावून घेतलं आणि यथास्थित जामलं. "अरे, ही दुपारची वेळ टेनिस खेळायची आहे का? हे सगळे क्लासेस चालू आहेत, आणि तुम्हाला काही वाटत नाही, खेळत बसलात ते?" अशा सुरात काही तरी बोलले. लगेच रॅकेट खोलीत फेकून, बाबा तडक वर्गात दाखल. "हे आप्पा वगैरे आम्हाला 'देहू' म्हणत. हे सगळे पुस्तकातले किडे! आम्ही आपले मस्त मौला." अजूनही बाबा म्हणजे 'मस्त मौला'च आहेत. त्यानंतर पुस्तकं, विशेषत: तत्त्वज्ञानाची पुस्तकं वाचण्याचा नाद लागला; ते दिवसभर बाबा वाचण्यातच दंग, असा मनस्वी स्वभाव!

वाचण्याचं हे वेड लहानपणापासूनचं. मॅट्रिकपर्यंत विवेकानंद, रामतीर्थ, रामकृष्ण परमहंस यांची पुस्तकं आणि मेरी कॉरेली वाचून झालेली. हाती येईल ते अधाशासारखं वाचून काढायचं ते वय. त्यात मेरी कॉरेलीची कुठलीशी कादंबरी नेमली होती. बाबांनी, तिच्या जेवढ्या मिळाल्या तेवढ्या कादंबऱ्या वाचून मेरी कॉरेलीच काय, पण इतरही इंग्रजी लेखकांची पुस्तकं त्यांनी वाचून काढली होती. त्यांनी जणू बाबांवर मोहिनीच घातली होती. मराठी पुस्तकं वाचणं हे त्या काळात 'बॅकवर्डपणाचं' लक्षण झालेलं नव्हतं. पण बाबांना मराठी पुस्तकं 'मुर्दाड' वाटत. इंग्रजी पुस्तकात 'लाइफ' वाटे. त्यात मराठी विषयाचा अभ्यास व्याकरणाने बरबटलेला. तेव्हा, मराठीचा अभ्यास केवळ पास होण्यापुरता. जेमतेम तीस टक्के मार्क मिळाले की बाबा खूष. इंग्रजीत मात्र नव्वद टक्के मार्क मिळत. मराठीतली त्यांची ही शालेय प्रगती पाहून, बाबा मराठीतले एक गाजलेले लेखक होतील असं कुणाला स्वप्नात देखील वाटलं नसतं. वरं, मराठीत कमी मार्क मिळाल्यामुळे आपला नंबर घसरल्याचं काही दु:ख वाटे अशातला मुळीच भाग नाही. बाबा त्याबद्दल पूर्ण बेफिकीर!

एकूणच बाबा स्वत:विषयी फार बेफिकीर आहेत. ज्या काळात ते जन्मले, त्या काळातल्या माणसांचं हे वैशिष्टचच असलं पाहिजे. आपल्या जन्मतारखा आवर्जून लक्षात ठेवून, 'हॅपी बऽऽर्थडे च्यूऽऽ यूऽऽ' ऐकण्याच्या सोसाने, आपले वाढदिवस साजरे करण्याच्या काळात, सांगितलं तर कुणाला खरंही वाटणार नाही की नुकतीच १० नोव्हेंबरला बाबांच्या वयाला ७५ वर्षं पूर्ण झाली. पण त्या निमित्ताने त्यांचा 'अमृत महोत्सव' करून, त्यांना किमान 'शाल–श्रीफल' अर्पण केल्याचं काही कुठं वाचलं नाही. नाही तर, परवा कुठल्याशा नगर-पालिकेच्या ॲडमिनिस्ट्रेटरचा त्यांच्या 'पाल्यां'नी, सुवर्णपदक देऊन सत्कार केला. का, तर गावात वर्षानु-वर्षं तुंबलेली रस्त्यातली गटारं त्यानी 'अवघ्या' एक वर्षात स्वच्छ करविली. काळाचा महिमा हा! बाबांच्या वयाला ७५ वर्षं पूर्ण झाली ती, कागदोपत्री, बाबांच्या शब्दात 'केवळ स्मरणाने नोंदविलेल्या' जन्मतारखे-प्रमाणे. कित्येक जुन्या कवींच्या जन्मतारखांबद्दल वाद आहेत. तसे पुढे बाबांच्या जन्मतारखेबद्दल होतील की नाही, हे कोण सांगणार? पण त्यांच्या दोन जन्मतारखा सांगितल्या जातात, हे मात्र खरं. बाबांना विचारलं तर ते म्हणतील, "शाळेत नाव घातलं तेव्हा वडलांना, आईला आठवलं त्याप्रमाणे १० नोव्हे १९०० ही जन्म-तारीख लिहिली." पुढे १९३५–३६ च्या सुमारास अमरावतीच्या देशपांडे वकीलांच्या तीन्ही मुलांची टिपणं सापडली. दोन टिपणांवर नावं होती. मोठ्याची आणि धाकट्याची ती टिपणं होती. ज्याच्यावर नाव नव्हतं, ते ते मधल्याचं म्हणजे बाबांचंच टिपण असलं पाहिजे असा अंदाज करण्यात आला. त्या टिपणाप्रमाणे बाबांची जन्मतारीख ११ डिसेंबर १८९९ ठरते पण तो पर्यंत मिळायची ती सर्टिफिकिटं मिळवून झाली होती. मग 'कशाला उगीच तारीख बदला' अशा कंटाळ्यापायी १० नोव्हेंबर १९०० हीच तारीख चालू राहिली. सुपरॲन्युएशन, सिनिआरिटी, सुपरसीड इ. इ. चा प्रश्न नसल्यामुळे, अजूनही तीच चालू आहे.

अंजनसिंगी या आपल्या गावाचा बाबांना फार अभिमान आहे. अंजनसिंगी ही बाबांच्या मर्मबंधातली ठेव आहे. अंजनसिंगी म्हणजे दिवाळीच्या, उन्हाळ्याच्या

सुटघात बापुजींबरोबर, सातपुड्याच्या टेकड्यांवरून मुळ्या, वनस्पती शोधत हिंडणे; अंजनसिंगी म्हणजे उन्हाळ्यात आंबे आणि हंगामात हुरडा झोडणे; समस्त देशपांडे-कुळातील मुलांसह हैदोस घालणे! अंजनसिंगीच्या देशपांड्यांचं सामाइक कुटुंब म्हणजे 'नांदते गोकुळ'! !तीन नंतर मुळीच नको 'चा काळ नव्हता तो. सगळं कुटुंब सुटघात जमलं, म्हणजे रोज शे-पन्नास पान जेवायला बसे. त्या काळातला बापुजींच्या मृत्यूचा प्रसंग बाबांना आजही चांगला आठवतो. बापुजी म्हणजे बाबांचे आजोबा, अण्णासाहेबांचे वडील. त्यांना वैद्यकी येत असे. नाडीपरीक्षा तर अशी की ज्याचा हात धरतील, त्याच्या तीन पिढ्यांची प्रकृती ते 'वाचत'. "तुझ्या आज्याला हे होतं, तुझ्या बापाला हे होतं अन् तुला हे आहे," अशी. स्वतः हिंडून भोवतालच्या टेकड्यांवरून वनस्पती, मुळ्या गोळा करून आणत. रविवारी अंजनसिंगीला बाजार भरे. आसपासच्या गावातले लोक संध्याकाळपर्यंत मीठ-मिरची घेत आणि संध्याकाळी देशपांडे वाड्यात येत बापुजींकडून औषध घ्यायला. देशपांडे वाड्याचं आवार माणसांनी फुलून जाई. बापुजी असे सदरेला बसून नाडी पाहून औषध देत. हे काम रात्री १०-११ वाजेपर्यंत चाले. औषधासाठी कुणाकडून पैसे घेत नसत. एखादं व्रत घेतल्यासारखं काम चालायचं ते. लोकांचा त्यांच्यावर विश्वासही फार. कारण त्यांच्या औषधाने लोक बरेही होत. बापुजींनी औषध द्यायला 'नाही' म्हटलं, की आपला इहलोकीचा मुक्काम आटोपला असा लोकांचा सरळ साधा हिशोब होता. बाबांची आई एकदा आजारी पडली. अमरावतीला तेव्हा डॉ. जोशी प्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांचं औषध चालू केलं. पण गुण येईना. अण्णासाहेब देशपांडे म्हणजे मातब्बर वकील. त्यांनी मुंबईहून डॉ. रावला आणलं.त्यांनाही रोगाचं निदान करता येईना. बापुजी रोज यायचे, नाडी पहायचे आणि चालू लागायचे. औषध काही देत नसत. बाई अगदी अस्थिपंजर झाली, तेव्हा एकदा अण्णासाहेब वैतागले, आणि बापुजींना म्हणाले, "बापुजी, रोज येता पाहता अन् निघून जाता. औषध काही देत नाही. तशीच मारून टाकायची आहे का तिला?" त्यावर बापुजी म्हणाले, "अरे, घाबरतोस कशाला? काही होत नाही हिला. हिचे दोन्ही पाय पकडून, गरागरा फिरवून हिला जमिनीवर 'हापटलीस', तरी ही मरत नाही." वेळ आली, तेव्हा मेण्यात घालून तिला अंजनसिंगीला घेऊन गेले. बाबा बरोबर होतेच. दुसऱ्या दिवशी, दिवसभर टेकड्यांवरून हिंडून गाडाभर मुळ्या गोळा केल्या, आणि वाड्यावर आणून, त्यातल्या हव्या त्या निवडून घेतल्या. मग स्वतः चूल पेटवून, एका हंड्यात त्यांचा काढा केला आणि तो बाबांच्या आईला दिला. त्याचा गुण असा विलक्षण की सहा महिन्यांपूर्वी जी बाई जगते की मरते असं वाटत होतं, ती बाबांना बरोबर घेऊन मूर्तिजापूरपर्यंत बैलगाडीतून गेली. आणि तेथून रेल्वेने अमरावतीपर्यंत प्रवास करत आली. डॉ. जोश्यांना तर तिला पाहून आश्चर्यच वाटलं. बापुजी म्हणजे साक्षात् धन्वंतरी, असं त्यांनाही वाटलं. बाबांना त्यांचा खूप लळा. बापुजी नवज्वराने आजारी पडले. तो त्यांचा शेवटचाच आजार ठरला. सातव्या का आठव्या दिवशी एक महारीण आली रडत की "बापुजी, माहं काई खरं न्हायी. तुमीच काई पाहून गिहून औसदी दिली तर मी जगेन." त्या तापात, बापुजी बिछान्यावरून उठले. तिची नाडी पाहून तिला औषध दिलं, नंतर स्नान केलं, कारण महारणीचा स्पर्श झाला होता. अन् पुन्हा जाऊन झोपले बिछान्यावर. असा ताकदीचा माणूस! ते आजारी असल्याचं ऐकून गावागावातून दिंड्या आल्या होत्या. देशपांडे वाड्याला एखाद्या जत्रेचं स्वरूप आलं होतं. ज्या दिवशी वारले त्याच्या आदल्या दिवशी, आपल्या सगळ्या गोतावळ्याला समोर उभं केलं. मुलं, मुली, वहिणी, भाऊ, पुतणे, भाचे, नातवंडं, पणतवंडं सगळ्यांना डोळे भरून पाहून घेतलं न् म्हणाले, "जा, जा आता." दुसऱ्याच दिवशी असं रात्रीच्या वेळी बाबांचे दोन काका त्यांच्याजवळ बसले होते. ते आपसात बोलत होते, "बापुजींना झोप लागलेली दिसते आहे. चला आपणही थोडं झोपू या." ते जायला निघाले तशी बापुजींनी त्यांना हटकलं, "अरे चाललात कुठे?" बापुजींचा आवाज अगदी खणखणीत. "अरे, थोडं उरलंय् आता. ते कांबळं आंथरा खाली न् निजवा त्यावर मला." कांबळं आंथरून त्यांनी बापुजींना त्यावर झोपवलं आणि दोन मिनिटात त्यांचा प्राण गेला. "ते म्हणजे सिद्ध पुरुष! आपल्या मृत्यूची वेळ त्यांना ठाऊक होती. अगदी मरेपर्यंत त्यांचं अवधान कायम! आणि त्यानंतर त्यांची अंत्ययात्रा जी निघाली, ती भजन, टाळ, झांजा यांच्या गजरातूनच. तेव्हापासून माझ्या मनावर एक विलक्षण प्रभाव की मृत्यू म्हणजे एक महामंगल गोष्ट आहे. मरण ही शोकाची गोष्ट नाही. संशोधनाची गोष्ट आहे. मृत्यू हे एक कोडं आहे आणि ते सोडविल्याशिवाय मानवी जीविताला काही

अर्थ नाही, असं मला अजूनही वाटतं." 'मृत्यूपनिषद्' लिहिणाऱ्या एका ऋषीचे संस्कार असे बालपणापासूनचे आहेत.

बालपणापासूनच झालेला आणखी एक संस्कार, स्वभावच म्हटला तरी चालेल, जे आपल्याला पटलं आहे, ते कोणाचीही भीडमुर्वत न बाळगता, निस्संदिग्ध शब्दात बोलायचं! १९१७–१८ सालची गोष्ट, बाबा तेव्हा फर्ग्युसनमध्ये शिकत होते. सुटयात अमरावतीला आले होते. बाबांचे दुसरे आजोबा, आईचे वडील, बाबाजी तेव्हा अमरावतीला त्यांच्याच घरी आले होते. बाबाजी म्हणजे विरक्त वृत्तीचे साधुपुरुष! जपजाप्य, संध्या, पूजा–अर्चा यातच त्यांचा वेळ जाई. ते निजले असे कधी नाहीतच. नुसते लोडाला टेकून बसले की तीच त्यांची झोप. कोणाशी कधी फारसं बोलत नसत. पण ते आले की मुलांची मात्र पंचाईत होत असे. समोर दिसेल त्याला पकडून विचारत, "काय रे, संध्या करतोस की नाही?" आता एवढ्या थोर माणसाला खरं कसं सांगायचं, म्हणून तावडीत सापडलेला पोरगा, त्यांना खूष करण्यासाठी दडपून देई, "हो बाबाजी." पण 'अंदरकी बात' बाबाजी जाणत आणि ते खवळायचे. "हट भोसडीच्या, खोटं बोलतोस. गळयात जानवंसुद्धा नाही तुझ्या अन् संध्या कसली करतोस! हे संध्येचं पुस्तक घे आणि हा जानवी जोड. ब्राह्मणाकडून 'मांत्रीक' करून घे अन् गळयात घाल. आणि रोज स्नान करून संध्या केल्याशिवाय जेवायचं नाही, काय समजलास?" साहजिकच बाबाजी आले की पोरांच्या पोटात गोळा उठायचा. बाबा सुटीत घरी आले, तो आल्या आल्या, इतर मुलांनी 'वॉर्निंग' दिली, 'बाबाजी आले आहेत. तुला संध्येबद्दल विचारणार ते.' बाबा आत आले तेव्हा बाबाजी समोरच्या दिवाणखान्यात लोडाला टेकून बसलेच होते. बाबा त्यांच्या पाया पडणार तो तेच म्हणाले, "काय रे मिन्या, कॉलेज-मध्ये गेलाहेस, तिथे संध्या बिंध्या करतोस की नाही?" 'मिन्या' 'मिनिबाबा' ही बाबांची लाडकी नावं कित्येक दिवसपर्यंत त्यांना 'मिनिबाबा'च म्हणत. 'मिनिबाबा'चे 'बाबा' केव्हा झाले, कोणास ठाऊक! आजची त्यांची लहान चण पाहून त्यांना 'मिनि'बाबा नाव देणाऱ्याच्या दूरदृष्टीचं कौतुक वाटावं. हा 'मिनी' बाबा बाबाजींना म्हणतो कसा, "तुम्हाला खरं सांगतो बाबाजी, कॉलेजमध्ये जाईपर्यंत मी रोज इमानदारीनं संध्या करीत असे. मारुतीला, देवीला प्रदक्षिणा घालत असे. पण कॉलेजमधलं वातावरण असं काही आहे की, या सगळयाला तिथं काही अर्थ नाही. म्हणून मी संध्या बंद केली. इतकंच काय, पण आज माझ्या गळयात जानवं आहे की नाही, याचीसुद्धा मला शुद्ध नाही." इतर पोरं दाराआड गर्दी करून होती. 'आता बाबाची छान तासली जाणार' या अपेक्षेनं ती कान देऊन होती. पण बाबाजी म्हणाले "शाबास, तू 'येकटाच' भेटलास का ज्यानं खरं सांगितलं. तुला संध्या करायची गरज नाही. आखरी संध्या करून काय साधायचं? खरं बोलणं हेच की नाही? ते तुला आपोआप प्राप्त आहे. जा, तुला संध्येची गरज नाही." परिणामाची तमा न बाळगता, जे पटेल ते बोलण्याचा बाबांचा स्वभाव तेव्हापासूनचा. आज बाबाजींबद्दल बोलताना बाबा म्हणतात, "त्या काळाच्या सिद्धाची आधुनिकतेकडे पाहण्याची दृष्टी ही अशी होती. अहो, क्रांतिकारक, क्रांतिकारक आणखी ते काय? तुमच्या 'रिच्युअल्स'नी ते बांधलेले नव्हते उलट, 'रिच्यु-अल्स'नी जे सिद्ध असेल, ते जर तुमच्याकडे असेल तर तुम्हाला रिच्युअल्सची गरज नाही. ज्ञानी माणसाची ही श्रद्धा!" बाबाजींच्या त्या वचनांचा बाबांवर विलक्षण प्रभाव पडला आहे. त्यातून प्रकट होणारे दर्शन, आजही बाबांना मोह घालते.

एकूणच धर्माबद्दलची त्यांची मतं अत्यंत प्रत्यय-कारी आहेत. "जागतिक धर्म तोच आमचा धर्म! हा आमचा धर्म, हा तुमचा धर्म हा भाव आमच्याकडे नाहीच. आम्ही तर हजार धर्म पचवले. म्हणून तर आमच्या धर्मविषयक श्रद्धांमध्ये उत्स्फूर्तता आहे. रे. टिळक, पंडिता रमाबाई ख्रिस्ती होऊनही हिंदू धर्माच्या उदात्त, सर्व समावेशक स्वरूपात विलीन झाले. ख्रिश्चन होऊनसुद्धा त्यांना भारतावरच लिहावं लागलं. ही मजा आहे. भारतीयतेची सांस्कृतिक निष्ठा आणि ग्रहणशीलता केवढी प्रगल्भ आहेत याची उदा-हरणं आहेत ती."

कॉलेजजीवनात बाबांनी खूप वाचलं. इमर्सन आणि रवींद्रनाथ हे आवडते लेखक, आणि शेली, ब्राउनिंग हे आवडते कवी! "हा 'ए. आर.' आमचा मित्र झाला आणि त्याच्या संगतीने काव्याचं वाचन झालं." 'ए. आर.' म्हणजे कविवर्य आत्माराम रावजी तथा आप्पासाहेब देशपांडे तथा कवी अनिल.

" त्यापूर्वी काव्य म्हणजे वर्गात शिकवलं जाई तेवढंच. 'ए. आर.' ही तेव्हा कविता लिहू लागला होता. त्याच्याबरोबर मराठी-इंग्रजी कवी वाचले. केशवसुतात 'लाइफ फोर्स' वाटला. पण शेक्सपीयर, इब्सेन, कीटस्, शेली, बायरन, ब्राउनिंग वाचून दंग झालो. त्यांच्या कविता वारंवार वाचल्या. इमर्सनचे तर लेखच्या लेख मला पाठ असत." म्हणजे इथे मराठी-चिये नगरी 'अध्यात्मदर्शना'चा सुकाळु करणारा हा विचारवंत, इंग्रजी साहित्याच्या दुधावरच पोसला जात होता.

इमर्सनमागे वेडया झालेल्या बाबांच्या वागण्या-बोलण्यात सदैव गांभीर्य असे असंही नाही. 'ए. आर.' वगैरे त्यावेळी नुकतीच लेखनकामाठी करू लागलेले होतकरू आणि काही अंशी लोकप्रिय साहित्यिक एक प्रकारच्या कैफात असत. बाबाही धुंदीतच असत. पण त्यांची वेडं वेगळीच. कुठं वेरार क्लब चालव, कुठं सहली काढ! खेळ, वादविवाद ही तर बाबांची 'राखीव क्षेत्रं'. एकदा वाटतं त्या होतकरू इ. इ. साहित्यिकांपैकी एकानं हेटाळणीच्या सुरात म्हटलं, "हे साहित्याचं क्षेत्र आहे, टेनिस कोर्ट नाही राजे!" त्यावर बाबा फटकन् म्हणाले होते, "काय लिहिता रे लेको तुम्ही? नुसतं मनात येईल ते भरकटता, किंवा मोठ्या माणसांच्या गोष्टी लिहिता. एक काळ असा येईल की तुम्ही आमच्याविषयी लिहाल. आम्ही इतिहास वाचणारे नाही, इतिहास घडविणारे आहोत." हे असं फटकन् बोलून मोकळं होणं बाबांच्या स्वभावात फार पूर्वीपासून आहे.

त्याच काळातली गोष्ट. कॉलेजमध्ये आठवडयात एक दिवस 'शंका समाधाना'चा कार्यक्रम होई. दोघं तिघं प्रोफेसर्स विद्यार्थ्यांच्या जिज्ञासा तृप्त करण्यासाठी त्यांच्या प्रश्नांची उत्तरं देत. प्रश्न अर्थात अभ्यासाशी संबंधितच असत. त्या प्रोफेसर्सपैकी एक, नुकतेच मायभूमी इंग्लंडहून आले होते. ते इंग्रजी शिकवत. शेक्सपीयरच्या जन्मभूमीत जन्मलेले म्हणून ते स्वतःला शेक्सपीयरवर 'अथॉरिटी' मानत. ही 'अथॉरिटी' येता जाता 'नेटिव्ह' विद्यार्थ्यांवर ठसविण्याची एकही संधी ते दवडत नसत. दर दोन वाक्याआड 'शेक्सपीयर सेज,' असलं बोलणं! या मशारनिल्हे प्रोफेसर-मजकुरांना संपूर्ण 'शेक्सपीयर' पाठ आहे, असा लौकिक होता. राजवट इंग्रजी, विषय इंग्रजी आणि शिकविणारे इंग्रज. तेव्हा आल्या आल्याच त्यांनी आपला वचक बसवला. 'शंका समाधाना'च्या एका प्रसंगी, बाबांनी, नम्रपणाचं नाटक करीत विचारलं, "सर, हॅम्लेट वाचताना, एका वाक्याचा नीटसा अर्थ लागला नाही. कृपा करून सांगाल काय?" "ऑफ कोर्स, गो अहेड." हॅम्लेट तर मशारनिल्हे प्रोफेसरांना तळहातावरील रेषांप्रमाणे अवगत! बाळाजी आवजीच्या थाटात, बाबांनी कोऱ्या वहीतून 'वाचलं', "इन द लाइट ऑफ द डार्कनेस, वुई सी द फ्यूचर ऑफ द पास्ट." प्रोफेसर मजकूर गोंधळले. कुणी कितीही मोठा शिक-विणारा असला तरी संदर्भ पाहिल्याशिवाय सांगणार तरी काय? "पुढच्या वेळी सांगेन" म्हणून त्यांनी वेळ मारून नेली. आठ दिवस झाले, पंधरा दिवस, महिना झाला. शेक्सपीयरच्या संबंधात लिहिलेलं जे जे उपलब्ध होतं ते ते 'अ' पासून 'ज्ञ' पर्यंत वाचूनही, त्यांना अर्थ उमगेना, संदर्भही लागेना. कसा लागणार? शेक्सपीयरच्या लेखणीनं ते वाक्य कधी लिहिलंच नव्हतं. ती बाबांचीच प्रतिभा होती. मशार-निल्हे प्रोफेसर अगदी हैराण झाले. आणि बाबा मात्र, ते दिसले की साळसूदपणे विचारत, "काही अर्थ लागला का सर?" प्रत्येक वेळी त्यांना कशी बशी सुटका करून घ्यावी लागे. बऱ्याच दिवसांनंतर कुणा 'येरू'ने खरं काय ते सांगून आपल्या 'गुरुवर्यां'ची सुटका केली. बाल्यपणातही बाबांचं हे वेगळेपण! त्यातही बाबा पुढेच. पण 'मृत्यूच्याही मृत्यूचा विचार करून एक वेगळे दर्शन घडविणाऱ्या' बाबांच्या प्रतिमेने 'अंधाराच्या प्रकाशात भूताचे भविष्य' पाहिलं नसेलच असं काही म्हणता यायचं नाही.

फर्ग्युसनमधल्या 'वऱ्हाडी मानसां'चा एक बेरार क्लब होता. बाबा त्याचे अध्वर्यू! 'ए. आर.', दत्तोपंत, सदुभाऊ, पी. वाय्. असे साताठ देशपांडे आणि तेवढेच देशमुख, पांडे अशी झाडून सगळी वैदर्भीय तरुणमंडळी त्यात एकत्र येत. विमल कोल्हटकर, कुसुम जयवंत म्हणजे त्या क्लबचं 'ग्लॅमर!' 'एकत्र जमणं' हा भाग महत्त्वाचा. त्यासाठी मग कविता वाचन, कादंबऱ्या नाटकांची चर्चा, किंवा नुसत्याच गप्पागोष्टी, निरुपद्रवी टवाळक्या असले कार्यक्रम या क्लबमध्ये होत. कवी अनिलांच्या कित्येक उमद्या कविता प्रथम 'बेरार क्लब'मध्येच वाचल्या गेल्या. विमलाबाईंच्या कवितेला, कुसुमावतीबाईंच्या काव्यमधुर गद्याला इथंच

संस्कार मिळाले. फेब्रुवारीतल्या पौर्णिमेला क्लबची 'मूनलाइट पार्टी' होई. पिकनिकचाच भाग त्यात विशेष! तिलाच 'पार्टींग फीस्ट' म्हणत. त्या पार्टी-नंतर सगळे 'चला आता अभ्यासाला आपण मोकळे' असं म्हणत, पुस्तकांवरची धूळ झटकत. या 'बेरार क्लब'च्या कार्यकर्त्यात पुढे दोन 'कार्ये' घडून आली. पुरुषोत्तम यशवंत देशपांडे–विमल कोल्हटकर आणि आत्माराम रावजी देशपांडे–कुसुम जयवंत हे दोन्ही विवाह त्या काळात खूप गाजले. पहिला देशस्थ–कोकणस्थ विवाह म्हणून बाबा–विमलाबाई यांचा विवाह नागपूर–वऱ्हाड भागाला धक्का देऊन गेला. त्यातून सावरतो न सावरतो, तोंच आप्पा–कुसुमावती या ब्राह्मण–कायस्थ विवाहाने, समाजाला जबरदस्त हादरा दिला. 'बाबा–विमलाबाई' हा वधुवरांनी स्वतः ठरविलेला त्या काळातला पहिलाच विवाह. व्यक्तिस्वातंत्र्याच्या तत्त्वाने बाबा भारावून गेलेले. लग्नासारख्या आयुष्यातल्या महत्त्वाच्या घटनेत वडील-धाऱ्यांच्या इच्छा 'आऊट ऑफ प्लेस' आहेत असं त्यांचं मत. देशपांडे कुटुंबाला त्यांचा हा आगाऊपणा मानवणारा नव्हता. 'मुलाचं लग्न' ही कुटुंबाच्या प्रतिष्ठेची बाब होती. बाबा एलएल्. बी. ची परीक्षा देऊन पुण्याहून निघाले, तोपर्यंत त्यांच्यासाठी वधू नेमस्त होऊन साखरपुड्यापर्यंत गोष्टी आलेल्या. भुसावळच्या स्टेशनवर, त्यांचे वडील बंधू हे शुभ वर्तमान घेऊन भेटले. आणि बाबा बंड करून उठले. त्यांनी त्या लग्नाला साफ नकार दिला. कोल्हटकर त्या मानाने खूप सुधारलेले होते. श्रीपाद कृष्णांशी केवळ रक्ताचंच नव्हे तर विचारांचंही नातं. विमलाबाईंचे वडील दिगंबर कृष्ण कोल्हटकर, हे श्रीपाद कृष्णांचे धाकटे बंधु. ते जज होते. त्यांच्या नेहमी बदल्या होत. म्हणून दहा वर्षांची होती तेव्हापासून त्यांनी विमलला हुजुरपागेत होस्टेलमध्ये ठेवली होती. एम्. ए. होईपर्यंत ती पुण्यालाच शिकली. तिने आपल्या पसंतीनं वर निवडावा हे कोल्हटकरांच्या घरात, चालणारं नव्हे तर आवडणारं होतं. 'आपल्या आज्ञेबाहेर नाही' ही तहहयात वराची, आणि खाली मान घालून होकार–नकार दोन्हीत जमा होणारी मान हलविणे ही समस्त 'नेमस्त' वधूंची, ज्या काळात विवाह–विषयक प्रतिष्ठा होती त्या काळात, वडिलधाऱ्यांनी अगदी साखरपुड्या-पर्यंत ठरविलेले लग्न मोडून, एवढेच नव्हे स्वतःच्या पसंतीने विमल कोल्हटकरशी लग्न करून, बाबांनी ४०–४५ वर्षांपूर्वीच्या त्या समाजाला केवढा जबरदस्त धक्का दिला असेल, हे 'परमिसिव्ह सेक्स'च्या आजच्या काळात समजणं कठीण आहे.

बाबांच्या पहिल्याच कादंबरीचा नायक प्रभाकर हा सुद्धा असाच धक्का देऊन जातो. 'बंधनांच्या पलि-कडे'ची किती तरी दिवस चर्चा झाली. 'खळबळजनक' असं तिचं वर्णन केलं जातं. बाबांची 'शॉक ट्रीटमेंट' अशी जबरदस्त की त्या काळच्या पुराणमताभिमान्यांच्या पग-ड्यांच्या झिरमिळ्या काळवंडून गेल्या. पु. य. देशपांडे हे काही वेगळंच प्रकरण आहे, असं प्रत्येकाला वाटलं. 'बंधनांच्या पलिकडे' या शब्दांचा उच्चार केल्याशिवाय लोकांना राहवत नसे. 'केसरी'लाही टीका करण्या-साठी का असेना, पण 'बंधनांच्या पलिकडे'ची दखल घ्यावी लागली. 'आम्ही बंधनांच्या पलिकडे नाही बरं का?' असं निदान खसखस पिकविण्यासाठी बोलल्याशिवाय वक्त्याला राहवत नसे. श्रीपाद कृष्णांनी तर कौतुकाने आपल्या जावयाला लिहिलं, "तुम्ही हा इतका स्वतंत्र विचार मांडला आहे की आमचा सुधारणा-वाद यापुढे तोकडा पडतो." 'बंधनांच्या पलीकडे' हा त्या काळात 'ताकिया कलाम'च झाला होता. बाबा कॉंग्रेस सोशॅलिस्ट पार्टीचे सक्रिय सदस्य होते त्या काळातली गोष्ट. १९३४ मध्ये मुंबईला कॉंग्रेसच्या अधिवेशनात घटना निर्मिति समितीवर कॉंग्रेस सोशॅलिस्ट पार्टीचे प्रतिनिधी निवडायचे होते. जयप्रकाश नारायण निवडणूक लढविणार होते. त्यांच्याबरोबर बाबांनीही निवडणूक लढविली. आश्चर्य हे की, बाबांना सर्वाधिक मते मिळाली. तसं पाहिलं तर, इतर उमेदवारांच्या तुलनेत त्या क्षेत्रात बाबा अगदी अप्रसिद्ध म्हणविण्याइतपत कमी माहितीचे, कमी प्रसिद्धी मिळालेले. पण महाराष्ट्रातल्या त्यांच्या मित्रांनी 'बंधनांच्या पलीकडेचा लेखक' असा त्यांचा प्रचार केला. हा प्रचार कादंबरीचा, की कादंबरी-काराचा हे सांगणं कठीण आहे.

असहकाराच्या चळवळीत उडी घेऊन कॉलेजवर बहिष्कार टाकणाऱ्या पहिल्या विद्यार्थ्यांत बाबा होते. इमर्सन वाचता वाचता त्याचे लेखचे लेख मुखोद्गत असणाऱ्या या कमालीच्या बुद्धिमान कॉलेज तरुणाला 'मानवी जीवन आणि मानवी दुःख' जाणणं हे एकच वेड! 'टू अनफोल्ड द मिस्टरीज् ऑफ ह्यूमन लाइफ'

हे माणसाचं जीवित कर्तृत्व आहे, असं मानत आले. रॉयिस्ट विचारसरणीनं त्या काळात ते प्रभावित झाले होते. कॉलेजशिक्षण पूर्ण करून बाबांनी वकीलीची वस्त्रं चढवली खरी पण 'अथातो दु:खजिज्ञासा' असं म्हणून मानवी दु:खांचं कोडं उलगडण्यात बाबा दंग ! मानवी दु:खाचं कोडं उलगडण्यासाठी फार पूर्वी एका राजपुत्र 'गौतमाने', संसारसुख सोडून बोधिवृक्षाखाली बसून चिंतन केले तर या 'पुरुषोत्तमाने' मार्क्सच्या विचारसरणीत बसून, तेच मानवी दु:खाचं कोडं सोडविण्याची खटपट चालविली. 'बुद्धं सरणं' गेल्याशिवाय मानवी दु:खांचा अंत नाही, असं बुद्धानं सांगितलं. तर वर्गविहीन समाजनिर्मितीशिवाय मालकी हक्कांवर प्रस्थापित झालेल्या या मानवी समाजातील दु:खं आणि पिळवणूक यांचा अंत होणार नाही, असं बाबा आपल्या भाषणा–लेखनातून म्हणू लागले. याच काळात ते सिव्हिल जज झाले. पण १९३१ मध्ये त्या पदाचा त्यांनी राजीनामाही दिला, आणि कॉंग्रेसमध्ये प्रवेश केला. गंमत ही की १९३१ पर्यंत तीन वर्षं ब्रिटिश राज्यसत्तेचा घटक असलेले बाबा, १९३२ मध्ये ब्रिटिश राज्यसत्तेचे भयंकर शत्रू ठरले. डॉ. पंजाबराव देशमुख बाबांचे बालपणापासूनचे मित्र ! नागपूर–वऱ्हाडचे कमिश्नर एकदा त्यांच्याजवळ म्हणत होते, "There is only one dangerous man in this province and he is P. Y. Deshpande." कमिश्नरचं असं मत असण्यालाही कारण होतं. ३१ साली अवर्षणामुळे वऱ्हाडचा शेतकरी मेटाकुटीला आला होता. त्यातही सरकारची सारा–वसुली सुरूच होती. सारामाफीचा अर्ज जर कोणी दिला, तर सरकार 'उदार' अंत:करणाने, त्याचा विचार करणार होतं. बिचारा अडाणी शेतकरी ! तो काय सारामाफीचा अर्ज लिहिणार ! तेव्हा वीर वामनरावांच्या बरोबर हिंडून बाबांनी संपूर्ण वऱ्हाड पालथा घातला. त्या काळात त्याला 'दौरा' म्हणत नसत. खेड्यापाड्यातल्या शेतकऱ्यांना एकत्र जमवून सारामाफीचा अर्ज देणं कसं आवश्यक आहे, हे बाबा पटवून देऊ लागले. शेतकऱ्यांकडून अर्ज 'लिहून' घेत. भाषणांना लाउडस्पीकर नसायचे. बाबा इतक्या आवेशानं बोलायचे की, वीर वामनराव अगदी सौम्य वाटावेत. आवेशाला शोभेल इतक्या मोठ्यानं बोलता बोलता, बाबांना खूप मोठ्यानं बोलायची सवय लागली आहे, ती अजूनही कायम आहे. वीर वामनराव म्हणजे वऱ्हाडचे पुढारी ! त्यांनी फुंकलेली 'रणदुंदुभी' च ती ! बाबांना प्रत्येक सभेत ते बोलू देत. काय बोलायचं याचे निर्बंध त्यांनी कधीच बाबांवर घातले नाहीत. बाबांनी खुशाल स्वतंत्र मतं मांडावीत. ती कॉंग्रेसच्या मतांशी कधी जुळत, कधी जुळतही नसत. पण त्यांनी बाबांना कधी अडवलं नाही. बाबांच्या त्या स्फोटक भाषणांनी शेतकरीवर्गात तर नाही, पण राज्ययंत्रणेत खळबळ माजली. त्या भाषणांनी प्रस्थापित समाजच काय, राज्यव्यवस्थाही कोसळते की काय अशी धास्ती सरकारच्या 'मोस्ट लॉयल अँड ओबिडिएंट' अधिकाऱ्यांना वाटू लागली. इतकं झाल्यावर कमिश्नरने बाबांना 'मोस्ट डेंजरस मॅन' म्हणू नये, तर काय 'रावसाहेब' 'रावबहादुर' असली पदवी त्यांना बहाल करण्यात यावी, अशी सरकारकडे शिफारस करावी ? १९३२ च्या जानेवारीत त्यांच्यावर खटला भरण्यात आला. त्यांच्यावर आरोप होता 'Spreading disaffection amongst loyal Indians'. खटल्याचा निकाल काय होणार, हे तर बाबा जाणूनच होते. बाबांनी स्वत:च आपली वकीली केली. वकील म्हणून त्याच केसमध्ये बाबा प्रथम कोर्टात उभे राहिले की काय न कळे, पण बाबांचं आरग्युमेंट जबरदस्त ! त्यांनी कोर्टालाच प्रश्न टाकला की "भारतीय नागरिकात ब्रिटिश सत्तेविषयी अफेक्शन आहे कुठे, ते दाखवा अगोदर !" असली आरग्युमेंटस् कितीही बिनतोड, सडेतोड इ. इ. असली तरी त्यांनी केस जिंकता येत नाही, हे पु. य. देशपांडे, वकील, अमरावती, यांस माहीत नसावं. बाबांना ९ महिन्यांची तुरुंगवासाची शिक्षा झाली.

तुरुंगात वाचन, मनन, चिंतन चालूच होतं. मानवी दु:खांचं निराकरण करण्यास आता कॉंग्रेसची विचारसरणी अपुरी वाटू लागली होती. 'सुकलेलं फूल', 'विशाल जीवन' तोपर्यंत प्रसिद्ध झालेल्या होत्या. डॉ. ग. य. चिटणीस बाबांचे फार जुने मित्र. सप्टेंबर १९३२ मध्ये तुरुंगातून सुटल्यावर मुंबईला चिटणिसांकडे गेले, आणि त्यांच्याशी चर्चा, विचारविनिमय करून अमरावतीला परतले. अजून कॉंग्रेसचे संस्कार पूर्णपणे मिटले नव्हते. अंबेच्या देवळात तेव्हा अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. बाबांनी 'टेंपल' सत्याग्रह केला. अंबेच्या देवळात हरिजनांसह प्रवेश केला. त्यांच्याबरोबर सहभोजनही केलं. १९३३ मधली

गोष्ट ही. त्या काळात अमरावतीच्या उच्च-भ्रू ब्राह्मणांना हा एक जबरदस्त धक्का होता. झालं, देशपांड्यांच्या घरी कोणी ब्राह्मण पूजा सांगायला, इतर धार्मिक विधीचं पौरोहित्य करायला जाईना. स्पष्ट कारण कोणी सांगत नसे. बहिष्कार घातला आहे, असं कुणी जाहीरही केलं नव्हतं. पण ब्राह्मणांनी देशपांड्यांचं घर टाकलं होतं, हे मात्र खरं. 'बाबांनी प्रायश्चित्त घेतलं तर ब्राह्मण पूर्ववत येत जाईल,' असं आडून आडून सुचविण्यात आलं. बाबांच्या आईनं ते ऐकलं न् ती भडकली. "माझ्या मिनिबाबानं देवीला लक्ष लक्ष प्रदक्षिणा घालून खूप पुण्य गोळा केलं आहे. त्याला प्रायश्चित्त देणारा ब्राह्मण त्याच्याहीपेक्षा पुण्यवान, श्रेष्ठ असायला पाहिजे. तसा कोणी आहे का उमरावतीत ?" असं त्या माउलीनं ठणकावून विचारलं. बाबांची श्रद्धा अत्यंत डोळस आहे. तो त्यांच्या आईनं घडविलेला संस्कार आहे. बाबा म्हणजे तिचा सर्वात लाडका मुलगा ! बाबांच्या लग्नातही, 'पुरोगामी पुरोगामी' असा घोषा न लावता, तिनं सहजपणे विमलाबाईंना आपल्यात सामावून घेतलं. 'एम्मे' झालेली विदुषी सून म्हणून आगाऊ कौतुक नाही आणि देशस्थांच्या घरातली नाही म्हणून 'माझ्या मिन्याला भुरळ की ग घातली मेलीनं' असा आकसही नाही. 'व्यक्ति स्वातंत्र्य' हा शब्द तिनं तोंडावाटे कधी काढला नाही, पण घरातल्या कोणत्याही माणसावर तिनं कसलीही बळजबरी केली नाही. आज बाबांची थोरली मुलगी निर्मला, विनोबांच्या भूदान कार्याला सर्वस्व वाहून बसली आहे, विनोबांच्या प्रत्येक आज्ञेचं निष्ठापूर्वक पालन करीत आहे, भूदानाच्या कार्यासाठी तिनं आपलं घरदार सोडलं आहे. पण बाबा अथवा विमलाबाई यांपैकी कोणीही तिला कसलीच आडकाठी केलेली नाही.

१९३४ मध्ये कॉंग्रेस सोशॅलिस्ट पार्टीची स्थापना झाली आणि बाबा तिच्यात सामील झाले. जयप्रकाश, मेहेरअली, मस्कारन्हेस हे त्यातले बाबांचे सहकारी कितीदा तरी बाबांच्या घरी येऊन राहून गेले आहेत. त्या काळात मेहेरअली, मस्कारन्हेस यांच्यासारख्या परधर्मीयांनी ब्राह्मणाच्या घरी राहणे, जेवणे केवळ अशक्य होते. पण बाबांच्या आईने त्यावर कधीच आक्षेप घेतला नाही. 'माझ्या मुलानं त्यांना घरी आणलंय् ना, मग त्यात काही विपरीत असणं शक्यच नाही.' असा तिचा बाबांवर विश्वास ! स्वत: बाबा कोणतेच धार्मिक कृत्य करत नसत. संध्यापूजादी विधी तर सोडाच, पण बाबांचा साधा नमस्कारही त्या काळात देवांच्या मूर्तींला घडला नसेल. 'क्रांति ही चॅरिटी सारखीच घरातनं सुरू होते.' अशा सुभाषितवजा वाक्यात बाबा त्याचं समर्थन करतील. मानवतेच्या ठिकाणी देवत्व आहे; अशी प्रगाढ श्रद्धा ! "घरात माणसांशी नोकराचाकरांशी धड प्रेमानं वागता येत नाही, अन् देवाच्या मूर्तीसमोर नाकं कसली घासता ?" असं सडेतोड बोलणं ! त्या काळातलीच गोष्ट. बाबांच्या वहिनी देवाच्या नैवेद्याचा स्वैपाक करीत होत्या. त्यांचा लहान मुलगा जवळच रडत होता. आईनं जवळ घ्यावं, एवढाच माफक त्याचा हट्ट होता. पण वहिनी होत्या सोवळ्यात. त्या लांबूनच बाळाला समजावीत होत्या. स्वैपाक चालूच होता. बाबांनी ते पाहिलं अन् त्यांनी मुलाला उचलून वहिनींच्या कडेवर दिलं. वहिनी भडकल्या, "अहो, सोवळ्यातला स्वैपाक चाललाय् माझा नैवेद्यासाठी अन् याला काय कडेवर दिलंत ?" बाबा ताडकन म्हणाले, "मुलाला रडवून देवाचा नैवेद्य करतेस, ते तुझ्या देवाला मान्य होईल का ? 'देव देव' करीत याला रडत ठेवणार आहेस का ? या मुलाच्या ठिकाणी तुला देवत्व नाही दिसलं ?" बरं झालं बाबांनी जजशिपचा राजिनामा दिला तो. नाही तर एखाद्या खटल्याच्या निकालात त्यांनी वादीलाच खडसावलं असतं, "लिबर्टी-इक्वॅलिटी-फ्रॅटर्निटी असं बोंबलता नुसतं, या भारतीयांना स्वातंत्र्य चाखू द्यावं, त्यांच्यात समता निर्माण होऊ द्यावी, त्यांच्याशी बंधुभावाने वागावं असं नाही कधी तुम्हाला वाटलं ते ! चला, युनियन जॅक गुंडाळा आणि पहिल्या बोटीनं इंग्लंडला चालू लागा." आणि स्वत:च युनियन जॅक गुंडाळून इंग्रजांच्या हातात ठेवलाही असता.

१९३४ मध्ये बाबांनी नागपुरात वकीली चालू केली. त्याच सुमारास कॉंग्रेसच्या विचारसरणीशी फारकत होऊ लागली होती. मानवी दु:खांचा अंत करणारी एकच विचारसरणी त्यांना दिसू लागली होती. बाबा कम्युनिस्ट झाले. तसा १९३३ मध्ये बडनेऱ्याच्या जिनिंग फॅक्टरीत त्यांनी संप घडवून आणला होता. त्यावेळी ते कॉंग्रेसचे कार्यकर्ते होते. सत्याग्रहाचा सर्वमान्य मार्ग सोडून त्यांनी हे कम्युनिस्टांचं संपाचं हत्यार वापरलं तरी कसं म्हणून वरिष्ठ गोटात बऱ्याचशा भुवया उंचावल्या गेल्या पण पटेल ते प्रत्यक्षात उतर

विण्याचा बाबांचा स्वभाव ! चार महिने संप चालू होता. शेवटी मिलमालकाने मजुरांपुढे मान तुकविली. त्यांच्या मागण्या मंजूर केल्या. बडनेऱ्याच्या मजुरांना बाबा साक्षात देव वाटले. मध्यप्रांत–वऱ्हाडात अत्यंत यशस्वी रीतीने पार पडलेला तो पहिला संप ! कम्युनिस्ट पक्षाच्या इतिहासात त्याची नोंद आहे की नाही माहीत नाही. नसणारच कारण पार्टीने घडवून आणलेला संप नव्हता तो. पण तो संप अभूतपूर्व ठरला. कारण बाबा त्याचे पुढारी होते. संपकाळात आपल्या तुंबड्या भरणारं नेतृत्व नव्हतं हे ! हे होतं एक झंझावाती वादळ. त्याला कॉम्प्रोमाइज माहीतच नाही. वेगाने, आवेगाने पुढं जाणं एवढंच माहीत. म्हणूनच "इंटरनॅशनल ग्लोबल डायमेन्शनस्‌च्या संदर्भात, राष्ट्रवाद" त्यांना निरर्थक वाटला. गांधींनी भारताच्या स्वातंत्र्याचा विचार केला, पण मार्क्सनं अखिल मानवजातीच्या स्वातंत्र्याला हात घातला आहे, अशी त्या काळात श्रद्धा !

याच काळात ते नागपूरच्या युनिव्हर्सिटी लॉ कॉलेजात प्रोफेसर झाले. कॉन्स्टिटयूशनल लॉ ते शिकवत. त्यांच्या अस्खलित, ओघवती वाणीचा प्रभाव एवढा की विद्यार्थी नसलेले लोकही त्यांच्या तासाला येऊन बसत असत. पण प्राध्यापकाच्या पेशातही 'पु. य.' पणा कायम ! १९४० मधली गोष्ट. लॉ कॉलेजच्या आवारातच युनिव्हर्सिटीचं वसतीगृह होतं. वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी कॉंग्रेसचा ध्वज फडकावून 'वंदे मातरम्' हे राष्ट्रगीत म्हटलं, अशी वार्ता पसरली. चौकशीचे हुकूम सुटले. वातावरण तंग झालं. तेवढयात दीक्षान्त समारंभ आला. केदार हे व्हाइस चॅन्सेलर होते. कॉन्व्होकेशनसाठी गव्हर्नरसारखी बडी धेंडं येणार. त्यावेळी कुठलाही 'अनुचित प्रकार' होऊ नये, म्हणून केदारांनी कडेकोट 'पोलिस बंदोबस्त ठेवला. बाबा, विमलाबाई, हरिहरराव आणि अ. ना. हे चार देशपांडे आणि वसंत वरखेडकर हे तेव्हा 'भवितव्य' चालवीत. बाबा त्यात 'हातोडा कोयता' चालवत. त्यांनी केदारांविरुद्ध आपलं हत्यार चालविलं. पोलीसांचे दंडुके परजून, युनिव्हर्सिटीचा कारभार चालविणं हे बाबांना पटूच शकत नव्हतं. बाबांना लॉ कॉलेजच्या नोकरीचा राजिनामा द्यावा लागला, एवढं सांगितलं तरी बाबांच्या 'हातोडा कोयत्यां' ची दाहकता किती असेल याची कल्पना येईल. स्पष्टवक्तेपणा हा खरोखर फार मोठा दुर्गुण आहे.

गांधींच्या 'चले जाव' प्रमाणेच 'ब्रिटिशांना युद्धप्रयत्नात सहकार्य देऊ नका' या आदेशाला, प्रत्येक भारतीय मोकळ्या गळ्याने साथ देईल, असं बाबांना वाटलं होतं. कम्युनिस्टांनीसुद्धा प्रथम युद्धप्रयत्नाला सहकार्य दिले नाही. पण रशिया इंग्लंडच्या बाजूने युद्धात पडताच, भारतीय कम्युनिस्टांनी आपला मोहोरा फिरविला. 'दोन साम्राज्यशाह्यांतील वर्चस्वाची स्पर्धा' स्वरूप असलेले दुसरे महायुद्ध एकाएकी 'लोकयुद्ध' ठरलं. ते पाहून बाबांना अगदी तिडीक उठली. कम्युनिझमची परिणती अशी पक्षीय हुकुमशाहीत होणार, याची खात्री पटून, त्यांनी कम्युनिस्ट पार्टीशी असलेले आपले संबंध तोडले. आणि गांधींच्या तत्त्वज्ञानाचा जो मूळ आधार, त्या उपनिषदांचा अभ्यास चालू केला. उपनिषदे, षड्दर्शन यांबरोबरच विज्ञानविषयक आधुनिकतम साहित्य यांनी ते या काळात झपाटलेले होते. डॉ. पेंडशांनी त्यांच्या या अध्ययन–मनन–चिंतनाला 'तपश्चर्या'च म्हटले आहे.

१९४७ मध्ये स्वातंत्र्य आलं. आकांक्षापूर्तीच्या आनंदात बाबांचे सहकारी बाबांना विसरले. पैसा, प्रतिष्ठा आणि पद यांच्या सोसाने, त्यांचे कित्येक सहकारी कोणी मंत्री, मुख्य मंत्री, कोणी गव्हर्नर, कोणी परराष्ट्रीय वकील झाले. विमलाबाई काही दिवस मध्यप्रांत–वऱ्हाडच्या मंत्रिमंडळात पार्लमेंटरी सेक्रेटरी होत्या. पण सत्तास्पर्धेच्या राजकारणात त्याही बाहेर फेकल्या गेल्या. अधिकार हाती आले तर त्यांचा दुरुपयोग करण्याचा मोह टाळता येत नाही; स्वातंत्र्यासाठी झगडणं वेगळं, आणि स्वातंत्र्याचा कारभार चालविणं वेगळं, या भावनेनं बाबा स्वतःच अलिप्त झाले. त्यांचे एके काळचे जिवलग राजकारणाच्या खेळात रंगून गेले. बाबा मात्र विज्ञाननिष्ठ अध्यात्माची संगति लावण्यात रमले आहेत. जोपर्यंत राजकारणाचा खेळ खेळत होते, तोपर्यंत भान हरपून तो खेळ खेळले. बाबांचा हा स्वभावच आहे, करायचं ते जिवाच्या आकांतानं करायचं. आता तत्त्वचिंतनात रंगले आहेत तेही 'भृंग अंबुजातले' बनून !

नासदीय सूक्त नीराजन, सप्तश्लोकी भागवत असली त्यांची पुस्तकं समजणारे तर राहोच पण वाचणारे तरी कितीसे लोक असतील ? पण बाबांना त्याची चिंता नाही. 'नागपूर प्रकाशन'चे घुमाळ, एखादं व्रत घेतल्याप्रमाणे बाबा जे जे लिहितात ते ते

प्रसिद्ध करतात. परवा परवा प्रसिद्ध झालेल्या 'भेरी-घोष की धर्मघोष' पर्यंत हे चालू आहे. त्यातून धुमाळांना काय फायदा झाला ते धुमाळच जाणोत. इतकंच निष्काम व्रत, विमलाबाईंचंही चालू आहे बाबा मात्र आपल्या पुस्तकांबद्दल अगदी बेफिकीर आहेत. विमलाबाई बाबांच्या 'गृहिणी सचिव: मिथ: सखी प्रियशिष्या ललिते कलाविधौ' नसत्या तर बाबांची इतकी पुस्तकं प्रसिद्ध झाली असती की नाही, शंकाच आहे. बाबा जे जे लिहितात, ते ते त्या सुवाच्य अक्षरात नकलून ठेवतात. बाबांच्या कितीतरी अप्रकाशित कविता, कथा, लेख त्यांनी व्यवस्थितपणे तारखा घालून, जपून ठेवले आहेत. आपण ते वाचायला मागितले तर म्हणतात, "बनारसला या. ७–८ दिवस सवड घेऊन या. आमच्याकडेच उतरा. मग देते."

आजकाल बाबा वाराणसीला जे. कृष्णमूर्ति फाउंडेशनमध्ये असतात. वाचन–मनन–चिंतन–लेखन हाच त्यांचा उद्योग आहे. त्यांचं निव्वळ तिथं राहणंही फार उपयोगी आहे असं कृष्णमूर्ति म्हणतात. 'अनामिकाच्या चिंतनिकेला' साहित्य अकादमीने पुरस्कृत केल्यावर, मराठी वाचकांचं बाबांकडे थोडं फार लक्ष गेलं पण "ऊः! 'बंधनांच्या पलीकडे' लिहिणारा नं, ठाऊक आहे काय लिहील ते." या छापाच्या कॉमेंटस्‌पलीकडे टीकाकार फारसे बाबांच्या वाटेला गेले नाहीत. आश्चर्य वाटतं. नुकताच पातंजल योगावर त्यांचा एक ग्रंथ जर्मनीत प्रकाशित झाला आहे. जर्मनीतसुद्धा त्यांचे चाहते आहेत, पण ज्या महाराष्ट्रात ते जन्मले, वाढले, रमले तिथे मात्र बाबांचं पुस्तक प्रसिद्ध करण्याचं 'व्रत' घेणारे धुमाळ एकटेच आहेत. पूर्वग्रहांनी डबडबलेल्या महाराष्ट्राला कदाचित हे माहीतही नसेल की कादंबरी, कथा, कविता, वेदांत अशा विविध क्षेत्रांत बाबांची लेखणी तळपली आहे. 'भवितव्य' हे भूतकाळात जमा झालेले साप्ताहिक आणि १९६२ पर्यंत 'नागपूर टाइम्स' ही वृत्तपत्रं त्यांनी चालविली आहेत. जीवनाच्या विविध, अगदी परस्परविरोधी क्षेत्रात त्यांची अशी देखणी कामगिरी आहे. तिचं कोणी कौतुक करावं अशी त्यांची अपेक्षा नाही. "हे सगळं तुम्ही कसं काय केलंत?" असा प्रश्न त्यांना विचारलात, तर सटकन उत्तर देतील, "मला तसं त्यावेळी करावंसं वाटलं, अगदी मनापासून वाटलं, म्हणून केलं."

माणूस आपल्या जीवनात असा एखादा क्षण अनुभवतो की त्यावरून आयुष्य ओवाळून टाकावं. विमलाबाईंच्या मुळे अशा अनुभवाचा क्षण बाबांच्या आयुष्यात आला. ती त्यांच्या 'मर्मबंधातली ठेव' आहे आणि ती त्यांनी अगदी जपून ठेवली आहे. बाबांच्या बुद्धीची असामान्य झेप पाहून विनोबांना सुद्धा त्यांच्याबद्दल आदर वाटतो. विमलाबाई तर पूर्णपणे 'पु. य.'-मय झाल्या आहेत. बाबांच्या सर्व लेखनाचा आणि मनन–चिंतनाचाही त्या 'कस' आहेत. या बेफाम वादळाला त्यांनीच एक व्यवस्थितपणा आणला आहे. 'पु. य. देशपांडे' या 'व्यंजनाला', 'स्वर' बनून त्यांनी 'अक्षरत्व' आणलं आहे. भगवंतांनी गीतेत ज्ञान, कर्म, भक्ती असे योग सांगितले. पण त्यांनी जो सांगितला नाही, असा एक योग बाबांच्या जीवन-'दर्शना'ने कळून यावा. तो हा 'प्रेमयोग.'

महाभारतात 'भगवान श्रीकृष्णाने' कुरुक्षेत्रावर 'पुरुषोत्तम अर्जुना'ला ज्ञानयोग, कर्मयोग, भक्तियोग ऐकवले. आज स्वतंत्र भारतात हा 'पुरुषोत्तम' गंगेकाठी साक्षात 'कृष्णमूर्तीला', मानवतेबद्दल अपार करुणा–योग, विश्वात्मक परमेश्वर–मानव योग, प्रेम-योग ऐकवीत बसला आहे.

बाबा कधी आत्मचरित्र लिहितील असं वाटत नाही. पण जर कधी त्यांना तशी बुद्धी झालीच तर त्याचं नाव मात्र 'माझं जीवन – एक वादळ' असं राहील, हे नक्की.

रामाला गं चंद्र हवा

मुरलीधर कुलकर्णी

माझी विदिशा अगदी वेडी आहे. तशी शहाणी आहे पण मी तिला वेडी म्हणतो. तिनं वेडं का होऊ नये ? ज्यांच्यासाठी वेडं व्हावं अशा अनेक गोष्टी जगात आहेत : हे माझं वाक्य नव्हे. ते आहे वि. द. घाटयांचं पण ते मला आवडलं. तशी विदिशाहि मला आवडते. आता ती जराशी स्थूलावलीय खरी. पण तरीहि ती मला मोह घालते. लग्नाला साताठ वर्षं झाली असतील. साताठ असं अनुमानधवक्या म्हणायचं कारण आता वर्षांचा हिशोब ठेवावासा वाटतच नाही. कारण आयुष्यात विदिशेला जे घडावं वाटतं ते घडतच नाही. म्हणून ती दुःखी. ती दुःखी म्हणून मीहि दुःखी. असं हे समीकरण. मी तिला गंमतीनंच वेडी म्हणतो तेव्हा ती चवताळतेच.

"विदिशा, जे प्रयत्नांनी साध्य होत नाही त्याची अपेक्षा करण्यात काय अर्थ ? " खरं म्हणजे माझ्या वरचाच माझा विश्वास आता साफ उडालाय. विश्वास उडाला की तत्वज्ञानाचा आधार घ्यावा. बरं वाटतं.

"तुम्ही पुरुष आहात. बायकांची दुःखं बायकांनाच ठाऊक. स्त्री होऊन जन्माला आला असतात म्हणजे कळलं असतं !" ती वसकन् अंगावरच येते आता जन्माला यायचं माझ्या हातात असतं तर सुरुवातीलाच मी जन्म बदलला असता. पण खरं तर माणसं आपल्याला जो जन्म लाभलाय त्यातच सुख मानतात. पुरुष स्त्रियांच्या जन्माची कीव करतात, स्त्रिया पुरुषांच्या. आता वरवर स्त्रिया 'नको गं मेला बायकांचा जन्म !' आणि पुरुष 'नको रे देवा पुरुषाचा जन्म' असं नेहमी विव्हळतात. तो स्टन्ट असतो प्रत्येकाचा. मला आता माझा जन्म चेन्ज करावासा मुळीच वाटतच नाही. माणसांच्या सेक्समधे नैसर्गिकपणे केव्हा केव्हा बदल होतो म्हणतात त्याची मला भीती वाटते. मी समजुतीनं, हळुवारपणं म्हणतो,

" मला सारं कळतं गं विदिशा. पण जे नशिबातच नाही त्यासाठी वेड्यासारखं धावणं, त्यासाठी वाट्टेल ते मूर्ख उद्योग करणं याला अर्थ काय ? आपला परमेश्वरावर भार द्यावा." आता हा परमेश्वरहि मला पटत नाही. कारण परमेश्वर भल्याचं भलंच करतो म्हणतात. पण मग त्या गाणेवाल्यानं " मूर्ख भोगितो राजवैभवा ! पंडित फिरत भिकारी " असं कशाला म्हटलं असतं ? हे सारं परस्पर विरोधी दिसू लागलं की जीवनावरचा विश्वास उडतो. मी म्हणतो ते तिला कधी पटत नाही. कारण मनातून मलाहि ते पटलेलं नसतं. पटत नाही त्याच्या डोक्यात उतरवणं महाकर्म कठीण ! मी तिला शब्दांनी चुचकारतो आणि केसांवरून हळुवार हात फिरवतो. विदिशेचे केस काळेभोर नि भरगच्च आहेत अजून. मला काळेभोर भरगच्च केस आवडायचे म्हणूनच मी विदिशेला पसंत केलं. नितंबांच्या खालपर्यंत झोके घेणाऱ्या वेण्या पाहिल्या की मलाहि डुलायला व्हायचं

" अगं माणसानं धीर सोडू नये आणि वेडी आशा धरू नये. जे होतं त्याकडं पहात रहावं. " मी म्हणतो. मी जे म्हणतो त्यात परस्पर विरोध असावा की काय अशी मनात शंका. पण मी एकदा काही तात्विक बोलायला लागलो की काय बोलतो हेच मला कळत नाही.

"अहो स्थित:प्रज्ञ, समजा एखादा फ्रॉड अंगाशी येऊन तुमची नोकरी गेली तर तुम्ही जे जे होईल ते ते पहातच रहाल ?" ती फिस्कारते. मी दचकतो. माझ्या वर्मावर बोट म्हणजे मी एकामागून एक फ्रॉड करतो असं हिला म्हणायचंय की काय ? मी आपला गरीब मध्यमवर्गीय. मला नोकरी प्रिय. सुटली तर दुसरी मिळवण्याची माझ्यात हिंमत नाही. येता दिवस आनंदानं साजरा करणं हे मध्यमवर्गीयाचं लक्षण. नोकरी सुटून कसं चालेल ? खायचं काय ? अर्थात माणसाला पोट नसतं तर माणूस किती सुखी झाला असता हा गुळगुळीत झालेला तात्त्विक प्रश्न मनात. नेहमी फ्रॉड करून कसं चालायचं ? कायदे आहेत ना ! नाहीतर मोठी सत्ता हातात असायला हवी. सत्ता हातात

असली की आपली पापं दुसऱ्यांच्या माथ्यावर मारून मोकळे. मी आपला द्वितीय श्रेणीतला अधिकारी. एक गुलाम. पोट भागतंय. पण पोट भागूनहि इतर गरजा संपत नाहीतच म्हणा: उदाहरणार्थ माणसाला खायला प्यायला नसलं तरी बायको किंवा बाई पाहिजे. बायको असली तर पोरं पाहिजेत आणि पोरांच्या मागं सगळं काही आलंच. सगळ्या गरजा. शेकडोंनी, हजारोंनी गरजा. आमच्या विदिशेला नाही का पोर व्हावं, वाटतं? ही तिची अत्यंत निकडीची गरज. पोर व्हावं मग मुलगी असो की मुलगा. त्यासाठी तिची केवढी घडपड! आणि तिच्याबरोबर माझीहि. वास्तविक मला त्याचं फारसं कांही नाही. कारण मी पुरुष. ती नेहमी टोचून म्हणते, "तुम्ही पुरुष आहात. तुम्हाला काय कळणार स्त्रीची भावना." खरंच आहे. नाहीतर तुकारामांनी कशाला म्हटलं असतं 'जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे.' दुरून डोंगर साजरे ही म्हण तयार करणाऱ्याला केवढा मोठा अनुभव पदरात बांधावा लागला असेल. जवळ गेलं की रौद्रता आणि भीषणतेचा अनुभव. दुसऱ्याचं दुःख शीतलच. मग ती बायको म्हणजे अर्धांगी का असेना प्रत्येकानं आपल्या दुःखाचा पाढा दुसऱ्या जवळ म्हणावा हा जगाचा नियम. त्याला वाटतं आपल्यासारख्या यमयातना दुसरा कुणी भोगत नसेल. पण प्रत्येकाच्या जीवनात तेवढंच दुःख असतं हे त्याच्या लक्षात येत नाही.

मला एकदा अनंतराव बोलता बोलता म्हणाले,

"मिस्टर नाझरे, काय कमी आहे हो तुम्हाला? आज उद्या गॅझेटेडची पोष्ट मिळेल. पैसा चिक्कार मिळतो पगाराचा. शिवाय चायीपायी. ईनमीन दोन माणसं. मजा करा मजा!" यावर मी काय बोलावं? प्रथम नुसता हसलो. आहे का नाही परदुःख शीतल?

"खरं आहे अनंतराव. पण तुम्ही आमच्यापेक्षा लाख पटीनं सुखी हे तुम्ही विसरता."

"हॅं: हॅं: हॅं:" विडीनं पिवळे धम्मक पडलेले दात दाखवंत अनंतराव हसले. "अहो कसलं आलंय सुख! मी साधा हेडक्लार्क. मिळतंय काय तर सारे साडेतीनशे. आणि घरात चौदा माणसं. ती म्हणतेय, मला पुन्हा मळमळायला लागलंय. काही काही खावं वाटतंय. मी म्हणतो, पुरे झालं मावली आता! मी ऑपरेशनच करून टाकतो हॅं: हॅं:" आहे की नाही गंमत! देव का परमेश्वर ज्याला द्यायचं त्याला छप्पर फाडके देतो. आमच्या विदिशेच्या वाट्याला अनंतरावाच्या बायकोच्या वाटणीतून तरी काही तरी यावं!

"भाग्यवान आहात अनंतराव. घरात एवढी पोरंबाळं. गोकुळ नांदतंय!"

"कसला भाग्यवान मिस्टर नाझरे! कसंतरी रेटायचं. थोरला कॉलेजात जाऊ लागलाय. त्याला फी शिवाय टेरेलिनची पॅंटहि हवी. हायस्कुलात जाणारी चार पाच मंडळी रोज डोकं भणकावून टाकतात. एक म्हणतं छत्री पाहिजे, एक कंपास, एक दोनशे पेजेस्‌च्या पंधरा वह्या. तर एक भूक लागली म्हणून अंगठा चोखत बोबलतंय. फारच भयंकर!"

"आणि तरी तुम्ही ते सारं सोसता. आनंदानं सोसता. साजरं करता. विरोधाभास आहे हा अनंतराव. जीव देण्याची इच्छा कशी होत नाही तुम्हाला?"

"जीव जात नाही म्हणून हातपाय खोडायचे. हॅं: हॅं:" अनंतरावांचे पुन्हा पिवळे दात. अनंतराव मलाच उपहासानं हसत तर नाहीत ना? अशी मला शंका.

"खोटं आहे अनंतराव हे! तुम्ही देखावा करता आहात, तुम्ही माझी चेष्टा करत आहात हे असलं रडगाणं लावून. जा, आपलं काम करा जा!" गृहस्थ एकदम दचकला. नाकावरील चष्म्यातून माझ्याकडं बघत गुपचुप उठला निघून गेला. मला त्याच्या मानभावीपणाची तिडिक आली. साला माझी चेष्टा करतो? मनात परमेश्वराला आठवून म्हटलं, देवा ज्याला द्यायचं त्याला कुठं ठेवू नि कुठं नको असं करायला लावतोस आणि काहींना आशाळभूतपणानं बघायला लावतोस. दात आहेत त्याला हरबरे नाहीत, हरबरे आहेत त्याला दात नाहीत. धन्य तुझी!

अनंतरावांवर मी खेकसलो पण ते माझ्या हाताखाली काम करत नाहीत. काही गोष्टी माणसाच्या किती अंगवळणी पडतात. उदाहरणार्थ मी ऑफिसरासारखा खेकसलो आणि अनंतरावांनी निमुटपणं कारकुनासारखं ऐकून घेतलं. आपल्या टेबलाकडं गेल्यासारखे निघून गेले. मग विदिशेला आपलं स्वतःचं जीवन का अंगवळणी पडू नये? 'आहे ते खरं, नाही ते खोटं.' असं मानण्याची वृत्ती का नाही? गोष्ट चांगली की वाईट? वाईट म्हणावी तर प्रत्येकजण मिळतं त्यात समाधान मानतं. मग जगाची प्रगती वगैरे

झाली नसती. आम्ही चंद्रावर पोचलो नसतो. खरंच चंद्रावरचा एखादा दगड घरात हवा ! किंमत पडेल ती देऊ. त्याचा एक खडा अंगठीत बसवून घेऊ. गुरु शनीच्या खडयांसारखा. चंद्र आपल्या घरात खेळेल. मग विदिशेला 'रामाला गं चंद्र हवा' हे गाणं म्हणायचं कारणच पडणार नाही. चंद्र शोधायला आकाशात जायची मग गरजच काय ? मग राम ? विदिशा तर रामाची वाट पहातेय.

घरात रोज चिमण्या येतात. चिमण्या ज्याअर्थी असतात त्याअर्थी घरात त्या येणारच ! एकदा एक चिमणी आली. मी सज्जात वाचत बसलेलो. ती एकटी नव्हती. तिच्याबरोबर तिचं पिलू. धिटाईनं ती माझ्या अंगावरून घरात गेली. ताटात तांदूळ होते त्याचा वकाणा भरून तिथंच पिलाला भरवू लागली. विदिशेनं ते पाहिलं. मला आत बोलावलं.

"अगं माहित आहे गं चिमणीच ना ?" विदिशेला कसल्याहि गोष्टीचं कौतुकच फार.

"अहो पण ती पहा कशी भरवतेय पिलाला."

"मी वाचतोय्." वृत्तपत्रातल्या बातम्यात मी गुंगून गेलेलो.

"सदान् कदा तुम्ही तुमच्यातच दंग कसे हो ? आधी या इकडं !" मी गेलो. "बसा इथं" बसलो. तिनं मग डाळ तांदूळ, पोळीचे तुकडे अशा बऱ्याच गोष्टी थोडया थोडया करून ताटात घातल्या. सज्जाच्या दारात ताट ठेवलं. ती चिमणी उडून सज्जाच्या कठडयावर बसलेली. आपल्या पिलाला ती काहीतरी समजावून सांगत होती.

"लक्षात ठेव बाळा, ही माणसं आहेत हां ! माणसं निष्ठूर, विश्वासघातकी असतात."

"आई, मला ती रे. टिळक नावाच्या माणसाची कविता शिकवलीस ना. ती माझ्या चांगली लक्षात आहे. क्षणोक्षणी पडे उठे परि बळे–"

"होय बाळा, माणसाच्या विश्वासघातकीपणाचं माणसानंच वर्णन केलंय तिच्यात. शिवाय माणसं खोटारडीहि असतात आणि असमाधानी तर त्याहून. आपणा पक्षांच्या पोटाला मिळालं की आपल्या गरजा संपतात. तशा यांच्या कधी संपतच नाहीत. हे मिळालं की ते हवं. ते मिळालं की आणखी काही हवं. असं सारखं चाललेलं असतं यांचं. ती काळुंद्री कोकिळा कुहू कुहू गाते. माणसं हाव हाव करतात. गात नाहीत विव्हळतात."

"मग माणसांपेक्षा आपण पक्षी बरे नाही आई ?"

"क्रूर पशू वाघ, सिंह, साप हे देखील यांच्या-पेक्षा बरे बरं बाळा. शतपटीनं बरे. कारण त्यांची भूक त्यांच्या पोटाएवढीच असते."

"आणि यांची ?"

"यांची पोटापेक्षा भयंकर मोठी !"

"पोट तर लहान दिसतं आई यांचं !"

"दिसतं तसं नसतं राजा."

"माणसं आपल्याला काय करतात ?"

"पकडतात आणि मांजर उंदराला खेळवतं तसे हाल करतात. पायाला दोरी बांधतात. यांची मुलं, मोठी माणसं पिंजऱ्यात म्हणजे तुरुंगात डांबून ठेवतात. यांच्यावर विश्वासून मुळीच राहू नकोस. आणखी एक लक्षात ठेव. सगळीच माणसं क्रूर नसतात. एखादा खूप चांगला असतो. उदार असतो."

"तू एकदा असं म्हणतेस एकदा तसं. काय समजावं ?"

"बहुतेक सारी माणसं वाईटच पण लाखात किंवा त्याहि पुढं अब्जात म्हण, एखादा माणूस बरा असतो त्या माळा वरल्या वडावर ते गिधाड आजोबा रहातात ना ? ते सांगतात की याच माणसांमधे लोकमान्य टिळक नावाचे पुरुषोत्तम होऊन गेले. ते इतके दयाळू होते की तुरुंगात असताना पक्षी त्यांच्या अंगा खांद्यावर उडया मारीत. त्यांच्या थाळीतलं अन्न खात."

"गंमतच सांगतेस एक एक आई !"

"तो अपवादच. तरीहि मानवजातीवर विश्वासून रहायचं नाही. आजवरच्या आपल्या पिढयांनी हा अनुभव पदरी बांधलाय्. तुलाहि हे लक्षात ठेवायला हवं. चल, आपण इथून उडून जाऊ या. यांच्या मनात काहीतरी आहे तो खुर्चीवर बसलेला आणि सैंपाकघराच्या दारात उभी असलेली ती. कसे टपून बसले आहेत आपल्यावर! निश्चित त्यांच्या मनात आपल्या बाबतीत काहीतरी काळंबेरं आलेलं दिसतंय."

चिमणी उडाली. पिलूहि तिच्या मागोमाग दूर उडून गेलं. विदिशेचा चेहरा पहाता पहाता गोरामोरा.

नंतर रडायलाच लागली. धावत जाऊन मी तिला बुझावीत म्हटलं,

" विदिशा, हे काय वेडचासारखं ? "

" आपल्या नशिबात कुठलंच सुख कसं नाही हो?"

" वेडी का विदिशा तू ? मानलं तर सुख आहे."

" आपण हाजीमलंगला जाऊ या का ? " तिचा बिनचूक प्रश्न.

" हे काय काढलंस नवीन ? "

" म्हणतात, हाजीमलंगला गेलं की इच्छापूर्ती होते. "

" कोण म्हणालं ? "

" ते पुण्याचे आपटे. त्यांच्या मिसेस म्हणत होत्या. जायचं गडे ! "

विदिशाचं मन मला कधी मोडावं वाटत नाही, म्हणजे मला तिची दया येते. मी माझीहि कीव करतो आणि स्वतःलाच शरण जातो. आपण काही द्यायला असमर्थ असलो की अपराधाची भावना निर्माण होते. आणि मग आपण कुणालाहि शरण जातो. मलाहि अपराधी वाटतं पण म्हणून मी शरण जातो असं नाही. नेमकं काय होतं हे माझं मलाच कळत नाही. मीच मला सापडलेलो नाहीयू. नेमका 'मी' कोण आणि कसा ? सांगता येणार नाही. 'मी असा मी तसा' म्हणणारा माणूस शेवटपर्यंत स्वतःलाच फसवत असतो. मी विदिशेचं म्हणणं मान्य केलं. शरण गेलो म्हणा अगर विदिशेवर माझं जिवापाड प्रेम म्हणून म्हणा अगर तिचा माझ्यावरचा विश्वास उडू नये म्हणून म्हणा.

आम्ही हाजीमलंगच्या पहाडाच्या पायथ्याशी आलो. तो उंच डोंगर आणि त्यावर सफेद रंगवलेलं देवालय. विदिशेचा उत्साह. आम्ही पायी वर चढू लागलो. आता समोवताली दुर्लक्ष कसं होणार ? चहू बाजूंनी पायथ्याशी दाट झाडी. रस्ता वळणांचा वर चढतोय. पक्ष्यांचे चित्कार. क्वचित माकडं झाडांवर उड्या घेणारी. उन्हं चढलेली. सावल्यातला थंड रस्ता. विदिशा अवखळपणानं धावतेय्. हाजीमलंगला जाणारी सर्व धर्माची माणसं मागं. मी विदिशेला सहज म्हटलं,

" विदिशा हा मुसलमानांचा देव ना गं ?"

" मग काय झालं ? कुठल्याहि धर्मातला देव म्हणजे देवच ना ?"

" आपण हिंदू आहोत. "

" आ हा हा, अगदी कट्टर हिंदू तुम्ही. संध्या म्हणून दाखवा बघू, "

" खरं तर माझा कुठल्याच – "

" देवाधर्मावर विश्वास नाही. मग जा ना इथून माघारी. तुमचा जिथं तिथं मोडता. "

" घरीच बोलणार होतो मी ! "

" मग इथं वाटेवर तमाशा कशाला ?"

" मी बुद्धिवादी ऑफिसर आहे. लोक हसतील."

" पुण्याच्या आपट्यांना नाही कोणी हसत ते ? कार घेऊन येतात पुण्याहून स्वतःची. "

" व्यापाऱ्यांना ते शोभून दिसतं. गडगंज श्रीमंतीचे लोक दैववादी असतात. म्हणूनच लखोपती, नट-नट्या बुवांच्या मागं फिरतात. "

" माणसंच ना ती ?"

" माणसा माणसात फरक असतो. "

" चलायचं का माघारी ? अगोदर होकार द्यायचाच कशाला ?"

" तुझ्यासाठी मी कधी नाही म्हणतो ? मनातलं बोलून दाखवायची पण चोरी ?"

झाडं-दगडं मागं मागं जात होती. चढानं विदिशेच्या धापा. उरावरचा चढ. माझ्याहि धापा. थोडा विसावा घेऊन वर पोचलो. देवदर्शन झालं. देवळात देवच नव्हता. बाहेर झाडाखाली विसावा घ्यावा म्हणून वळलो. भूक. विदिशेनं डबा आणलेला. थर्मासमध्ये फर्मास कॉफीहि.

झाडाखाली फकिरासारखा एक दाढीवाला आदमी. तो म्हणाला,

" आवो, खुदाके नामसे नसीब अजमावो !" मग अस्खलीत मराठी. कदाचित आमचं बोलणं ऐकून. "अल्लाच्या दरबारात आलात अल्ला तुमच्या मनांतलं इच्छित पूर्ण करील. " माझ्याकडं बघून तो सारं भूत सांगायला लागला. " बच्चा, तुझं आयुष्य आरामात गेलं. कसली ददात नव्हती. भाग्यवान होतास. सारी सुखं पायाशी. नोकरीहि बडी. पैसा आहे. पण बेटा, संसारात मुलंबाळं असल्याशिवाय गंमत नाही !"

" फकीरजी, म्हणूनच आम्ही इथं आलोत. "

"अल्लाच्या दरबारात न्याय आहे ! बिबीजी चिंता जिवाला जाळते. अल्ला भलं करील, चिंता सोडा."

"काय करायला हवं फकीरजी ?" बिबीजी.

"गुरुवारी उपास करा अल्लाच्या नावानं. अंगारा देतो तो दर गुरुवारी शुद्ध होऊन लावत चला." म्हणताना त्यानं लाकडाची धुनी पेटवली. झोळीतून ऊद काढून विस्तवावर टाकत तो काहीतरी पुटपुटू लागला. ते मंत्र असावेत. "बैठो बेहेनजी. इथं बसा !" विदिशेनं माझ्याकडं परवानगीदाखल जणू पाहिलं. मी हळूच म्हटलं,

"लक्षणं ठीक दिसत नाहीत."

"तुम्हाला ज्याचा त्याचा संशय."

"अशा छा छू वर माझा विश्वास नाही." हे बहुधा फकिरानं ऐकलं असावं.

"हे छाछू नाही बाबूजी. अल्लाच्या दरबारात येणाऱ्यानं तरी त्याच्यावर विश्वास ठेवावा. आम्ही जाणतो अंतर्ज्ञानानं. तुमचा तो आहे म्हणून इथं आलात."

बहेनजी बसल्या. तो पुन्हा मंत्र पुटपुटू लागला. आल्या मंतर कोल्या मंतर कोल्याची आई कांदे खाई छूऽऽऽ. संपलं. बहेनजीच्या कपाळी अंगारा लागला. मलाहि जबरदस्तीनं लावावा लागला. बाकीचा पुडीत बांधून दिला. विदिशा उठू लागली तसा तो म्हणाला,

"बहेनजी, दक्षणा !"

"द्या त्यांना काहीतरी."

"काय द्यायचं ?"

"द्या पन्नास रुपये" फकीरजी डोळे बंद करून म्हणाले. दाढी हलत होती.

"देऊन टाका !" विदिशा म्हणाली. "देवाला नाही म्हणू नये."

"अग पण—"

"आला तुमचा पण !"

"हो आपला कार्यभाग आहे. देवांचा नाही."

"उगाच लांबण नको."

सभोवताली तमाशाला दहाबारा माणसं. आणखी जमू नयेत म्हणून मी अल्लाच्या हातावर पाच नोटा ठेवल्या. मनात म्हटलं, लवकर पावरे अल्ला विदिशेला. पुढं अल्लाला कार्यबाहुल्यामुळं वेळ झालाच नाही. एकाची का आकांक्षा पुरी करायची त्याला ?

पुन्हा एकदा विदिशा म्हणाली,

"आपण तुळजापूरला जाऊं या !"

"तिथं काय आहे ?"

"भवानीमाताचे दर्शन घेऊ. जसं काय ठाऊकच नाही, खणानारळानं ओटी भरीन म्हणते, अभिषेक करीन म्हणते."

"त्यानं काय होतं ?"

"मला आपलं वाटतं."

"चला."

तुळजापूर गाव उंचावर. टुमदार देवळात पोचलो. प्रथम गायमुखीत अंघोळ. पाणी फार थंड नि रुचकर. दिवस उन्हाळ्याचे. मस्त वाटलं. प्रवासानं आंबलेलं अंग मोकळंमोकळं झालं. गायमुखीतलं पाणी थंड नि गोड. भरपूर प्यालो. तसं पाणी इतर कुठं नसेल. जुनाट दगडी बांधणीचं देऊळ. मन प्रसन्न झालं. तामस विचार नष्ट. शुद्ध वाटलं. कुठल्याहि क्षेत्राचा असाच प्रभाव असावा. दर्शन घेतलं. देवी श्रीमंत आहे. अंगावर सोन्याचे भरगच्च दागिने की देवी वाकून गेलीय. वस्त्राभरणं, दागिने. त्यातून फक्त मुख दिसणारं. खूप बरं वाटलं. भारूडाचे सूर मनात—'लवकर पाव गं मला भवानी आई रोडगा वाहिन तुला।' उपहास वगैरे नाही. भारून गेलो. विदिशेनं ओटी भरली, अभिषेक केला. सारं मनासारखं. पण विदिशेची ओटी ? ती तशीच रिकामी राहिली !

एके दिवशी ऑफिसातून दमून आलेलो. एका कारकुनानं केलेली चूक निस्तरण्यात सबंध दिवस गेलेला. डोकं खलास. दारात पाऊल आणि धावत विदिशा गळ्यात. अगदी सूरच काढला

"अगं झालं तरी काय असं ?"

"मी एवढी नतद्रष्ट कशी हो ?"

"झालं काय ते तर समजू दे !"

"चिमणीचं पिलू हो ! मेलं ते बिचारं, मला कसं यशच नाही ? इतकी मी पापी ?"

"जाणूनबुजून पाप करणाऱ्याला पाप ! पण कोणतं पिलू ? त्या दिवशीचं ?"

अनुक्रमणिका

"कदाचित तेहि असेल. स्वेटर विणीत होते. ते सज्जात आलं. केविलवाणं बघतंय. थरथरत धापा देतंय. जवळ गेले तर दबून चिवचिवू लागलं. उचललं. घरात आणलं. तांदळाचे दाणे ठेवले. ढुंकून बघितलं नाही. पाणी ठेवलं वळून पाहिलं नाही. चोचीत पाणी घातलं. नुसतं ओरडतंय. थरथर वाढली. डोळे मिटले. शुकशुक केलं तर डोळे उघडी, मिटून घेई. मग पायच लुळे पडले. कोलमडलं. पाय सोडले आणि सारं शांत. मेलं ते." तिचं ढसासून रडं. रे. टिळकांच्या कवितेतील पक्षिणीच तर नव्हती? मातीत ते पसरले-- माझ्या डोळ्यांसमोर पक्षिणीच तडफडत होती.

"त्यात एवढं काय वाटून घ्यायचं विदिशा? वेडी का तू? मांजर पाठी लागलं असेल. कावळ्यांनी पकडलं असेल. चोची मारल्या असतील. ते अर्धमेलं घरात आलं नि मेलं!"

"पण मी म्हणते मरायला आपलंच घर कसं सापडलं त्याला?"

"योगायोगाच्या गोष्टी असतात या. कुठंतरी मरायचंच ते इथं येऊन मेलं. वाईट वाटून नको घेऊस. उगी."

"मी त्याला कोरा कपडा गुंडाळला. वर गुलाल टाकून बागेत पुरलं. त्या ठिकाणी गुलाबाची फांदी लावलीय्." रुद्ध होऊन ती म्हणाली.

"विदिशा, भारी हळवी तू!"

"देव माझा असा का अंत पहातो हो?"

"कोणी कोणाचा अंत पहात नाही. देवाला पुष्कळ इतर कामं असतात!"

विदिशेनं मुलांची खूप खेळणी विकत आणलेली. तिच्यावर भारी प्रेम. एका काचेच्या कपाटात सुंदर लावलेली. समोरच्या माणसाकडं बघून त्या खेळण्यातल्या वस्तू हसतात. ढोल वाजवणारे माकड, तुडतुड नाचणारा ढेरपोट्या माणूस. मान हलवणारा कुत्रा. हसणाऱ्या नि डोळे फिरवणाऱ्या बाहुल्या. चावीच्या मोटारी. आदिवासी स्त्री. मातीची बाहुली. बाहुलीला विदिशेनं सुंदर भर्जरी कपडे शिवलेले. इतकी सुंदर दिसते विचारू नका! मोठेमोठे डोळे. जिवणीत मिस्किल हास्य. बाजारात एकदा पाहिली नि विदिशेनं घेऊनच टाकली. विदिशेच्या हौसेला मोल नाही. विदिशा कधी तिला मांडीवर घेऊन गाते — "रामाला गं चंद्र हवा, चंद्र हवा—"

आणि बदली झाली. म्हणून सामानाची बांधाबांध. सगळं आवरलं. आता खेळाचं कपाट. मी तयारीला लागलो. तर विदिशेचा माझ्यावर कुठला विश्वास असायला!

"आता काय बांधायचंय?"

"तुझी खेळणी."

"तुम्ही नका पॅक करू. मी करीन. काही फोडाल, तोडाल, तुम्ही बाजारातून दोरी आणा. गाद्या बांधायच्यात. चला तुम्ही." मी बाजारात.

घरी येतो तो विदिशेनं चक्क जमिनीवर फतकल घातलेलं. आणि सूर लावलेला.

"कसं असं झालं गं माझी बावी! मेली मीच नतद्रष्ट."

"आता काय झालं विदिशा?"

"हो बघा हो माझ्या बावीची अवस्था!" पाहिलं तर बाहुलीचे तुकडे तुकडे! ते विदिशा मांडीवर घेऊन रडतेय.

"अगं मग रडतेस काय वेड्यासारखी? मातीची तर बाहुली. फुटणारच!"

"मातीची खरी हो पण हाडामांसाच्या माणसासारखा जीव लावला मी. जातेवेळंस असा दगा दिला. बघा हो कशी केविलवाणी दिसतेय." चालतं बोलतं माणूस गेल्याचं विदिशेला दुःख. "तुम्ही ऑफिसात गेल्यावरं मी हिला मांडीवर घ्यायचे, आंदुळवायचे. भरवायचे. झोका बांधायचे. ते सारं संपलं हो!"

"अगं बाजारातून दुसरी आणता येईल."

"बाजारात सत्राशेसाठ मिळतील हो. पण ही पुन्हा नाही मिळायची. आता कुठं शोधायचं गं बावी तुला?"

"कशी फुटली ती विदिशा?"

"खोक्यांत भरत होते. निसटून पडली. लक्कन काळीज झालं बघा. मीच दुर्दैवी."

"कॉफी कर विदिशा. निघायचं थोड्या वेळात. क्षुल्लक मातीच्या बाहुलीकरता रडत काय बसलीस?"

अनुक्रमणिका

ती उठली नाही. निर्जीव वस्तूला जीव लावला तिनं. तिच्या भावना मला समजत होत्या. पण माणसानं हळवं किती असावं? हाडामांसाच्या माणसाला तरी आपण किती दिवस आठवतो? विसरावंच लागतं. आपोआप विसरलं जातं. उरते अंधुक स्मृती. मनावरली खूण.

विदिशेनं घरावरहि प्रेम केलेलं. घर सोडायच्या वेळेला तिचं नुसतं आतबाहेर. घर कुणाला सोडावं वाटेल? पण नोकरीवाला म्हणजे विंचू. त्याचं बिऱ्हाड पाठीवर. हे विदिशेला केव्हा कळणार? घर खरं भाड्याचं. सगळं बारकाव्यानं ती बघून घेत होती. खिडक्या, दारं, कपाटं, देवांची जागा. भिंतीवरून हळूवार हात फिरवीत होती. चौकटी चाचपत होती. आता निर्जीव घर तिला कसली साद देणार?

"विदिशा आता मोह आवर. बाहेर टॅक्सी उभीय्."

"घर देखील सोडून द्यायचं हो? किती आठवणी जपल्यात आपल्या या घरानं! चिमणी चिमणीचं पिलू. मेलेलं पिलू, माझी बाबी आणि हे सबंध घर माणसासारखं. कायमचं मनात घर करून राहिलेलं. कसं सोडायचं? हे बंध कसे तोडायचे?" मग तिला चटकन कसली तरी आठवण आली. तिनं दशम्याच्या डब्यातून चतकोर पोळीचा तुकडा काढला. थोडी बटाट्याची भाजी त्यावर. एका कोपऱ्यात ते सारं ठेवलं. थोडे पोळीचे तुकडे सज्जात विखरून दिले. पुटपुटत, "चिमणी न् तिचं बाळ येईल ना!" थोडी वाट पाहिली. कुणी आलं नाही. डोळे डबडबलेलेच. तेवढ्यात एक चिमणी आली. तुकडे वेचू लागली. विदिशेचा चेहरा फुलला. "चला आता!" मी दार बंद केलं. चावी मालकाकडं नेऊन दिली. सामान पुढं गेलेलंच होतं. विदिशा बळेबळे टॅक्सीत जाऊन बसली. पुन्हा कसली तरी आठवण.

"थोडं थांबा आले हं!"

"त्याचं बिल वाढतंय."

"दोन मिनिटं. तुम्हीहि चला."

"चला."

निघाली. पाठोपाठ मी. बागेत. एका रोपट्याजवळ. तो गुलाब होता. त्यावर एक टपोरी कळी उमलायला आलेली.

"काय आहे."

"माझं चिमणीचं पिलू. कसं डुलतंय. पण तोडणार नाहीये त्याला. असंच डोलू देत." खाली वाकून तिनं कळीचं चुंबन घेतलं "माझं छबडं गं" म्हणताना तिचा कंठ रुद्ध झाला. मलाच कालवाकालव झालं. किती वेडी आहे विदिशा माझी! आणि शहाणीहि केवढी! मी तोंड फिरवलं. ती कळी तोडणार नाही म्हणाली तरी कुणीतरी तोडणार होतंच! फूल झाल्यावर. वेलीपासून त्याची ताटातूट होणं अपरिहार्य होतं. आणि ते कोमेजणारहि होतं. विदिशेच्या भावना ओरखडल्या जाऊ नये म्हणून मी गप्प बसलो. म्हणालो,

"किती वेळ करणार आहेस विदिशा?"

एकदा तिनं डोळे भरून कळीकडं पाहिलं. ती झोके घेत होती. एकाएकी विदिशेनं मन घट्ट करून, ओठ गच्च दाबून तोंड फिरवलं. टॅक्सीकडं झपाझप चालत गेली. टॅक्सी धूर सोडत निघाली. विदिशेचे भरलेले डोळे शून्यावर खिळलेले. माझ्या खांद्यावर मान रेलून ती थरथरत्या आवाजात गाऊ लागली, "रामाला गं चंद्र हवा, चंद्र हवा!" ×××

बाग

गंधमोही धुंद वारे, मैफलीला रंग नाही
अतराळी लाख तारे, सोबतीला चंद्र नाही
दिव्य कांती पर्णवेष्टी, मोहराची साथ नाही
शीळ येते, साद घालावी कुणा? विश्वास नाही
सज्ज तारु नांगरावे? मोडके – हलणार नाही

वाट जाते दूर कोठे? शेवटाचे ज्ञान नाही
ओळखीची भीति वाटे, जीवनी आधार नाही
व्यर्थ कुंकुम लावणे त्या लालिमेला अर्थ नाही
ही अशी पण तो कसा रे? तो अता दिसणार नाही
माळी जाइ एक म्हणुनि, बाग कां फुलणार नाही?

—नरेंद्र पोफळी

कृष्ण चरित्र : काही विचार

दे. व्यं. चौहान

श्री कृष्ण चरित्र कथा या शक १४४८ मध्ये रचिलेल्या मराठी कथा काव्याचे संपादन श्री. वि. बा. प्रभुदेसाई व बा. ना. मुंडी या दोन विद्वानांनी इ. १९७५ त मुंबईहून प्रकाशित केलेले आहे. विद्यारत्न श्री. वि. भि. कोलते यांचा पुरस्कार ग्रंथात समाविष्ट आहे. महानुभावीय मराठी व एकनाथकालीन मराठी यांच्या संधिकालातील ग्रंथ असल्याने, व त्यात मराठी भाषेच्या इतिहासाचे काही दुवे लक्षणीय असल्याने, या ग्रंथाबद्दल लिहिणे आवश्यक वाटते. पुढील काही मुद्दे मांडण्यात येत आहेत.

डॉ. कोलते यांनी सुचविल्याप्रमाणे या कथाकाव्य ग्रंथाचे नाव कृष्ण चरित्र असे स्वीकारावयास पाहिजे होते. ते निष्कारण लांब झालेले आहे. कवीचे खरे नाव कवीनेच दिलेले आहे. हे खालील ओव्यांवरून स्पष्ट होते.

केळोसि नामें ब्रह्मपुरि । तेथे शांतादुर्गा परमेश्वरी ।
कौसिक गोत्रामाझारी । वरिटिजे । २४८
ते गोत्रकुळि उत्पन्न । रामाचा नंदन ।
विष्णुभक्तिपरायण । नामें शामराजु । २४९
झाला कृष्णाचा दासु । तरावया गर्भवासु ।
भक्ति करुनि ऋषिकेषु । आराधिला । १९·२५०

येथे कवीचे खरे नाव रामसुत शामराज असे होते, हे सुस्पष्ट आहे. मुस्लिम संपर्कित मराठी भाषेत ते सांगावयाचे झाल्यास, ते शामराज विन रामराव अथवा शामराज वल्द राम असे सांगता येईल. कृष्णदास हे त्याचे नाव नव्हे. तो त्याच्या नावाचा भागही नव्हे. वाटल्यास कवीने स्वीकारलेली ती नाममुद्रा किंवा फार्सी–उर्दू परम्परेतील तखल्लुस असे त्यास म्हणता येईल. हे ध्यानी न घेतल्यामुळे कविनाम विनाकारण लांबलचक बनलेले आहे.

उ प्रत गो प्रतीहून बरीच जुनी आहे, याचे प्रत्यन्तर दोन्ही प्रती बारकाईने पाहिल्यास सहज दिसून येते.

उ प्रत	गो प्रत	सन्दर्भ
ब्रह्मेन तेणें	ब्रह्मेयाने	६·७६
ओकें	ऐकें	७·६७, ८१; ११·४८; १२·१७, ९७, १०८
सत्राणी	सर्व त्राणी	७·४८
त्याहि	त्याणीं	७·३०
ब्रह्मेन	ब्रह्मेनें	८·३८
आकैल	ऐकेल	११·१५५
आकौनु	ऐकोनी	१२·८३
दिनला	दीपला	१२·७
मेळोनु	मिळोनी	१२·१८२

येथे आकै हा शब्द सं. आ आणि धातु रव्यै पासून निघाला व अर्थ बोलणे सांगणे असा.

डॉ. प्रभुदेसाई यांनी संपादून प्रकाशिलेल्या कविनंदन असा तखल्लुस किंवा नाममुद्रा असलेल्या कवीच्या उखाहरण कथा या पुस्तकाचे परीक्षण करीत असतांना, आम्ही महानुभावीय अर्थात जुनी मराठी व एकनाथोत्तर मराठी याची व्यवच्छेदक लक्षणे मराठी अभ्यासूंपुढे मांडलेली आहेत (पाहा मराठी आणि दखिकनी हिन्दी, दे. व्यं. चौहान, पुणे १८७३; पृ. ५५–७६). ती लक्षणे, खुणा शामराजाच्या प्रस्तुत कृष्णचरित्रात दिसून येतात. त्या लक्षणांचा पुनरुच्चार करणे अनावश्यक होय. एकनाथोत्तर मराठीची लक्षणे या कविकालात कशी परिस्फुटित, उद्गत व विकसित होत होती, हे पाहाणे जरुरीचे आहे. कविनंदनाच्या कालाची उत्तरमर्यादा आम्ही शक १४५० अशी सुचविली होती (पाहा उपरोक्त, पृ. ५७). सुदैवाने शामराजाचे हे कृष्ण चरित्र शक १४४८ त रचिल्याचे निर्वेधपणे ज्ञात आहे. म्हणून मराठीच्या वरील लक्षणाच्या परिस्फुटनाच्या काळातील हे काव्य आहे, असे दिसून येते. कविनंदनांत ला हा चतुर्थीप्रत्यय प्राप्त आहे. अगोदर विकसित झालेला ला चतुर्थीप्रत्यय काही कालाने केवळ अनेक वचनासाठी ना या रूपात लागू

लागला. ल आणि न याची परिवर्तनीयता प्राचीनच आहे. जन्म शब्दाची जल्म अशी रूपे अधिक जुन्या असलेल्या प्रस्तुत काव्याच्या उज्जयिनी प्रतीत सापडतात (पाहा पाठभेद ३·७, २२; ११·११३ अ; १४·१०२; १५·७५ व १६·७) परंतु प्रस्तुत कृष्णचरित्रात मात्र या ला–प्रत्ययाचा पूर्णपणे अभाव आहे. कविनन्दन "झाडी मण्डळ" अर्थात विदर्भातला, तर शामराज कोंकणातला. यावरून ला प्रत्ययाच्या विकास अविकासाचा काल आणि प्रदेश यांचा सुस्पष्ट सुगावा लागतो. विदर्भात ला प्रत्ययाचा विकास अगोदर झाला व तो कोकणात उशीराने झाला, हे निदर्शनास येते. जुन्या प्रस्तर-लेखातील मराठी–संस्कृत लेखनपद्धतीतून पृष्ठमात्रेचा लोप घाटावर अगोदर झाला व कोंकणात उशीरा झाला हे आम्ही एका लेखनसंपादनात स्पष्ट केलेले आहे. यावरून मराठीतील बदल घाटावरील महाराष्ट्रात अगोदर व कोंकणात मागाहून होतात, असे अनुमान करण्यास जागा मिळते.

या कृष्णचरित्रात जुन्या मराठीतील तृतीया प्रत्ययाच्या नि नि, चे नि, एं, नि (उदाहरणार्थ भक्ति-चेनी सनेयों १·४९) या प्रत्ययरूपांच्या ऐवजी नें प्रत्यय उद्‌गम पावत होता, हे या प्रत्ययाच्या नें रूपांवरून (पाहा ओव्या ६·७६; ७·३३; १३३, १४०, ८·११०; १६·७, १५५ इत्यादि) दिसून येते. याखेरीज तृतीयेची न, नि रूपें आधिक्याने वावरत होतीच, हे ग्रंथात सर्वत्र दिसून येते. त्याचप्रमाणे तृतीयेच्या ने प्रत्ययाचे अनेक-वचनी नी हे रूप विकसित होत होते, हे खालील उदाहरणांवरून दिसून येते––

हो कां काळ निजेला । किं अंतक आड पडला ।
तैसा त्याणीं देखील । अगासुर । ७·१०९
मग त्या वृदावनि । खेळुं आरंभीलें त्याणीं ।
नानापरीं करोनी । सवंगडेंसी । १०·१२

यावरून तृतीयेच्या अनेकवचनी नीं प्रत्ययाची आपणाला प्रथमभेट होते.

या ग्रंथात जुन्या मराठीचे आणखी एक वैशिष्ट्य नांदत आलेले आपणाला आढळून येते. संस्कृतात विशेष्याची विभक्ति विशेषणाला नियमानेच प्राप्त होते. याला सामञ्जस्य असे नाव देता येईल. जुन्या मराठीत, संस्कृताच्या प्रभावाने हा विशेष सर्वत्र आढळतो. अज्ञाने मुलें (७·१२१), मनें सकळें (८·५३), ऐसीं रूपें सकळें (८·७०), ब्रह्मांडे अनेकें (८·१३४), मृगें थेरे (९·२५), सोज्वळे चोखटें वनें (१०·३५), योरें हर्पे (१६·१२) इत्यादि.

याच सन्दर्भात आणखी एका गोष्टीचा उल्लेख करणे आवश्यक वाटते. 'त्याणीं (उ प्रतीत त्याहि) बोलिलें काइ।' (७·३०) असे वाक्य आहे. हे वाक्य नवीन मराठीच्या वापरानुसार कसेसेच वाटते. नव्य मराठीत हे वाक्य 'तो बोलिला काई' असे असावयास पाहिजे. परन्तु येथे त्याहि हा तृतीयान्त कर्ता आहे. येथे संस्कृत परम्परेचे अप्रभावितपणे अनुकरण झालेले आहे. 'तेन भणितं किम्' या वाक्याचे हे मराठी अनुकरण होय. जुन्या हिन्दीतही हे घडले आहे. याविषयी आम्ही अन्यत्र चर्चा केलेली आहे.

पैशाची अवशेष

डॉ. प्रभुदेसाई यांनी या काव्याच्या भाषा विशेषांचा विचार प्रस्तावनेत (पृ. ४० ते ४३) केलेला आहे. मराठी भाषेत व काही विशिष्ट स्थळी संस्कृत लेखनांतही पैशाची प्राकृतांतील शब्दरूपांचा आढळ होतो, हे आम्ही अनेक प्रसंगी अभ्यासूंपुढे मांडलेले आहे. हे आमच्या भारत ईराणी संश्लेष (पुणे शक १८९५) या पुस्तकातील काही लेखांवरून दिसून येईल. 'मराठीतील पैशाची अवशेष' या लेखात (विदर्भ संशोधन मण्डळ, वार्षिक १९७३) आम्ही काही निवडक शब्दांचा परामर्श घेतलेला आहे. अन्य लेख लेखांतूनही या संबंधीची चर्चा आलेली आहे. पैशाची भाषेचा संस्कृतवरील प्रभाव मयुरा व तटाक या दोन शब्दांच्या इतिहासावरून पाहाण्याचा प्रयत्न अन्यत्र केलेला आहे. मराठीवरील प्रभावाचा उल्लेखही आलेला आहे. या काव्यातही मथुरा (ओ. २·२६; १५·७५), पैं (२·१४ इत्यादि), तटाक (६·४९; १५·२१) इत्यादि शब्द पैशाचीप्रभावाचे स्मारक आहेत. सरस्पती (सरस्वती १५·७) हा शब्द या रूपात एकदाच आढळाला. यातील प हा व ध्वनीचा ईराणी अवशेष आहे, हे आम्ही अन्यत्र चर्चिले आहे. (पाहा भारत ईराणी संश्लेष, पृ. १४९, २०६). परंतु येथील एकाच आढळावरून निष्कर्ष काढणे युक्त नव्हे. परंतु ग्रामीण अशिक्षित जनतेच्या तोंडी मात्र आज देखील सरस्पती म्हणून ऐकावयास मिळतो, हे नोंदवावेसे वाटते.

दसुमती (२.३ इत्यादि सर्वत्र) शब्दाचा प्रश्न डॉ. कोलते यांनी आपल्या पुरस्कारात उल्लेखिला आहे. या प्रश्नाची उकल या पुस्तकात झालेली नाही. आमच्या उपरोक्त पुस्तकात संस्कृतादि भाषांतील ज ध्वनीच्या द ध्वनीत होणाऱ्या परिवर्तनाची चर्चा आलेली आहे (पाहा पृ. १३८, १७४ व २४४.) म्हणून पुनरुक्ति नको. ईराणी प्रभावामुळे प्राकृत जसुमती, जसवंती याचे परिवर्तन दसुमती रूपात होते. राजपूत गणा दसोदा (सं. यशोदा, प्रा. जसोदा) हे महिलानाम रूढ आहे. एवढेच दसुमती शब्दाबद्दल पुरेसे आहे असे वाटते. ईराणी बुजुर्ग शब्दाचे बुद्रूक असे मराठीकरण हिंगणे बुद्रूक, रेटरे बुद्रूक इत्यादि ग्रामनामात सर्वत्रच आढळते.

या काव्यात 'यावनी शब्दांचा अभाव' आहे असे संपादकांनी नोंदविले आहे (प्रस्तावना, पृ. ४०). या काव्यात ईराणी शब्द फार कमी आहेत, उपरोक्त उखाहरणाच्या मानानेही कमी आहेत, हे खरे आहे. मला फक्त दोनच शब्द एकेका, दोनदोन वापराचे, आढळले. ते शब्द खस्ताखस्त (६.१०१, १८.१४७) व दु–रस्ता (८.४५) होत. हे शब्द कोणत्या भाषेतील हे संपादकांनी नोंदविलेले नाही. पहिला शब्द ईराणी ख्स्त शब्दापासून बनलेला आहे. खस्ताखस्त ईराफी, फार्सीमूल आहे याची शंका घेण्याचे कारण नाही. संपादकांनी दिलेला अर्थही (पहिला सोडून) योग्य असाच आहे. दु-रस्ता यातील द्वितीय घटक रस्ता शब्द ईराणी आहे. तो संस्कृत रथ्या शब्दाच्या समकाय व समानार्थ आहे, हे निश्चित. साधारणतः २५० वर्षांच्या दीर्घकालीन सहवासानंतर सुद्धा मराठी ग्रांथिक लेखन मुस्लिम प्रभावापासून कसे मुक्त राहिले, याचे प्रस्तुत काव्य, चोंभाचे उखाहरण व कविनंदनाचे उखाहरण हे ग्रंथ दाखले होत. यावरून मराठीची प्रकृति व मराठी साहित्यिकांची अपरप्रत्ययनेयता दिसून येते.

या काव्यात संकस्टि (प्रस्तावना, पृ. ४१ व १२.१०७ उ प्रत) शब्द आल्याचे नोंदविण्यात आले आहे. मूळ संस्कृत शब्द सङ्कट आहे. त्याचे हे भ्रष्ट रूप आहे. हे विशेषतः अशुद्ध समजल्या जाणाऱ्या व स्त्रियांच्या भाषेत पाहायला मिळते. ईराणी भाषेत दोन दन्त्य ध्वनि एकापुढे एक आले तर पहिल्या दन्त्याबद्दल स्. हे ध्वन्यन्तर होते असा नियम वुइल्यम्स जॅक्सन याने आपल्या अवेस्ता भाषेच्या व्याकरणात दिलेला आहे. ई. एमेरिक याने शक ग्राम्यातिकल स्तदीज या इंग्रजी ग्रंथांतही याचा उल्लेख केला आहे. या नियमाचा अमल ईराणी वस्त (सं. ख वद्ध धातु बध्) व मस्त (सं. मत्त, दातु मद, माद्यति) या रूपात दिसून येतो. शक गणांच्या दीर्घकालीन सहवासाने संकट शब्दाचे हे संकस्ट असे रूपांतर घडून आले की काय याची शंका येते.

दोघे जण

या काव्यात दोघे जण (३.१२२; ४.४; १६.१०४) चौग जण (१२.६१, १००; १९.१२२), पांच जण (१६.३५; १८.१३२, १३३) आणि आठ जण (१९.१४५) असे प्रयोग व वापर आलेले आहेत, येथे जण शब्दाचा अर्थ समह, संच असा आहे. हे सहज दिसून येते.

हा जण शब्द येथे संख्यावाचक quantifier आहे. व मराठीत त्याचे आगमन प्राकृतातून झाले, हे आम्ही 'महाराष्ट्र : बहुकौलिक भाषाक्षेत्र' या लेखात अभ्यासूंपुढे मांडलेले आहे. हेच संख्यावाचक संस्कृतात पण रूढ आहे, उदाहरणार्थ सखीजन, गोपीजन इत्यादि. ते दक्खिनी हिंदीतही वावरले व ते तेथे मराठीतून गेले होते. या गोष्टी वरील लेखात आलेल्या आहेत. हा प्रकार मगध येथील प्राकृतात, असमप्रदेश मार्गाने पूर्वेकडून आला. असमी भाषेत अशी संख्यावाचके quantifiers अनेक आहेत. हा लेख विदर्भ संशोधन मंडळाच्या १९७४ च्या वार्षिकात प्रकाशित झाला आहे. या काव्यातही ही प्राचीन प्रथा आढळून येते. ती आजदेखील चालू आहेच.

वत्छ

या काव्यात संस्कृतातील वत्स व त्यासारखे त्स ध्वनियुक्त शब्द वत्छ या रूपात लिहिलेले आहेत (पाहा वत्छ ३.९६; ७.४२, ४५, ६४; ८.२४ इत्यादि; मत्छरु १२.१३५; भक्ति–वत्छल १२.८८, मत्छकं १२.९६ सं. मशक). मराठीतील मूळ उच्चार व्यक्त करण्यासाठी लेखकाने वापरलेले हे बोधचिन्ह आहे असे मानावे लागते. यावरून त्याला वरील शब्दातील छ वर्णाचा दन्त्य–वत्स्य उच्चार सांगावयाचा आहे असे दिसते. यावरून मराठीतील 'वछाहरण', या काव्यवाची शब्दाचा उच्चार दन्त्यवत्सर्य छ करावा व तो तालव्य उच्चार करू नये या गोष्टीकडे निर्देशन

होते. खोतनी शक, पश्तो, काश्मीरी इत्यादि भागात च वर्गाचा दन्त्यवत्स्र्य उच्चारही होतो. हा उच्चार व्यक्तविण्यासाठी इंग्रजी लेखनात tca, tcha, dja, djha अशी चिन्हे, वर्ण वापरण्याची पद्धत आहे. वरील उदाहरणांवरून दन्त्यवत्स्र्य उच्चार व्यक्तविण्याची जुनी प्रथा दिसून येते, असे म्हणावेसे वाटते.

हिन्दी शब्द

सम्पादकांनी हिन्दी शब्दांचा उल्लेख (प्रस्ता. पृ. ४३) करून असे म्हटले आहे की 'अर्थात, एवढया-वरून काही विशेष निष्कर्ष काढणे योग्य होणार नाही.' ही गोष्ट अभ्यासकानी लक्षात घेण्यासारखी आहे की जुनी मराठी, जुनी हिन्दी (कोशली, व्रज), जुनी गुजराती इत्यादि भगिनीभाषांत समाईक शब्दांचा भरणा आरंभकाली विशेष होता. परंतु जसजसा काळ पुढे सरकत गेला तसतसा भाषा भाषांत निश्चित असा वेगळेपणा वाढत गेला.

डॉ. तेस्सितोरी यांना जुन्या गुजराती व राजस्तानीचा उद्गम व विकास एकत्रच हाताळावा लागला. या दोन भाषा बऱ्याच उशीरा वेगळया झाल्या. गाथा-सप्तशती संग्रहात मराठी परंपरा व हिन्दी परम्परा वेगळया दाखविता येतात. या परम्परा मागाहून परिस्फुटित झाल्या. ज्ञानेश्वरीतही काही हिन्दी शब्द दाखविता येतात. ही देवाणघेवाण नव्हे. तो समाईक वारसा आहे

कृष्णचरित्र या काव्याचे सम्पादन अत्यन्त कष्ट उपसून झालेले आहे, हे सहजरीत्या ध्यानी येते. पानापानावर दिलेले पाठभेद पाहिले म्हणजे या कष्टाची कल्पना येते. विद्वान् सम्पादकद्वयांनी परिश्रमपूर्वक सम्पादन पूर्ण करून ते मराठी अभ्यासकासमोर माण्डले, याबद्दल त्यांचे अभिनन्दन.

♡ ♡ ♡

झोळी

समुद्रसपाटीपासून
एका पतंगाला धागा बांधून
तो मोजायचा उंची झाडांची, पहाडांची
पतंगाला सामोरे आलेले ढग
आभाळहौस म्हणून
तो निमूट ठेवायचा पापणीवर.
साकळलेल्या ढगांचं पोळं होवून
आभाळ थेंबथेंब झिरपायला लागायचं
त्याच्या अंगभर नुस्ती पतंग...

एकदा वारे आले, प्रदीर्घ आळस देत
कुस बदलवित गेले
झोल पडलेल्या पतंगाच्या धाग्यावरून
गिरगोट येवू लागलेत तेव्हा
एक रिती झोळी त्याला सामोरी आली
आणि तो निघाला तिला काखोटीला मारून
दारोदार भिक्षेसाठी.

—देवानंद गोरडे

पांघरूण

अंधारून येतांना आकाश
पाठमोरी होऊन झाडं चालत जातात
क्षितिजाकडं, आवर्तनं घेत अंधार
शिरतो माझ्या चौभिती खोलीत
मी बघतो वाट तेव्हा चंद्रचांदण्याची
मी पाहिल्यात फेसाळ लाटा समुद्रकाठी
कवटाळतांना काठाचे झाडांचे पुंजके
चांदण्याचा साज घालून
मी ऐकतोय पडसाद दूरात गर्जणाऱ्या
समुद्राचे संध्याकाळच्या घंटाध्वनींसारखे
अस्वस्थविणारे माझ्या खोलीतील काळोखाला
मला माहिताहे म्हणूनच मी करतोय
सोबत त्याला त्याच्या एकटेपणात तेव्हापासून.
खिडकीतला चौकोनी आकाशखंड काळोखून
मला घालतो पांघरूण उबट उदासतेचं.

—मुरलीधर कुळकर्णी

काहूर

स्वाती धाराशीवकर

एक मन ओरडतय्. तो कां असा वागतो ? याचे त्याला कोडे पडलेय्. नाना शंका येतात मनांत अन् काहूर उठतेय् विचारांचे. विचार तरी किती ? असंख्य. त्याच्या सहवासापासून तर त्याचाच विचार डोक्यात. एक मन चांगलं अन् एक वाईट. चांगलं मन म्हणतेय् इतकं त्याच्यासाठी करावं तरी तो कां असा वागतो ? खरेच त्याचे काही आहे का दुसरीकडे ?

दि. ६-७-१९७४

तो भेटला पण मला खुलविले नाही. माझे त्याच्यावर फार फार प्रेम आहे, पण हे त्याला मुळीच कळले नाही. तो माझ्याशी वागत आला एखाद्या भाव-नाहीन कमांडरासारखा. त्याला वाटले ही Innocent आहे. बरी आहे खेळवायला. पण त्याच्या या वृत्तीमुळे मी मात्र उदास होतेय्.

दि. ११-७-१९७४

मधले काही दिवस वावटळीत गेले. त्याच्याशी लग्न करू की नको या विचारात असतानाच माझ्या प्रेमाने उचल खाल्ली व ९ तारखेला या पवित्र बंधनात अडकले. काल आमची पहिली रात्र. आनंददायी पवित्र मीलनाची. पण माझे दुर्दैव ! जे सुख हक्काने पूर्णत्वाने माझे आहे त्यासाठी सुद्धा नवऱ्याच्या इच्छेप्रमाणे घ्यावे लागते. आपल्या संस्कृतीने नवऱ्याला बलशाली बनविले आहे. तो आपल्या इच्छेप्रमाणे आपल्या पत्नीला, जी कधीकाळी प्रेयसी असते – नाचवू शकतो. हुकूमशाही राजासारखी त्याची वृत्ती असते. हे तेव्हा नुसतेच वाचले होते. पण त्याचा कटु प्रत्यय आला. कालपासून मी त्याच्याशी बोलले नाही. इच्छाच झाली नाही – मन सैरभैर झालेय्.

दि. १२-७-१९७४

जीवन हे क्षणभंगुर आहे. ते खेळीमेळीने आनंदाने घालवावयास हवे. जीवन म्हणजे निव्वळ पाण्यावरचा बुडबुडा. हात लावताच फुटलाच म्हणून समजा. माझेही जीवन असेच आहे. कांच तडकली आहे. सांधणे कठीण आहे.

दि. १३-७-१९७४

माझ्या इतकी हळवी मुलगी याला मिळावयाला नको होती. पण नशीब. रस्त्याने जोडपी हसत खेळत जातांना पाहिली म्हणजे आजकाल मला राग येतो. असे वाटते दोघांनाही दोन दिशांना ओढावे अन् सांगावे तिला, "बाई ग ! पुरुषाचे प्रेम फसवे आहे. एकदा दुसरीत गुंतला की पहिलीला विसरलाच समजा. आज हसत खिदळत चालली आहेस पण मग दुःखाने वेडीपीशी होऊन रडत ओरडत जाशील."

ही विकृती जर माझ्या मनात निर्माण झाली तर मी ओरडून जगाला सांगेल की हाच हुकूमशहा या विकृतीचा जनक आहे.

दि. १५-७-१९७४

परत त्याच्यावरील सुप्त प्रेम जागृत झालेय्. एक मन म्हणतेय् की तो असा नाही. फार प्रेमळ आहे. पण त्याचा प्रेमळपणा आहे पित्यासारखा. स्त्रीला पति-प्रेम पाहिजे असते तसाच पित्याचा मायाळूपणा. पण मुख्य असते पति-प्रेम.

दि. १९-७-१९७४

आजकाल नियमित रोजनिशी लिहिणे होत नाही. दिवसरात्र विचारच येतात मनात. विवाहपूर्व जीवन व विवाहोत्तर जीवन यांची तुलना चालू असते मनात. विवाहापूर्वी याचे मीच सर्वस्व होते. कोणतीही गोष्ट मला सांगितल्याशिवाय करत नव्हता. कित्ती प्रेम होते त्याचे माझ्यावर. हळुवारपणे गोंजारायचा. मला माझा खूप अभिमान वाटावयाचा पण विवाह झाला अन् हे सर्व स्वप्नच वाटू लागले. आता त्याचा व्यवहार निव्वळ सौदेबाजी झाली आहे; सौदा निव्वळ शरीराचा. मग प्रेम नाही. गोड बोलणे नाही. रात्री दिवसा केव्हाही माझे शरीर ओरबाडावे व खुष व्हावे की आपण हिला

किती सुखी ठेवलेय. पण त्याच वेळी माझे मन रडत असते, की एवढ्यासाठीच येतो कां हा आपल्याजवळ?

दि. २२-७-१९७४

रोजनिशी लिहाविशीच वाटत नाही. पण मनांत दु:खांचा साठा साचला की तो कुठेतरी ओतावासा वाटतो. कुणाजवळ तरी सांगावासा वाटतो. आता ही रोजनिशीच माझी जीवलग मैत्रिण झाली आहे हिच्याजवळ मन मोकळे केले की फार फार बरे वाटते. काल विचारांनी मन खूप संत्रस्त झाले अन् मी घराबाहेर पडले. पाऊले वळली थिएटरकडे. पिक्चर होता "कोरा कागज." पोस्टरवरच्या नायिकेचा चेहरा पहाताच असे वाटले की पहावाच हा चित्रपट. पिक्चर माझ्या मनोदौर्बल्याशी मिळता जुळताच होता. पतिपत्नीची ट्रॅजेडी होती. नायक होता आत्मकेंद्रित वृत्तीचा. जीवनाच्या नाटकात मुख्य भूमिका असतात पतिपत्नीच्या. त्या जर त्यानी योग्य वठविल्या नाहीत तर शेवटी ट्रजेडीच. "कोरा कागज" मधला नायक, नायिकेला कधीही समजून घेत नाही. तिच्या प्रेमाचा भावनांचा अनादर करतो. त्यामुळे तिला सुख मिळत नाही. दु:खी अंत:करणानेच ती घराबाहेर पडते. नायिकेच्या आईमुळे हे घडते. शेवटी ती घटस्फोट घेते. पण शेवटी मात्र त्यांचे गैरसमज दूर होतात व त्यांचे मीलन होते. गाणे मात्र माझ्या आयुष्याशी मिळते जुळते होते.

मेरा जीवन कोरा कागज
कोराही रह गया।

माझे जीवन असेच नाही कां? मी त्याच्यावर प्रेम करते; त्याच्या सुखासाठी झटते पण त्याच्याकडून प्रतिसाद नाही! मग मी कोरीच नाही का? माझ्या जीवनात कधीच सुख येणार नाही कां?

याची परिणती कशात आहे? माझ्या अंतात तर नाही?

✱ ✱ ✱

टाक तूं जपून पाऊल!

जाणिव मजला खांच दऱ्यांची
तूंच वाट ही जपून चाल!
संवय असे मज वन काटयांची
तूंच पाऊले बघून टाक! १

मी तर करपुन गेलेली रे
तुज जाळिल ग्रीष्माचे ऊन
मी तर चिंब सदाच; तुजवरी
मृग परि येईल बघ धाऊन! २

तेज? पाहिले कधी कुणी तें?
युगायुगाचा मी अंधार
तूंच सुला जप; ठेंचाळत मग
फुका मागशिल मज आधार!! ३

मृत्यु?....त्याला रोज भेटते
मुळीच ना मी जगले जीवन!
मूर्च्छित होशिल तूंच फुका ती
स्मशानातली चिताहि पाहुन! ४

नेत्रच ना मज अश्रू केवळ
उपेक्षाच दे सदैव चाहुल!
संवयीचें हें सारें सारें
मात्र टाक तूं जपून पाऊल!! ५

—सुनीति आफळे

समीक्षण

सूर्ययुगाची सुरवात

वि. स. जोग

'एकटाच आलो नाही, युगाचीही साथ आहे
सावध असा, तुफानाची हीच सुरवात आहे
कामगार आहे मी तळपती तलवार आहे
सारस्वतांनो, थोडासा गुन्हा करणार आहे'

अशी घोषणा करून कवी नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेच्या क्षेत्रात पदार्पण केले आणि एका नव्याच 'सूर्ययुगाची सुरवात' झाली. केशवसुतांनी मराठी कवितेत क्रांती केली. मर्ढेकरांनी प्रतिक्रांती केली. सुर्व्यांनी त्या प्रतिक्रांतीचा पाडाव केला. आत्मलुब्धता, आत्मवंचकता, दैन्यप्रियता, नैराश्यनिष्ठा आणि दुर्बोधतेशी जवळीक या अवगुणांमध्ये घोटाळणारी मराठी कविता नारायण सुर्व्यांनी आत्मविश्वासपूर्ण, सामाजिक, सुबोध आणि विजीगिषु केली. 'देहावर घातलेल्या पोषाखावरच बोलणारे' तथाकथित प्रतिष्ठित सोडले तर प्रामाणिक काव्यरसिकांनी आणि समीक्षकांनी कवी नारायण सुर्व्यांचे काव्यऋण–समाजऋण मोकळेपणाने मान्य केले आहे. या मान्यतेचाच एक अभ्यासू आविष्कार श्री. एस्. एस्. भोसले यांनी प्रस्तुत समीक्षाग्रंथात घडविला आहे.

सुर्वे : एक मूल्य

एकशे अकरा पृष्ठांच्या या संदर्भ पुस्तकावरून लेखकाचा सुर्व्यांच्या कवितेचा सूक्ष्म अभ्यास, सुर्व्यांच्या कवितेवरील बहुतांश टीकालेखांचे लेखकाने केलेले वाचन, सुर्वे–कवितेचे सर्वांगीण आकलन आणि सुर्वे या मूल्यांचे लेखकाने अनुभवलेले क्रांतदर्शन या सर्व वैशिष्ट्यांचा परिचय होतो. होय ! कवी नारायण सुर्वे आणि त्यांची कविता हे एक जीवनमूल्य आहे. 'जीवनसंघर्षाच्या दाहक वेदनांनी फुललेले' (प्र. ९) ते एक लढाऊ मूल्य आहे. 'सृजनशील मनोवृत्तीने सृजनशील माणसाच्या आत्म्याचा शोध घेणारे' ते मूल्य आहे. (पृ. १५) 'हार नाही, माघार नाही, धाकाने प्रहार करीत पुढे सरणारे ते मूल्य आहे' (पृ. १७) 'ते नपुंसक नसून निर्मितीक्षम मूल्य' आहे. (पृ. ३५)

'क्रांतिकारक अवडंबर नाही'

आपल्या पाच प्रकरणातून सुर्व्यांच्या कवितेवर प्रतिक्रिया नोंदवताना सुर्वे–कवितेच्या पोताचा धागा न् धागा भोसल्यांनी तपासला आहे. त्यामुळे 'आज माझ्या कोरड्या गा । शब्दात आग येत आहे । आणि नव्या सृजनाचे । क्षितिज रुंद होत आहे ।' या ओळींवर भोसले, "आकाश मातीसह उठून येते. दारिद्र्याच्या सहाणेवर भविष्याचे रूप उमटते. कुणी साथी असो अगर नसो, वादळाची वात बनते. मुक्तीची दिशा दिसते. हृदयावरचे काळे–निळे डाग फुलवंतीचे रंगेल स्वप्न घेऊन येतात." असे तेवढेच काव्यपूर्ण भाष्य करतात. (पृ. १८) 'मराठीचिये नगरी सुर्व्यांची कविता सिंहाच्या छाव्यासारखी शोभून दिसते. धगधगत्या पौरुषाचा आणि पुरोगामी प्रवृत्तींचा जोरकस वेध घेणारी सुर्व्यांची कविता सर्वसाधारण रसिकाला चेतवणारी आहे, समजणारी आहे, पटणारी आहे.' (पृ. २१) किंवा 'केवळ कलावादाला थोतांड मानणाऱ्या, कलामूल्यांची यथायोग्य बूज आवर्जून राखणाऱ्या नारायण सुर्वे यांनी मराठी कवितेत प्रागतिक, वस्तुनिष्ठ व बुद्धिवादी विचारांस हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे." (पृ. २३) किंवा, "तिच्यात क्रांतिकारक अवडंबर नाही, बडबड नाही, घाई नाही. ती, एखाद्या शांत व सर्व व्यथा भोगून अपरिहार्यपणे क्रांतिकार्याकडे वळलेल्या समंजस व शहाण्या कार्यकर्त्यासारखी बोलते." (पृ. १११) या श्री. भोसले यांच्या मार्मिक विधानांशी असहमत होणे कठीण आहे.

संदर्भ उकलून दाखवले

विद्यार्थ्यांना मार्गदर्शक ठरणाऱ्या या ग्रंथात सुर्व्यांच्या प्रेमकवितेच्या स्पष्टीकरणात एक अख्खे प्रकरण खर्ची घालून लेखकाने सुर्वे समीक्षेतील एक त्रुटी दूर केली आहे तर 'पाणी घे' 'पोस्टर' 'नेहरू गेले त्यावेळची गोष्ट' या कवितांचे सविस्तर रसग्रहण करून त्या कवितांमधील अनेक संदर्भ समजावून सांगून कवितांच्या आकलनाचा व आस्वादाचा आनंद वाढवला आहे.

मराठी कवितेत एक काव्यगत ऐतिहासिक दस्त-ऐवज ठरलेल्या सुर्व्यांच्या कवितेवरील या चिकित्सक, मर्मग्राही व रसपूर्ण प्रबंधाबद्दल लेखक प्रकाशकांचे अभिनंदन-- !

सूर्ययुगाची सुरवात
लेखक – एस्. एस्. भोसले
प्रकाशक – अभिनव प्रकाशन, ५३, गुरु नानक मार्केट, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई १४. पृष्ठे १११ किंमत आठ रुपये

बाभळ

फड्यासारखे ऊन पसरले
झळयात झाडे हलती थरथर
शिवारातली उलते माती
झाडांवरला झडतो मोहर
माळावरली शबरी बाभळ
कुबड काढुनी वेचित बोरे
आणि उन्हाच्या चढत्या पारी
धापा टाकित दळती ढोरे
शबरी बाभळ उत्सुक होउन
कुशल विचारी सितापतीचे
नाकावरती चोट टेवुनी
झाड दटावित कडुनिंबाचे
एक कावळा चुकार कुटुनी
येउन बैसे बाभळीवरी

चरे पाडितो आवाजाने
दुपारिला अन सुटे थरारी
वाटा रानातून उधळल्या
धूळ उडतसे तीव्र उन्हाची
बापुडवाण्या रानचिमणिच्या
होइ काहिली अंगांगाची
शिवारातली जमिन रेखिते
नांगरटीची वेढब नक्षी
चिंचोक्यांच्या स्ळे मण्यांची
माळ जणू भिलिणीच्या वक्षी
मनात चरते दीप्त झळाळी
ऊन जिवाला छेद देतसे
बापुडवाणी बाभळ टाकी
आकाशाच्या उरी उसासे

—मुरलीधर कुळकर्णी

वांझ

सय्यद अमीर एफ.

कार्र ! कार्र ! कार्र ! कोल्हापुरी वाहणांचा आवाज झाला, त्यासरशी खोपटाच्या दारातनं रखमानं भायेर बघितलं. मारुती, बाटुकाचा पाचुंदा घेऊन सरजा व राजाला हातात धरून मोठ्या–मोठ्या ढेंगा टाकत घराकडं येत होता. उंचा–पुरा, भरदार छातीचा, मोठ्या हाडाचा, पिळदार नी दणकट बांध्याचा मारुती गव्हाळ रंगामुळं बघनाऱ्याच्या चटकन् डोळ्यात भरायचा. मारतीला बघताच रखमाच्या गालावर गोड खळी पडली अन् तिनं हसून इचारलं, 'आज लई येळ केला ? कवाच्यानं मी तुमची वाट बघतिया ? आता इलसा, मंग इलसा !' मारतीनं दनदिशी पाचुंदा दारात टाकला. सरजा–राजाला दावनीला बांधलं. एक एक पेंडी त्यांच्या म्होरं टाकली; अन् दारात उभी राहिलेल्या रखमाला ऊसाची मोळी उचलावी तशी उचलून खोपटात नेली. रखमा लाजेनं लालेलाल झाली. अन् म्हणाली, 'अवं सोडा की ? असं काय वारक्या पोरागत खळीला आलायसा ? रानातनं दमून–भागून आलाय, हात–त्वांड धूवा तवर मी च्या ठिवती !'

रखमाच्या अन् मारतीच्या लग्नाला तब्बल धा वसं झाली होती, पन् अजून त्यांच्या घरात पाळणा हालला नव्हता, अन् तरी सुद्धा त्यांची प्रतेक रात पहिल्या राती सारखी जात होती. मारती आपल्या पाच बिघा जमिनीत दिवसभर राबत होता. सरजा–राजाबरुबर होता हुईल तेवढी काळ्या आईची सेवा करत होता, अन् रातच्याला रखमाच्या मिठीत विसावत होता. दोघं कशी मजेत होती. खाऊन पिऊन सुखी होती. त्यानला ना कुणाचा जाच होता ना कुणाचा धाक ! रखमा अन् मारती अक्षी शंकर–पारवतीचीच जोडी !

मारतीची माय लहानपनीच वारली होती. त्याच्या 'बा'नं त्याला तळहातावरच्या फोडागत जपला. लहानाचा मोठा केला. त्याला पैलवान बनवला. पन मदीच वायगुरमाच्या आजारात काळानं त्याच्या "बा"वर अचानक झडप घालून बोक्यानं जसं उंदराला उचलून न्यावं तसं उचलून नेलं. मारती पोरका झाला, त्येचा आधार तुटला, धीर खचला अन् त्यानं कुस्ती सोडली. मारती एकाकी पडल्याला बघून तीन वर्सानं वामनराव चौधुल्यानं आपली लाडकी लेक रखमा हीचं मारतीसंग मोठ्या थाटानं लगीन लावून दिलं अन् मारतीला जल्माची जोडीदारीन मिळाली. रखमा घरात आल्यावर मारती सावरला. त्याला आधार मिळाला. हुरूप आला अन् रखमासंग संसारात रमून गेला. नाकेली, गोरी–गोमटी, ठुसक्या बांध्याची, मोठ्या–डोळ्याची, रसरसीत व्हटाची रखमा मारतीच्या नसानसात भिनून गेली. डाळिंबाच्या दाण्यासारखं हासताना दिसनारं पांढरं चकचकीत दात पाहिलं की मारती लई खुश व्हायचा; त्येला लई ग्वाड वाटायचं !

सुकीरवारचा दिवस होता. आज सांच्याला रखमाला राधाकाकूच्या पोराचं नांव ठिवायला जायचं होतं. तवा रखमा मारतीला म्हणाली, 'ऐकलं कां ? मी काय म्हनतीय ? आज जरा येरवाळीच बाजार हाट उरकून या, अन् येता येता घालण्याच्या कापडाच्या दुकानातनं एक मस्तपैकी अंगडं–टोपडं बी घिवून या ! बिन इसरता तेवढं काम करा, नाय तर मला बाया–बापडचापुडं लावा खाली बघाय !' मारतीनं रखमाला खसकन् अंगावर वढून घेतली अन् तिच्या गालावर गाल घासत म्हणाला, याड बिड लागलंय की काय ? काय वाटूल ती माग की ! अंगडं–टोपडंच काय, तुझ्यासाठी राकेटात बसून चंद्रावर जाईल अन् त्येला म्हणीन माज्या रखमेनं तुला बोलावलंय ! रखमा गालातल्या गालात हासली, अन् आपल्या धन्याचं आपल्यावरचं डोंगराहेवढं पिरेम बघून त्याच्या खांद्यावर इसावली. एवढ्यात सरजानं हंबा करून तान लागल्याची आठवण करून दिली. मारती म्हणाला, च्यायला, सरजा–राजाला पानी पाजायचं इसरलूच की ! 'पानी–बिनी मी त्यानला दावती,

तुमी जा आता पाय उचलून ऊन व्हायच्या आत अन् कसं बिगीनं येतासा माघारी, सारं सांगितल्यापरमानं सामान घिवून !' लाडं लाडं रखमा म्हणाली. 'व्हय व्हय तूं त्याची फिकीर करू नग, त्यानला पानी पाजल्यावर कडब्याची एक एक पेंडी बी त्यांच्याम्होरं टाक, मी काय हे बग गेलू अन् आलूच !' असं म्हणून मारती खोपटा-तनं भायेर पडला.

घरात एकटीला मन लागंना म्हणून रखमानं शेरभरं दानं काढलं, अन् दळाय बसली. जात्यावर बसल्यावर कारभाऱ्याच्या कौतिकाचं गानं म्हणू लागली. एवढ्यात सरु मावशीनं रखमाला भायेरनं हाक मारली अन् पानी मागितलं. रखमा जात्यावरनं चटकन् उठली अन् सरु मावशीला म्हणाली, मावशे ! भायेर कां म्हनं ताटकळत उभी राहिलीस ? ये की आत ! सरू मावशी आत आली अन् घोटभर पानी पिऊन पोत्यावर बसली. बसल्या बसल्या खोपटात हिकडं तिकडं बघत म्हणाली, रखमा ! कित्ती मोठं खोपाट हाय तुजं ! सारवून–सुरवून कसं निटनेटकं अन् निर्मळ केलयस ! असल्या खोपटात एकादं लुटूलुटू चालनारं, दुडूदुडू पळणारं, बोबडं बोलनारं सिरीकिसनासारखं बाळ असतं तर कित्ती चांगलं दिसलं असतं ! अगं रखमा, तू देवा-दिकाचं कां बघत नाहीस ? देवीचा मंगळवार सुकीर-वार धरून बघावं ! असं कित्ती दिस वांझ व्हाणार हाइस ?

सरु मावशीचा शब्द रखमाच्या काळजाला जाऊन भिडला. टचकन् तिच्या डोळ्यात पानी उभं राहिलं. रखमानं पदरानं डोळे पुसलेले बघून सरु-मावशीला रखमाची कीव आली अन् मायेनं तिच्या पाठीवरनं हात फिरवत ती म्हणाली, हेवढं मनाला लावून घेतलंस् ? येडीच हाय माझी पोरगी ! आज नाय तर उद्या हुईल ! अन् हे बघ, आपली ती मोऱ्याची नरबदा आजी हाय कां नाय, तिच्या वाड्या-वर एक साधू महाराज आलाय, त्याच्या हाताला लई यास् हाय म्हनत्यानी ! त्याच्या तोडग्यानं लई वांझुट्या बाया लेकुरवाळ्या झाल्यात् ! आपुन एकदा त्याच्या-कडं जाऊ ! हे ऐकून रखमाला थोडं बरं वाटलं अन् ती सावरून बसत किंचित हसून म्हणाली, जाऊं की, उद्याच जाऊं; लेकरासाठी मी वाट्टल ती करायला तयार हाय !

सरु मावशी खिनभर बसली अन् घोटभर च्या पिऊन बाजाराला निघून गेली. पण रखमाला मारती येऊस्तर डोळभर कुठं करामलं नाय. तिच्या मनात आपल्या वांझपनाचं उनं सारखं खुपत राहिलं आपल्याला गावातले लोक, शेजारपाजारच्या लेकुरवाळ्या बाया वांझ म्हणत असतील, आपल्याकडं येगळ्या नजरेनं बघत असतील, आपल्या वांझपनावर हासत असतील. नेहमी मारतीच्या मिठीत डाराडूर झोपणारी रखमा त्या दिसच्या राती सारखी ह्या अंगावरनं त्या अंगावर होत होती; अन् पाण्याभाइर काढलेल्या मासुळीगत तडफडत होती. कवा एकदां ही रात उजाडतिया असं तिला झालं होतं.

सकाळी रखमा लवकरच उठली. पारुस झाडून लोटून काढलं. बैलाचं शान काढून आंगूळ केली अन् मारतीला उठवून च्या ठिवला. आज रखमा विजेसारखी लवत होती अन् भराभर कामं आवरत होती. मारतीनं आंगूळ करून च्या घेतला. न्याहरी केली अन् दुपारच्या भाकरी घेऊन सरजा राजासंग रानात निघाला. जाता जाता रखमाच्या गालगुच्चा घेऊन म्हणाला, आज लई गाडी खुषीत दिसतीया ? काय भानगड हाय ? रखमा लटक्या रागानं म्हणाली, भांगड–बिनगड काय नाय ? सरु मावशीनं जरा बोलावलय तवा जाऊन येती ! जा की, मी कुठं नाय म्हणतूया, पर जरा येरवाळीच.. ! मारती गेल्यावर खोपटाला कुलुप घालून रखमा बिगीनं सरु मावशीकडं गेली अन् तिला संग् घेवून मोऱ्याच्या वाड्यावर गेली.

मोऱ्याच्या वाड्यात वांझुट्या बायकांची रिघ लागली होती, जणू जत्राच भरली होती. नरबदा आजीनं रखमाला लांबनं बघून जवळ बोलावली अन् आपल्या वशिल्यानं तिचा नंबर लवकर लावला. सगळ्या बाया भायेर लंबर लावून बसल्या होत्या. साधू महाराजाजवळ जाऊन रखमा बुजल्या कालवडी-सारखी अवगडून बसली. अन् नरबदा आजी दारात बसली. साधू महाराजांनी रखमाला एकटक खिन्भर बघितलं अन् म्हणाले, पोरी ! लई भाग्यवान हाइस म्हणून लवकर हिकडं आलीस, मी सांगितलेला तोडगा ह्या पूनवेच्या आत केलास तर तुला चंद्रासारखं देखनं बाळ हुईल ! महाराज, आपण मला वाट्टल ते करायला सांगितलं तरी ते मी करील ! रखमानं वचन दिलं. महाराजानं बारीक आवाजात रखमाला सांगितलं,

त्या "ब" नी ज्याच्या नावाला सुरुवात होते अशा माणसावरुबर सोबत केली पाहिजे, अन् ती पण ह्या पूनवेच्या आतच ! रखमा चटकन् उठली, अन् महाराजाला नमस्कार करून भायेर आली.

येरवाळीच दिस मावळायच्या आत रखमा आपल्या घरी आली. मारतीबी थोडचा येळानं रोजच्यासारखा घरी आला. पन् आज रखमा आपली वाट बघत दारात उभी राहिली नाय हे बघून थोडा काळवंडला, कुचमला. लगबगीनं बैलं बांधून खोपटात आला अन् बघतुया तर रखमाला हुंबाडून ताप भरलाय; हाथरुणावर ती कन्हत पडलिया, त्याचा जीव घाबरा झाला. कापऱ्या आवाजात त्यानं रखमाला हाक मारली, रखमा, ये रखमा ! काय झालं आज तुला ? तापानं अंगबी गरम झाल्या ?

मारतीचा कापरा आवाज ऐकून रखमा उठून बसली अन् म्हणाली, काय नाय, उन्हाचं जरा लवांडली होती अन् डोळा लागल्यावर सपान पडलं! सपनात सर्वे बाया वांझ वांझ म्हणून मला चिडवत होत्या ! ह्यात्तिच्या ! हेवढच ? त्यच्यापायी रडत वसलियास व्हय ? रखमाचे टपोरे डोळे धोतराच्या सोग्यानं पुसत मारती म्हणाला, 'रखमा, तुज्या डोळ्यात पानी बघितल्यावर मला लई कसनुसं वाटतं बघ ! असल्या भलत्या-सलत्या गोष्टिचा इचार करून उगच मनाला लावून घेत जाऊ नगस ! तुला काय करायचय जगाचं ? तुला म्या खंबीर हाय ना ! म्या कवा तुला ह्या गोष्टीपायी दुखावलंय का ? मग तू कां त्याची फिकीर करतियास ? त्ये का कुनाच्या हातचं हाय व्हय ? सगळं देवाच्या हातात !' रखमाला मारतीच्या शानपणाचं अन् समजुतीचं कौतिक वाटलं. ती थोडीसी हासली. गालावरची खळी बघून मारती बी हासला. रखमा अंग झाडून उठली. तोंडावर पानी मारलं अन् सांच्या भाकरी-तुकडचाला लागली.

रखमा रातभर "ब" अक्षराचं नाव ध्यानात आणत होती. शेवटी तिला बळीरामाची आठवण आली. बळीरामाची वायकू पाचव्यांदा बाळंतपणाला गेली होती अन् पाचवं प्वारच झाल्याचं सासुरवाडीवरनं टपाल आलं होतं. बळीराम पंचीस विघ्याचा मालक होता. हिर होती, मळा होता. अन् औंदा ऊसाचं पिक मळघात लावलं होतं. बळीराम स्वभावानं साधा-भोळा अन् सरळ माणूस होता. जवळच त्याचा मळा होता. मळघाची सगळी देखरेख बळीराम सोताच करायचा. त्येला आपुन आपली विच्छा पुरी करायला सांगितली तर....काय म्हनील त्यो ? रखमाला कोडं पडलं. रखमाचं दुसरं मन म्हणालं, व्हय म्हनील त्यो, आपलं म्हननं त्यो मोडणार नाय, त्याचं आपुन पाय धरु, इनंत्या करु, वाटूल ते करु, पन म्हाराजाचा तोडगा करुन बघायचाच! रखमाच्या मनानं पक्क ठरविलं. उद्या सुकीरवार, बाजार, नेहमी सारखा मारती बाजारला जाईल, मग आपुन बळीरामाच्या मळघात जायचं अन् त्याला एकटघालाच ऊसात गाठायचं. रखमानं सगळं कोष्टाक येवास्थित मनात आखून ठिवलं.

दुसऱ्या दिशी मारती नेहमीच्या वेळी बाजारला निघून गेला, रखमा मारती जायाचीच वाट बघत होती. मारती गेल्यावर थोडचा येळानं रखमानं खोपटाला कुलुप घातलं अन् मधल्या वांधानं बळिरामाच्या मळघाकडं निघाली. पायात कुलपी तोडं, बोटात चांदीच्या मासुळ्या, गळचात वज्रटिक, नाकात नथ ! आज रखमा नव्या नवरीसारखी दिसत होती. रसरसतं यौवन अन् साजशृंगार पुरुषी मनाला आव्हान करणारं होतं. रखमाच्या डोक्यात विचाराचं काहूर माजलं होतं. मारती बाजारातनं परत यायच्या आगोदर तिला माघारी खोपटात यायचं होतं, त्यामुळे वांधावरनं पळत होती. पळता पळता ठेचकाळत होती, पडत होती, उठत होती; अन् गडवडीनं बळीरामाचा मळा जवळ करत होती. एकदाची ती बळीरामाच्या ऊसात शिरली. दम लागल्यामुळे धापा टाकत होती, अन् त्यामुळे उरोजाची वर खाली हालचाल सारखी होत होती. घामानं सारं अंग डबडबून गेलं होतं त्यामुळं अंगाला चोळी जाम चिकटून बसली होती. भेदरलेल्या हरिणीसारखी तिची अवस्था झाली होती तरी सुद्धा घारीसारख्या शिकारी नजरेनं बळीरामाला ती ऊसात शोधत होती.

बळीराम सरीत पानी सोडून तंबाखूला चूना लावत मधल्या वांधावर वसला होता. अवचित रखमाला आपल्या मळयात बघून त्यो उठून उभा राहिला. रखमानं त्याला लांबूनं पाहिलं, त्याच्या जवळ धावतच आली अन् दोन्ही हातानं त्याचं पाय घट्ट धरून त्याला म्हणाली, दाजी, आज माजी विच्छा पुरी करा, माजी कूस उजवा, नाही म्हणू नका, माझ्यावर दया करा, मी तुमच्या पाया पडत्ये ! मला लेकुरवाळी म्हणून जगायचय, वांझ म्हणून नाय ! सारी दुनिया मला वांझ म्हणून चिडवतिया !

हा सगळा अद्‌भुत प्रकार बघून बळीराम दचकला, पुरता घाबरला. त्येला कापरं भरल्यागत झालं. रखमाला उठवत कापऱ्या आवाजात तो म्हणाला, रखमा ! येडी-बिडी झालियाच की काय ? अगं तुला म्या सख्या भनीपरमानं मानलं, कधी तुझ्याकडं तिरक्या नजरेनं, पापी वासनेनं पाहिलं सुद्धा नाय, अन् असलं पाप मला कराय लावून नरकात धाडतियास की काय ? कुनच्या दिड शान्यानं तुला असलं पाप कराय सांगितलं ? त्याच्या नरडीचा घोटच घेतू मी ! बळीरामाच्या खेकसन्याने रखमा भानावर आली. तिनं घावऱ्या घावऱ्या सर्व हकिकत त्याला सांगून टाकली. बळीराम थोडा शांत झाला. रखमाच्या पाठीवरनं भावाच्या मायेनं हात फिरविला अन् तिला, 'माझी येडी भन' म्हणून गळचाला लावली. रखमा बळीरामाच्या गळा पडून खूप रडली. नंतर त्यानं तिला दुसऱ्या दिशी सकाळी नर्वदा आजीच्या वाड्यावर यायला सांगून तो निघून गेला.

दुसऱ्या दिशी सकाळी मारती शेतावर गेल्यावर ठरल्याप्रमाणे रखमा नर्वदा आजीच्या वाड्यावर आली. अन् बायकांच्या घोळक्यात जाऊन बसली. थोड्या एळानं बळीराम घोंगडं पांघरून आला अन् सरळ महाराजा-पुढंच जाऊन बसला. महाराज त्येचा हा बावळा अवतार बघून म्हणाले, काय धनगर बाबा, काय म्हननं हाय ? बळीराम म्हणाला, महाराज मला धा वर्सं झाली प्वार नाय बाळ नाय, बायकूला जा म्हनलं तेर मला लाज वाटतिया म्हनून आली नाय, तवा सोताच आलोय सकाळच्या पाऱ्यात ! मेंढरं सोडल्याती डोंगरावर ! अस् अस् ! बघू तुझा हात ? हात अन् तोंडाकडं बघून महाराज बळीरामाला म्हणाले, तू कमनशिबी हाईस तुझ्या तकदिरात मूल बाळ नाय ! हे ऐकताच, नरवदा-आजीचं डोसकं फिरलं, तिचं पित्त खवाळलं. तिनं खराटा हातात घेतला अन् मेल्या मुड्या म्हणत महाराजाला बडवायला सुरवात केली. माझा बळीराम पांच पोरांचा बाप हाय अन् त्याज्यासारखा भाग्यवान ह्या शिवारात खंदील लावून हुडाकला तर घावायचा नाय ! अन् त्येला तू कमनशिबी म्हणून त्येच्या तकदिरात मूलबाळ नाय म्हणून सांगतुयास ? भडव्या, आज पातूर किती आया-बायानला फसवलंस् ? तुझ्या किरडीचा बांबू ढासळला ! नरवदा आजी मोठमोठ्याने बोटं मोडून साधूला शिव्या देत होती अन् जमलेल्या सर्व बाया सापडंल त्यानं त्याला ठोकून काढत होत्या. आखिर शेवटी बळीरामनंच त्या मधमाशासारख्या तुटून पडले-ल्या बायकांच्या घोळक्यातनं साधूला ओढून बाहेर काढला अन् काढण्या लावून पोलीस ठेसनात पोचता केला.

हा सारा तमाशा स्वतःच्या डोळ्यानं रखमानं पाहिला. तिचे डोळे खाडकन् उघडले. तिच्या ग्यानात पडलेली माती एका झटक्यात दूर झाली. अन् ती पळतच आपल्या खोपटात निघून आली 'आपुन काय म्हणता काय करून बसत व्हतू, अन् रामासारख्या पतीला धोका देऊन नरकात जात व्हतू ! बळीदादा अकलेचा पक्का व्हता, म्हणून सगळं सावरलं, नाय तर आज आपल्या सोन्यासारख्या संसाराचं वाटूळं झालं असतं. जगात त्वांड दाखवण्यास आपुन लायक राहिलू नसतू, माय बापाच्या नांवाला आज आपुन सोताच्या हातानं काळं फासत व्हतू ! देवा, परमेशेरा ! मला माफ कर ! असली चूक मी पुनः जलमात करणार नाय ! मला लेकरुं नाय दिलं तरी चालंल पन असली बुध्या पुनः देऊ नगस ! मला जगानं वांझ म्हणली तरी चालंल पन असलं महापाप माझ्या हातनं होऊ देऊ नगस ! रखमा रातभर चावळत होती, झोपेत बडबडत होती अन् मारती बिनधास्त घोरत पडला होता.

किनारा

आज किनारा गातो येथे विरहाचे गाणे
कधी न घडले मुसाफिराचे परतून ते येणे...

लाटांवरती कांचन पसरीत किती सूर्य विझले
झाडांमधुनी चंद्र कोवळे वाळूवर सजले
रिते मनाचे गूज, स्तब्ध हे लाटांचे पाळणे...

कधी अचानक जुळून आल्या हृदयाच्या तारा
दूर क्षितिजी मनात उमले शुक्राचा तारा
वादळात ती वाहून गेली शपथांची बळणे...

बालपणीचे खेळ रंगले माडांच्या रांगेत
शंख शिंपले मांडुन सजली स्वप्ने त्या समवेत
निरोप घेता मूक जाहले शब्दांचे बोलणे...

—— सुधाकर नेर्लेकर

अनुक्रमणिका

काळोखसांजवेळी

काळोखल्या दिशांनी हाकाटले मनाला
काळचानिळचा अभाळी काळोख दाटलेला
एकेक तारकांचे डोळे खुणावताती
पैलाड उंच झाडे अंधार चाचपीती
दूरात थेंबलेले आकारतात दीप
ओथंबल्या ढगांनी आकाश ये समीप
झाडांत पाखरांची किलबीलही निमाली
वेलींवरी फुलांना घनगर्द नीज आली
कुठल्या वनात जागी ती रातराणि फक्त
दु:खीत भावनांनी सोडीत दीर्घ श्वास
आस्तावल्या दिशांना हलकेच नीज आली

झाडे कळचाफुलांच्या लावीत तीट गाली
मी पाहतो दुरून पाण्यात दीप न्हाले
अश्रू जणू दिशांच्या डोळ्यात दाटलेले
झाडे दुभंगलेली काळचाकभिन्न वेळी
आर्तावल्या दिशांना अंधारदु:ख जाळी
डोकावतो मनाच्या खिडकीतुनी उगा मी
वेडीखुळी अकांक्षा येईल हाक कानी
वाटे उगाच चित्ती देईल कोणि साद
आहे उभा कधीचा काळोखवेध घेत
ऐसी उदास वेळा अन वाट हे पहाणे
काळोखसांजवेळी सारेच जीवघेणे

--मुरलीधर कुळकर्णी

* * *

तेव्हा

हा हमरस्ता, ही घरें
हा नुक्कडच्या लाईटचा प्रकाश
ओळखीचे वाटते नाही ?
आपण मुडदे नव्हतो तेव्हा
येथेच तर आपण रहात होतो
मेलेले आयुष्य जगत
आपणाला मुले होती, मित्र होते.
वडीलधारी माणसे होती.
सगळयांना जसे संसार असतात
तसा आपलाहि संसार होता.
या साऱ्यामधून आपण शिणगार करीत असूं
संसाराच्या तरवाला सांभाळण्यासाठी
आपण साजरे करीत असूं
जन्माचे आणि मरणाचे उत्सव
या हमरस्त्याने, या घरांनी
हे सर्व पाहिले आहे
आपण मुडदे नव्हतो तेव्हा
जीवंतपणाचे मुखवटे घातलेले.....

--दत्तात्रेय उकंडे

कविता

ही पायवाट
वहिवा:टीची
दिवस रात्र
मळणारी
सुख दु:ख
लावणारी
तू मी
करणारी

हे सर्व
सदैव
माझ्यात
असूनही

सर्वदूर मी

--वसंत दत्तात्रेय गुर्जर

अनुक्रमणिका

कविवर्य 'बी'—संस्मरण

मृणाल चिंचाळकर

आधुनिक मराठी कवितेला सामाजिक आशयाचे अंकुर फुटायला लागल्याचा तो काळ. याच काळात मनीच्या तरल संवेदना सोबतीला घेऊन एक पथिक काव्यप्रांतात नवनिर्माणाच्या प्रवासाला निघाला. त्याची ओळख आधुनिक मराठी कविता 'कविवर्य—'बी'' अशी सांगते.

असं म्हणतात की प्रत्येक वाङमयकृती ही त्या जन्मदात्याच्या व्यक्तिमत्त्वाचा विलग झालेला तुकडा असतो कवी 'बी' यांच्या संदर्भात हे विधान तेवढेसे 'स्पष्टपणे' लागू पडत नसले तरी त्यांच्या लौकिक जीवनातील कांही घटनांचे, प्रसंगांचे ठसे त्यांच्या लेखनातून वेगळे रूप आणि संदर्भ घेऊन वावरतात.

जीवनातील चढउतार, त्या अनुभवाने आलेली जीवनदृष्टी आणि सामंजस्य हे 'बी' च्या जीवनाचे खरे 'अनुभववेदांत'! 'बी' च्या जीवनातील सखोल अनुभवांचे क्षण त्यांच्यासाठी वैदिक ऋचांची शक्ती घऊन आले. केवळ अध्ययनातून जन्माला येणाऱ्या गूढवादापेक्षा 'अनुभवप्रसव' गूढवाद त्यांच्या काव्यात प्रभावी ठरतो. म्हणूनच 'बीं'ची कविता कधीमधी गूढवादाची चकाकणारी उत्तुंग शिखरे दाखवीत असली तरी तिच्या काळजातील सांद्रपण साध्या वाचकालाही चिंब करून जाते.

कविवर्य 'बीं'च्या समकालीन आधुनिक कवींमध्ये जी व्यक्तिगत सुखदुःखाच्या प्रगटीकरणाची प्रवृत्ती दिसते ती 'बीं'च्या ठायी (माझी कन्या अपवाद) आढळत नाही. त्यांच्या कवितेत सुखदुःखे वैश्विक स्वरूप लेवून येतात. कवितेच्या गर्भात हेलावणारे उमाळे मानवतेशी सुसंवाद साधतात. विराणीचे आर्त स्वर छेडित बसण्याचा छंद तिला नाही. तिला वेध आहेत अलौकिकाच्या मार्गावरचे प्रेममूलक स्वरझंकार वंदित्त करण्याचे. म्हणूनच व्यक्तिगत सुखदुःखाच्या सुस्काऱ्यांनी त्यांच्या अनुभवाच्या क्षितिजाला सीमित केले नाही. वैयक्तिक भावनांच्या अलिप्ततेचे दर्शन त्यांच्या पहिल्याच 'नावात काय आहे'? या कवितेत घडते. ते म्हणतात—

> ह्या प्रमदवनांतरि शिरले—जे जन,
> तरुलताचि अंगे झाले—आपण,
> निजनामरूपहि गेलें—विसरुन,

अशी व्यक्तिगत खाणाखुणा विसरून जायची त्यांची धडपड. आपले लौकिक अस्तित्व जगापासून इतक्या कटाक्षाने लपवून ठेवणारा 'बी' हा महाकवी.

'बी'च्या प्रतिभेला फुलोर आला तो वयाच्या चाळिशीनंतरच. ह्यावेळी त्यांची जीवनदृष्टी संयत आणि स्थिर झाली होती. त्यामुळे खडकाळ प्रदेशातून द्रुतगतीने धावणाऱ्या नदीचा वरवरचा खळखळाट तिथे नव्हता. आत्मानुभूतीच्या गहनकंदरातून वाहणाऱ्या संथ नि सखोल जलौघाचे स्वरूप 'बी'च्या काव्याला प्राप्त झाले होते. त्यांच्या काव्यातून भावभावना अपरिहार्यपणे डोकावतातच, पण त्यांना वैचारिकतेचे भक्कम अधिष्ठान लाभलेले असते. त्यामुळे त्यांचे काव्य आगळीच वाङमयीन उंची गाठून जाते.

आशावादाचे मंगलसूर

कवी 'बी' यांची विचारसरणी निवृत्तीपर नाही; प्रवृत्तीपर आहे. त्यामुळे कवितेला उदात्तता लाभली. त्यांनी जी गाणी गायिली ती आशावादित्वाची. व्यक्ती आणि सामान्यजन म्हणून जीवनातील जळमटे दूर सारतांनाही नव्या युगातील आशावादित्वाचे आणि सुंदर संस्कारांचे हुंकार ऐकण्यात आणि त्यांना योग्य प्रतिसाद देण्यात ते मागे राहिले नाही. त्यांच्या मनाच्या तळाशी समाजसुधारणेची कोवळी वेल अंकुरत असावी! त्यांच्या प्रवृत्तीपर आशावादित्वाने आणि समाजविषयक आत्यंतिक जिव्हाळ्याने त्यांचे विज्ञाननिष्ठ—पुरोगामित्वाशी नाते जोडले. कविवर्य 'बीं'चे समकालीन कवी गोविंदाग्रज व बालकवी ठोंबरे जेव्हा

निराशेची गीते गात होते त्याच वेळी आशेचा मंगल-सूर धरला होता कवी 'बी' यांनी. ते म्हणतात--

'चल ऊठ, भाग्य लूट जगतात'

कवी 'बीं'ना लौकिक जीवनातील भौतिक साधनांची व त्यांच्या सामर्थ्याची कल्पना होती. अध्यात्माच्या नुसत्या पोकळ वढाया मारणाऱ्या भारतीयांच्या वृत्तीचा 'तीव्र जाणीव' या कवितेतून त्यांनी निषेध केला आहे. समाजसुधारणाविषयक जाणीवांचा सन्मान करतांना ते म्हणतात--

भावीभारत-भाग्यसूचक महाचिन्हे दिसो लागती,
तों तों तीव्र समाजशुद्धिकरितां जाणीव होते अती !

उत्क्रांतीचा डंका

सामाजिक रूढी, अन्याय, विषमता ही भारतीय समाजाच्या जीवनवृक्षाची बांडगूळे. त्यांचा निःपात करून जीवनरसाने बहरणारा वैभववृक्ष फुलावा म्हणून मराठी कवी पुढे सरसावले. आणि सामाजिक उत्क्रांतीचा 'डंका' झडला. विधवांचे क्लेश, बालविवाह, स्त्रियांचे दास्यत्व, अज्ञान, अस्पृश्यता इ० सामाजिक विषय काव्यविषय झाले.

या स्थित्यंतराला 'बीं'ची कविता सन्मुख झाली. स्वातंत्र्य, समता, बंधुत्व यांचे यशोगान ती गाऊ लागली. 'दीपज्योतीस' 'आशादेवी', 'तीव्र जाणीव,' 'डंका', 'आम्ही', 'प्रभातपोवाडा', 'भगवा झेंडा'–आदि कवितांतून त्यांच्या पुरोगामी वृत्तीचे प्रत्ययकारी दर्शन घडते. समृद्ध समाजजीवनासाठी, 'बी'कवी जनतेला खऱ्या धर्माची, नवजाणीवांची ओळख काव्यातून करून देतात. कर्तव्याचा आणि कल्याणाचा मार्ग दाखविण्यासाठी नवविचारांचे सुधारक निर्माण व्हावयास हवेत–असा मार्मिक विचार 'डंका' या कवितेतून मांडतात.

वेदनेचा उद्‌गार

घातक आणि जाचक समाजरूढींची शिकार झालेल्या स्त्रियांची दुःखे व त्यांच्या व्यथांविषयी कवी 'बी' संवेदनशील आहेत. त्यांची 'दीपज्योतीस' ही कविता ह्याच वेदनेचा उद्‌गार! या बालविधवेच्या करुणतम दुःखास वाचा फोडताना ते समाजसुधारकाची, स्त्रीहितकर्त्याची भूमिका घेतात. हळुवारपणे 'दीपज्योती'च्या दुःखाला गोंजारतांना समजावणीच्या सुरात म्हणतात—

'दाने दे न कुणा निसर्ग। धन तो व्याजे तुम्हा देतसे।
ते त्याचे ऋण टाक फेडुनि गडे। राजीखुषीने कसे'

पुनर्विवाह न करणाऱ्या विधवेची अशी लडिवाळ समज घालतांना त्यांची वाणी तत्कालीन पुनर्विवाह विरोधी मतांचा परामर्श घेते पण क्रुद्ध होत नाही, किंवा विधवेची दुःखे सांगतांना अश्रूही ढाळीत नाही; तर निसर्गाच्या उत्क्रांतीचा व समतेच्या महान तत्वांचा या निमित्ताने उद्‌घोष करते—

'वाढा आणि जगा निसर्ग म्हणतो सृष्टीस भूतात्मिका'

जीर्ण जाणीवांना नवे कंगोरे

उत्क्रांती व्हावी, जुन्या जागी नवे यावे, नव्हे तसे येणे अपरिहार्यच, याची 'तीव्र जाणीव' ते करून देतात. जन्माने ठरलेली जातपात, उच्चनीचपणा, स्पृश्यास्पृश्यता यांनी वरवरटलेल्या जीर्ण जाणीवांना नवे कंगोरे पाडण्याचा प्रयत्न करतात. जीवनाच्या सर्वस्तरातील विषमता नष्ट होऊन सन्मान्य आणि समृद्ध विचारघन जीवन साऱ्यांना जगता यावे असे त्यांना प्रकर्षाने वाटते. समाजाचा हा कायापालट घडून येण्यासाठी संघटित प्रयत्न हवेत हा विचार पुढील शब्दातून प्रगट झाला आहे.

भागीदार कृतीत मानव असे कालानिसर्गासवे;
आणा त्यास समीप एकवटुनी यत्नप्रयत्नोत्सवें.

सामाजिक आणि आर्थिक विषमतेतून मुक्त झालेलं जग पाहण्याचे स्वप्न त्यांची कविता उराशी बाळगते. या स्वप्नांना मार्क्सटच आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरू नये. कारण संपूर्ण जगातील उत्क्रांतयुगाचा प्रारंभ मार्क्सविचारसरणी फोफावायला लागलो त्या काळाच्या आसपास आहे. कविवर्य 'बीं'नाही कदाचित हा प्रभाव मान्य असावा. अन्यथा आर्थिक विषमता दूर करण्याचा विचार एव्हढा प्रभावीपणे त्यांच्या कवितेत डोकावता ना? याच संदर्भात त्यांची 'जादू'ही कविता लक्षणीय आहे.

मानवतेचा कैवार घेणारी, समता, स्वातंत्र्य, बंधुता यांची पूजा बांधणारी 'जादू' ही निर्भेळ समाजवादी कविता. माणसाच्या व्यथा आणि विवंचना चटकन दूर करता येईल अशी 'जादू' कोठे मिळेल कां? ही तळमळ इथे व्यक्त झालेली. ह्या बुर्ज्वा समाजानं सारी संपत्ती आपल्या आगरांमध्ये दडवून ठेवलेली. हे संपन्नतेचे भांडार फोडून तिचे समान वाटप

व्हावे आणि हक्कदार असलेल्या सामान्य माणसालाही तिचा उपभोग घेता यावा. पण रूढी, अज्ञान, अस्पृश्यता ह्यांनी गच्च आवळलेल्या सामान्य माणसापर्यंत हे रास्त सुख पोहोचेल कां ?

ते पोहचविण्यास एखादी 'जादू' कोठे मिळे कशी ! ही कवीला त्रस्त करणारी विवंचना ! कदाचित् ती 'जादू' म्हणजे 'संपूर्णक्रांती' तर त्यांना अभिप्रेत नसेल ना ? पण त्याविषयी स्पष्ट न बोलता त्या 'जादू'ची प्रसन्न पाऊले सामान्यांच्या दारी वाजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. तत्कालीन सामाजिक परिस्थितीमुळे आणि राजकीय वचकामुळे ते स्पष्टपणे लिहू शकले नसावेत. पण त्यांनी 'जादू कोठे मिळेल कशी !' या ओळीच्या शेवटी उद्‌गारवाचक (!) चिन्ह वापरून आपला उद्देश पुरेसा सूचक केला आहे. दडलेली व्यथा बोलकी केली आहे. पुढील ओळीत तर त्यांच्या क्रान्तिदर्शी प्रतिभेने घेतलेली भरारी स्पष्टपणे जाणवते —

चिवट रूढींच्या कचाटित
धुरिण पडले कुचंवत;
चिरडुनि तिजला
यशोध्वजेला
दिगंतरी रोवील अशी
जादू कोठे मिळेल कशी !

नवनिर्माणाचा हुंकार

सामाजिक अन्याय, रूढी, अस्पृश्यता, स्त्रियांची मानहानी आणि कुचंबणा पाहून व्यथित झालेले त्यांचे मन समाजपुरुषाच्या पायात अडमडणाऱ्या शृंखलांना झुगारून देण्याचा नवसंदेश द्यायला पुढे सरसावते. यावेळी ते आपल्या शब्दसामर्थ्याने माणसातील माणुसकीला आवाहन करतात. त्यांच्यातील दडून बसलेल्या समतेच्या देवाला प्रगट होण्यास 'डंका' झडवितात. या आव्हानात नवनिर्माणाचे इप्सित मनोमन कुरवाळणाऱ्या मार्क्सच्या विचारांचे 'लालरंग' झळकून जातात.

कविवर्य 'बी' यांच्या वाणीने नवनिर्माणाचे गीत, हळव्या, प्रसन्न, अर्थवाही आणि सोज्वळ भाषेतून गायिले आहे. सुधारणेचा पुरस्कार करणारी त्यांची कविता. तिला कधी गूढत्वाचे आणि अध्यात्माचे प्रकृतिविशेषी लेणे लाभले एवढेच ! पण तिचा आत्मिक हुंकार जाणवतो तो नवे घडविण्याचा, नवे जगण्याचा, नवे पाहण्याचा !

देखावा

चहावर चहा
नमस्कारावर नमस्कार
तू तसा मी —
परंपरेच्याच कोषात मरून पडलेले
माणुसकीचे गहिवर
रूढ चाकोरीत रुतलेल्या पायांना
स्वप्न पडत नाही हिमालयाच्या शिखराचे
ओली कातडी असेस्तोवरच
पोवाडे नाचतात परस्परांच्या जिभेवर
परस्परांचे.
अशा वेळी हृदयाचे
नकली हुंदके भराभर ऊतू जातात
पण, नाकासमोरची दिशा
पाठमोरी झाल्यावर
माणसं माणसालाच शिळे होतात
ढुरशी चढलेल्या अन्नासारखे
असे दिखावू सत्कार
खुशाल करावेत करणारांनी
मला मात्र ग्रीष्मातही जीभ ओली ठेऊन
रस्त्यारस्त्यावरची माणसे
सावडायची आहेत.

— दे. शि. दुधलकर

कवी

कवि कसा दिसतो
गोरटेला
उंच
धिप्पाड
काळा
कलुटा
की खपाटी पोट टेकलेला
की कसाही,
शब्दांमागे झुरणारा
त्यांच्या वागण्यातनं अर्थ शोधणारा,
त्याला सदोदित वाटायची खात्री
की तो असतो सगळ्यांसारखाच
पण तरी त्याच्या हातात हाडांचे तुकडे
प्रकाशा गावातून खणून काढलेले,
तो कुत्र्यासारखा न लाचार
न लाळ घोळणारा
तर तो तालेवार नि माथेफिरू
दुष्काळासारखा.

त्याला मुले भेटली नि तो हुरळला
उंच पुलावर
तो पाण्याकडे पहात राहिला
समोरनं येणारी एस्टी मग मुलांनी चुकवली.

बदलत्या ऋतुमानात
आत स्थिर झालेला पक्का दुष्काळ
त्याला कळाला होता
म्हणून तो भुकेला भणंग
पोरकट
नी आरश्यागत काळ्या मातीत लोळणारा,
तो कवि
की एक बेघर फिरता बाण
तीव्र होत,
मोकळा होत.

अलिकडे तो सगळ्या गावातनं फिरतो
धीमे धीमे
पण मृत्यूचं दुःखद बुजगावणं
बाजूला टाळून,
हातभर अंतरावरून.
तो हिंडतो धीमेधीमे
माणसांची डिझाइनपण बदलून टाकीत
जिथे देव दगडाचा
नि माणूस मटनाचा
तिथे तो हिंडताना थांबतो
नि उत्साहात
प्रचंड अहंकारी लुटारूंसमोर
त्वेषाने
कठोर रोंरावतो.

——तुळसी परब

* * *

एक कविता

कोऱ्या कवितांचे बन एक पेटलेले !
बन मग नसतेच ते कोऱ्या कवितांचे,
असते पानच ते कवितेचे एक मिटलेले
पानही नसते ते एका आयुष्याचे,
तरीही कोऱ्या कवितांचे बन मात्र पेटलेले !

—भगवंत क्षीरसागर

दुर्दैवी

रेखा भिवगडे

पांढरा शुभ्र रंग त्यागाचं आणि शांतीचं प्रतीक ! हाच पांढरा शुभ्र रंग शांतीच्या ऐवजी अशांती निर्माण करतो, ह्याचं प्रत्यंतर म्हणजे हॉस्पीटलचे वार्ड ! सारं हॉस्पीटल पांढऱ्या शुभ्र रंगानी अनेक वेदना, अनेक कण्हणारे स्वर आणि अतृप्तता, क्षणाक्षणाला प्राशन करीत असतात. भकास गंभीर वातावरण ! अशांत शांती अनुभवाला येते ती फक्त हॉस्पीटलमध्येच !

शरीराला न पेलवणाऱ्या न जाणवणाऱ्या वेदना ! त्या वेदनांचं मेंदूकडून होणार मोजमाप. अर्धवट शुद्धीत, ग्लानीत हरवलेल्या वेदना. सारंच असह्य !

अशीच एक व्यक्ती त्या पांढऱ्या रंगात हरवलेली ! वेदनांचं मोजमाप. कमी जास्त नाडीचे ठोके. हळू हळूच हालचाल. सारंच अशांत ! फक्त शेवटच्या उदकाची मागणी करणारा आवाज ! पण खरंच ती मागणी शेवटची होती कां ? नाही, ती व्यक्ती एवढी सुदैवी नव्हती. त्या व्यक्तीनं आपणहून सुदैवाकडे पाठ वळविली होती, आणि आता सुदैवानं परत त्या व्यक्तीच्या आयुष्यात कधीच न येण्याची जवळ जवळ शपथच घेतली होती !

पाण्याच्या घोटासरशी आत उतरलेली वेदना आता त्या व्यक्तीच्या डोळ्यासमोर एक एक दृश्य साकारू लागली.

जीवनबंधाची सीमारेषा तोडण्यापूर्वीचं आयुष्य. बालीश, सुंदर, गोंडस 'रत्ना' झुळझुळणारं निर्झर हास्य करू लागली. पहिलं वहीलं प्रेमवेलीचं फूल. सुगंधित फूल. नाचत होतं, नाचवीत होतं. पण मग निर्बंधतेच्या हव्यासानं ते फूल हासता हासता दुसऱ्याला रडवीत होतं, प्रेमाला ठोकर मारून स्वत: निर्माल्य झालं होतं !

मध्यम कुटुंबातील एकुलती एक रत्ना मोठ्या कोड-कौतुकानं वाढली होती. तोंडून निघेल ते वाक्य उचलल्या जात होतं. पण रत्ना ! ती हट्टी, हेकेखोर आणि जिद्दी होत चालली हे बीज बालपणीच रोवल्या गेलं. परिस्थितीचं खतपाणी मिळून आता त्याचा वृक्ष झाला होता.

प्रवासी मर्यादेची लक्ष्मणरेषा अविचारानं कधी उल्लंघून जाईल याचा नेम नाही. त्याच्या जोडीला पैशाची धुंद असली तर मग विचारायलाच नको. तिमिराच्या प्रवाश्याला उजेड कसा बरं सहन होणार ! धनापायी नातं, गोतं, प्रेमाचा देखील अव्हेर रत्नानं केला होता. सहा वर्षापूर्वी तिच्या डोळ्यांवर झगमगाटाचं आणि पैश्यांचं सावट चढलं होतं. जीवनभर साथ देणारी आईची माया व प्रेम लाथाडून रत्नानं काय मिळविलं ? ठोकरांच्या गुणाकारानं तिचं जीवन व्यापून टाकलं आणि जिवंतपणीच असह्य मृत्यू जगत ती श्वास घेत होती.

रत्नाचं चुकीचं माप फारच मोठ्ठं होतं. ते भरता भरता ती झिजत होती, खंगत होती, पण नष्ट होत नव्हती. अजून नियतीचा तिच्यावरचा राग ओसरला नव्हता. तिच्या आधीच्या विचारात आणि आता घडलेल्या प्रकारात फार मोठं अंतर होतं. एक विचार आकाश होते तर घडणे पाताळ होते. नियतीचा क्रूर पंजा तिच्यावर तडखत होता आणि त्या पंजाच्या जबरदस्त तडाख्याने ती निपचित झाली होती. अन् आता त्या पंजाची तीक्ष्ण नखं भसाभस काढली – घातली जात होती.

रत्नानं हळू हळूच हालचाल करून पाहिली. अधू झालेला न हालणारा उजवा पाय ! त्यातील जाणवणाऱ्या असह्य कळा, वेदना तिच्या डोळ्यासमोर तरळणारे ते सुखद मस्तीचे क्षण अधिकच जिवंत करून गेले घर् घर् भस् भस्..ट्रकचा आवाज ! क्षणाचा विलंब न करता ट्रक समोर झोकून दिलेला देह आणि मग.. हॉस्पिटल !

रत्ना एक हुषार विद्यार्थिनी होती ! सायन्स घऊन डॉक्टर व्हावं हे तिचं भावी स्वप्न ! पण फारच थोड्यांची स्वप्ने साकारतात. त्या सुदैवी लोकात रत्ना नव्हती. तिच्या स्वप्नावर परिस्थितीनं मात केली आणि रत्ना आर्टस्‌ची विद्यार्थिनी झाली. झालं ! आर्थिक परिस्थितीची अढी रत्नाच्या मनांत रुजू लागली. रोजची ओढाताण, दोन वेळची तोंड मिळवणी करता करता दमलेले, थकलेले आई–बाबा ! आणि हट्टानं डॉक्टर होवू घातलेला छोटू. तिचा छोटा भाऊ.

मुलीच्या मर्यादशील वागणुकीसाठी नित्य सुनविल्या जाणारी वक्तव्ये. रूढींची बंधनं ! आणि लक्ष्मण रेषेतलं जीवन ! तिला असह्य व्हायचं ! कॉलेजच्या रंगीबेरंगी जीवनात ती रंगून जात होती. आई बापांच्या प्रेमळ सूचनांचा निरर्थक अर्थ लावीत होती. तशातच तिची ओळख लतिकेशी झाली. श्रीमंत आईबापांची एकुलती एक लतिका आईवडिलांकडून दुर्लक्षल्याच गेली होती. पैशाच्या सोबतीला लतिका आणि लतिकेच्या सोबतीला स्वच्छंदता, स्वैरता.

कॉलेजच्या पहिल्याच दिवशी रत्ना लतिकेच्या मॉडर्न चैनीत – स्वैरतेत ओढल्या गेली आणि मग वाहवतच गेली. रत्ना आता आपलं आधुनिकतेचं वेड मोकाट सोडू लागली आणि हीच स्वैरता आज भयंकर रूप घेऊन समोर उभी होती. रत्नाचं आधुनिकतेचं वेड बघून आई–बाबा हादरून गेले होते. आई नेहमी तिला सुचवायची ' रत्ना नको गं असं वागूस ! लतिका श्रीमंत आहे. आपल्याला हे श्रीमंती चोचले परवडणारे नाहीत. रत्ना, आजचं ठीक आहे पण उद्या अवघडेल. ' पण रत्ना कुठं ताळ्यावर होती. आधुनिकतेच्या नादात सद्‌सद्‌विवेक बुद्धी हळू हळू पार रसातळाला जात होती. ती वर खेचल्या गेली, ती नियतीच्या क्रूर तडाख्यानेच खेचून काढली.

आजही आता तो दिवस आठवून लतिका हळहळत होती. पण तेव्हा घसरलेला पाय आज तिला खोल खोल गर्तेत घेऊन आला होता. तो दिवस ! तेव्हाच किती आनंददायी रमविणारा झममगाटाचा होता पण आज तोच दिवस डोळ्यांत सलत होता, मनांत खुपत होता. आणि मन आक्रंदत होतं, कां ? कां तो दिवस माझ्या आयुष्यांत उगविला ? तो दिवस ! ज्या दिवशी तिनं आणि लतिकेनं सिनेमाचं खूळ घेऊन घरांतूनच नव्हे तर, गांवातूनही पळ काढला होता, आणि अनेक ढंगी अनेक रंगी नाना कळा ल्यायलेल्या मुंबई शहरांत आल्या. त्यांचा नवखेपणा चाणाक्ष मुंबईकर मवाल्यांनी लगेच ओळखला आणि त्या मुंबईच्या अनेक विध रंगातील काळचा गडद कुट्ट रंगात बुडत गेल्या !

दोघीही आई–वडीलांना सोडून एवढ्या मोठ्या शहरांत प्रथमच एकट्या आल्या होत्या आणि मवाल्यांच्या संगतीत फसवून सिनेमा स्टुडिओत पोहचण्या ऐवजी अत्यंत क्षुद्र जीवनांत येऊन पडल्या ! आणि त्याच घाणेरड्या वातावरणांत वळवळत राहल्या ! लतिकेच्या सुदैवानं तिच वळवळणं बऱ्याच लवकर संपलं. पण··· रत्ना !

जी सुंदर स्वप्ने घेऊन त्या घरून निघाल्या होत्या त्या स्वप्नांचे सुंदर उंचच उंच मनोरे, ती चढण, तो सुंदर सोनेरी झळझळणारा कळस त्यांना दिसत होता पण तो कळस, ती चढण चढणे किती कठीण आहे, हे त्यांना कुठं ठाऊक होतं. ती एक धुंदी होती ! आणि आता पूर्वीचं सारं सारं आठवून, आई बाबांच्या आठवणी मनावर कोरडे ओढीत होत्या ! प्रेमळतेला ठोकरलेल्या ठेचा खात आजवरच जीवन सार कांही पण. . . .पण आता कांही त्याचा उपयोग नाही ! उंच धबधब्यावरून सळसळत खळखळत पडणारा प्रवाह ! त्या प्रवाहाकरता होती फक्त खोल खोल गती, त्या प्रवाहाला परत वाहणं माहीतच नव्हतं.

वरवर दिसणाऱ्या डौलानं त्यांना पार डोलावूनच लावले. त्यांना पार मोहून टाकले. तिथला दिवस म्हणजे रात्र, रात्र म्हणजे दिवस होता. आणि तिथल्या रात्रीनं दोघींच्याही डोळ्यापुढील झगमगाटाचं सावट क्षणात दूर दूर गेलं आणि दोघीही त्या रात्रीच्या उजेडात पोळून निघाल्या. तिथल्या पैशाच्या छन–छणाटाने त्यांची कर्णपटले फाटू लागलीत. पण आता त्यांना असंच पोळत राहावं लागणार होतं, असंच फाटावं लागणार होतं. आता त्याला पर्याय नव्हता. ही आग त्यांनी स्वतःच लावून घेतली होती. ही कात्री त्यांनीच धारावली होती.

तिथल्या रात्री म्हणजे शरीराचा सौदा होता ! निव्वळ शरीरसुखाच्या लालसेनं येणारे नरपशुच होते ते ! पण आता त्या जंगलात त्यांची वाट चुकलीच

होती, त्यांना त्यात भटकण्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता. तरी तिला आठवत होतं – त्या रात्री सर्वांची नजर चुकता क्षणीच त्यांनी जीवाच्या आकांताने पळ काढला होता पण. . . रत्ना लतिका दोघी एकत्र होत्या त्या क्षणापर्यंत तरी एकत्र होत्या. आणि रात्रीच्या शांत रस्त्यावर भरधाव धावणाऱ्या एका ट्रकने त्यांना कायमचे विलग केले, अलग केले होते !

लतिकेची आर्त किंकाळी ट्रकच्या आवाजात विरून गेली होती आणि ती शेवटचे आचके देत होती ! रत्ना तिच्या जवळ जाणार तोच मागून चार कठोर हातांची तिच्यावरची पकड घट्ट झाली आणि रत्ना पार हादरून गेली. त्या नराधमांच्या अर्वाच्य बोलण्याने आणि लतिकेच्या शेवटच्या अचक्याने रत्नाच्या हृदयाचं पाणी पाणी झालं ! ती आपल्या प्राणप्रिय सखीचा शेवटचा शब्द देखील ऐकू शकली नाही. आणि परत ती त्या घाणीच्या दिशेने प्रवाहित झाली होती. आता रत्नाच्या दैवात होती फक्त किड ! त्या किडेन ती आंतरबाह्य पोखरत होती पण तिला किडनाशक औषध गवसतच नव्हतं.

रत्ना ते आयुष्य मरता मरता जगत होती. तिनं सहा वर्षाच्या कालावधीत अनेकदा आत्महत्येचा प्रयत्न केला पण असफलताच आली. नाव रत्ना पण ती तर एक साधी कांच देखील नव्हती. त्या कांचेवर इतक्या तडा होत्या की ती नुसती कांचेची ठिगळ होती ! आणि सहा वर्षानंतर रत्नाला वाटलं आता हे काचेचं ठिगळ कायमचं नष्ट करावं पण दैव तिला तशी संधीही द्यायला राजी नव्हतं.

आणि हा आजचा त्या सहा वर्षानंतरचा दिवस. मृत्यूच्या याचकाला मिळाला फक्त एकच अघू पाय ! कालच हो, कालच ती त्या नरकातून बाहेर पडली होती. आणि परत एकदा आत्महत्येच्या अयशस्वी प्रयत्नात होती. भर्र भर्र. . .फट् फट् ट्रकचा आवाज आसमंतात घुमू लागला आणि रत्नाच्या मनात आत्महत्येचा विचार फेर धरू लागला, आणि ट्रक जवळ आली रत्नाने सरळ कुजका देह ट्रक समोर झोकला. क्षणात शुद्ध हरपली. मृत्यू ? छे छे ! मृत्यू कसा मिळणार ? तो तर रत्नापासून सदैव दूर दूर पळणारा; तो जणू रत्नाला तिच्या करणीचा अस्सल धडाच शिकवू पाहात होता. आणि आज हॉस्पीटलमध्ये रत्ना आपला स्वैराचारानं कलंकित, लांच्छनास्पद आयुष्यपट बघता बघता स्फुंदत होती. ढमाढमा रडत होती. तिचे स्फुंदणे ऐकून नर्स तिच्या जवळ आली आणि नर्सचे प्रेमळ लाघवी डोळे तिच्या आईच्या डोळ्यातील आर्ततेची, सावधतेच्या प्रेमळ सूचनेची आठवण करून देत होते. शरीर वेदनेपेक्षा रत्ना एवढी मानसिक वेदना सहनच करू शकली नाही आणि ती बेशुद्ध झाली. धावपळ करून नर्सनं डॉक्टरांना बोलावल. डॉक्टरांनी शिकस्त करून तिला शुद्धीवर आणले. रत्नानं डोळे उघडले –– तोच प्रेमळ बाबांच्या चेहेऱ्याशी जुळणारा चेहरा. . ! स्मृती ताणल्या गेल्या आणि रत्नाच्या तोंडून अस्फुटतेने बाहेर पडले ' छोटू ! ' डॉक्टर आपल्याच तालात होते. त्यांनी तिला धीर दिला. ' निव्वळ पायावरच निभावलं आहे. काळजी करू नका ' तोच आवाज कानांना ओळख पटवून गेला. नक्कीच छोटू ! छोटूच्या 'कोणी नातेवाईक आहेत कां ?' या प्रश्नाला तिनं नकारात्मक मान हलविली होती. ती काय सांगणार ?

ती कसं सांगू शकली असती की मी, मी तुझी पळून गेलेली ! हो, पळून गेलेली ? हो पळून गेलेलीच बहीण आहे. आता मी त्याची बहीण म्हणवून घेण्याच्या लायकीची आहे का ? हा प्रश्न वारंवार तिच्या मनात तरंगून गेला. तिच्या कलंकित जीवनात त्याचे शुद्ध, त्यागमय, सेवाजीवन डागाळायला नको होते. किती भयंकर शिक्षा ! आपल्याच माणसाशी अनोळख्यासारखं वागायचं. तेही इतक्या वर्षानंतर भेटल्यावर ! रक्त कुठं तरी सळसळत होतं पण –– ती तशीच तळमळत होती, मनातील वेदना अश्रूतून झिरपत होत्या !

तिला मृत्यू हवा होता, पण दुर्दैवी होती ना ! सारं काही तिच्या सहन शक्तीच्या परिसीमेबाहेर गेलं होतं. ती तळमळत होती – मन आक्रंदत होतं. डोळे अश्रु गाळीत होते ! नर्स आली. तिचं टेंपरेचर घेतलं. ठोके मोजले, आणि तिला पाव गोळी दिली आणि तिला गाढ झोप लागली. पण नर्सची हालचाल न्याहाळणारे तिचे डोळे फक्त बघत होते. ' व्हेस्पॉरेवर ' नर्स सकाळी तिला तपासायला आली तेव्हा ती जागी झाली तिची नजर औषधांच्या ट्रालीवर गेली, आणि तिच बाटली – ' व्हेस्पॉरेवर ' ! तीच अक्षरं डोळ्यासमोर नाचू लागली. नर्स इंजेक्शन भरण्यात मग्न होती. रत्नाच्या अंगात एकाएकी कांहीतरी संचारलं. तिच्या उजव्या हातानं ती बाटली अलगद लपविली

आणि नर्स डाव्या हाताला इंजक्शन देऊन पुढं गेली. ती नजरेआड होताच रत्ना बाटली न्याहाळू लागली. बाटलीत बऱ्याच गोळ्या होत्या! ना नातं ना गोतं माहित. एवढं कसं हे लोक आपली अगदी आपुलकीनं काळजी घेत आहेत? एकदम तिच्या डोळ्या-पुढून आई-बाबा, लतिका, छोटू आणि सहा वर्षांतील ते एक एक भयंकर लोक एका क्षणात तरळून गेले. आणि तिचं मन एका घृणेनं भरून आलं. आता हे जीवन नष्ट करायची सुसंधीच तिला मिळाली. तिनं मृत्यूची हात जोडून प्रार्थना केली आणि एका दमात सर्व गोळ्या खाऊन टाकल्या! शरीराची तडफड तड-फड होत होती पण एक मानसिक आनंद तिच्या चेहऱ्यावर निथळत होता. आणि तासा दीड तासात मृत्यूचं तांडव संपलं. मृत्यू अखेर तिच्या जवळ आलाच; त्याला यावंच लागलं!

थोड्या वेळानं दुपारच्या तपासणीसाठी डॉक्टर आणि नर्स आले तो रत्ना शांत समाधानात झोपलेली. पण त्या निष्णात डॉक्टरानं क्षणात ओळखलं...आणि नंतर रत्नाच्या मृत्यूसाठी नर्सला जबाबदार धरलं. कारण रत्नाच्या हातात तीच व्हेस्पारेटरची बाटली होती. विचारी नर्स सेवामय जीवनास वाहून घेतलेली, हे असं कसं घडलं, ते गूढ, ते रहस्य – तिला आश्चर्यमय वाटलं आणि त्या सेवामयी नर्सला अत्यंत दुःख झालं! पण रत्नाची आत्महत्या तिच्यासाठी एक भयंकर संकट टाकून गेली!

लतिका स्वतःचं दुर्दैव रत्नाच्या हवाली करून अचके देत गेली होती तर रत्ना स्वतःचं दुर्दैव नर्सच्या माथ्यावर लादून तळमळत्या शरीराने पण शांतीने गेली होती!

एका ऱ्हास झालेल्या सद्सद्विवेक बुद्धीचा व दुराचाराचा नाश झाला! स्वच्छ, शुभ्र वस्त्रांकित असलेली सेवामय प्रकृतीची निरपराध व निष्पाप नर्स तिला निलंबित करण्यात आलेला लखोटा हातात घेऊन एकवटलेल्या गडद काळोखाला नेत्रात समावीत खाली कोसळली!....

नाते

संध्येचे सुख हळवे झाडांतुन ओघळले
आकाशी पश्चिमेस पखरुनिया सोनफुले
पाण्याच्या पृष्ठावर उलगडते सोनसळी
बुडणाऱ्या सूर्याचा स्तंभ उभा दीप्त जळी
भिरभिरल्या पक्षांची आभाळी माळ झुले
आपुलिया तालातच नावेतिल शीड डुले
तालनृत्य संध्येचे लाटांनी आकळले
काठांच्या वृक्षांचे देहभान हारपले
दीपघरातील दिवा संध्येला पालवतो
आणि तिचा जीव खुळा वरवरती येतो
भ्रांतीतुन अभ्रांचे भानावर येत थवे
गगनाच्या ओठांवर रंगांचे गीत नवे
पाण्यावर उमलुन ये ऊर्जस्वल कमलफूल
काठाशी वृक्षांना पडलीसे स्वप्नभूल
पानांच्या देठांशी गीत कुसुंबी अडते
शब्दांचे ओठांशी अस्फुट नाते जडते.

—मुरलीधर कुळकर्णी

किती नाकारशील स्वतःला

किती नाकारशील स्वतःला
मरण्यापूर्वी विचकटून दात
कोण सांगेल केव्हा कुठे
श्वासांवर पडणार आहे थाप

किती नाकारशील स्वतःला
विकतांना स्वतःचाच अंधार
सहन करणार नाहीत एकदा तरी
तुझे पाय तुझा भार

किती नाकारशील स्वःतला
मृत्यूच्याही पुढे
तूच नसशील उचलायला
तुझ्या संपत्तीची हाडे.

—नीळकंठ महाजन

तीन कविता

— — (१) — —

जडावलेला अंधार ठीबकू लागला म्हणजे
रस्त्यावरच्या सुतकी दिव्यांचा
रुग्ण प्रकाश माझ्या खिडकीतून येतो सांगायला
एक दीर्घ कंटाळवाणी व्यथा.
शेवटच्या उच्छ्वासाच्या वेळी शरीर तापावं तसं
वातावरण थोडसं तापलं
म्हणजे घराभोवतालचा दरिद्री वारा येतो
भरभर धांवत कचरा घेऊन सांगायला.....
झोप झाल्याची जांभई येऊ लागली -
की कुणा बेवारशी कोंवडयाच्या ओरडण्याचा
घोगरा आवाज येतो
भेदून यंडावलेला काळोख सांगायला.....
गुदमरलेलं आकाश गळू लागलं
रडक्या, शेंबडया पोरा सारखं म्हणजे घाणीचे
उडालेले तुषार घाईघाईने तडफडत येतात
कुठून तरी सांगायला....
येणार आहे माझ्याकडे, रुग्ण प्रकाश, दरिद्री वारा,
घोगरा आवाज, घाणीचे तुषार सांगण्यासाठी
एक दीर्घ कंटाळवाणी व्यथा.

— — (२) — —

फुलतो आहे, बहरला आहे, डोलतो आहे
स्मशानातल्या कोपऱ्यात
धगीपासून दुर एकान्तात
उपेक्षिलेला दुर्लक्षीलेला एक निवडूंग.
कुणासाठी ?
कशासाठी ?
स्वतःसाठी तरी निश्चित नाही.
वर्षानुवर्षे पहातोय
आकाशाला भिडणाऱ्या आक्राळ ज्वाळा
एकापेक्षा एक असे मोठाले कवटींचे आवाज,
तेच सुतकी चेहरे आणि दबके शब्द--
"त्यांच्या निर्वाणाने पोकळी निर्माण झालीय"
"चारीत्र्य संपन्न आणि....."
चितेवर धडधडणाऱ्या प्रेता सारखेच
काळवंडलेली माणसं
हेच त्याचं जग.
इथे लोक का येतात ?
पोकळी...., चारीत्र्य....
याचा अर्थ त्याला कधी कळला नाही
पाहून कधी काळी तो रडला नाही, हसला नाही
स्थितप्रज्ञ !
पण सारे समजले, उमजले
जेव्हा पोळली गेली त्याची उमलती कळी
चितेतल्याच ठीणगीने. दुर्दैव.
नव्हता तेव्हा तो देखिल
पहायला धगधगणारी ज्वाळा
आसमंत दणाणणारे आवाज ऐकायला
होतं तिथे फक्त स्मशान
तिथे नव्हता कित्येक वर्षांचा
निवडूंग.

— — (३) — —

पाहिलय् मी तुला निरभ्र आकाशात
स्वच्छंदपणे संचारताना
दुर कुठेतरी माळावर
कधी संध्याकाळी गुणगुणताना.
गुणगुण समजली नाही
खुणा तर राहोच पण सागरा सारखे
अथांग तुझे हृदय
ते देखिल नाही.
तेजाळणाऱ्या सकाळी
सुवर्णमय प्रकाशात आडवाटेने स्वतःशीच हसत
लांबच लांब सावलीसह
माझ्या दाराशी येताना
तू अडखळला नाहीस ?
चल, आत ये !

--सूर्यकान्त भाबल

खिन्नता

आली खिन्नता मनास जावे कोठे ते कळेना
वाटे उदास उदास कोठे पाऊल वळेना
स्थिर दृष्टी एके ठाई नाही मना कुठे ठाव
दूर दूर स्वप्नातले गेले हरवून गाव
नको नको त्याच स्मृति आल्या पंख पसरून
झाली किलबोल आत पान पान थरारून
रातभर उरातच तांडा रहाणार आता
आणि ओसाड होईल सारे सोडूनिया जाता !

—वसंत पंडित बागूल

समाप्ति

शिखर
उंचच उंच.

पायपीट
कंटाळवाणी.

मोजमाप
निरर्थक.

समाप्ति
अर्ध्यावरच.

—विजयकुमार पवार

माऊले !

धरा काटेरी अवघी
नभ दुःखाळ दुःखाळ
अश्रू सदाचे पाहुणे
इथे व्यथांचा सुकाळ

घास कोरडे गिळण्या
किती सायास माऊले !
तुझे हुंदके गहाण
'नाही कणव कोणाले'

एका मडक्याच्या तळी
तुझ्या आशांची लक्तरें
चिंब दारिद्र्याची उशी
पाठी शिव्यांची लेकुरें

कसे सावरिशी जिणे
ठेचा पावलांगणिक
जीर्ण झोळीत वाहशी
उभ्या आयुष्याची भीक

—डब्ल्यू. कपूर

मी आण घेतली रे

मी आण घेतली रे त्या धुंदल्या क्षणाची
सांगू नको कहाणी आता युगायुगांची ।।
आता पुरेत सारे हे रेशमी बहाणे
त्या धुंद सायलीचे लज्जेमधे नहाणे
घालू नको उखाणे तू थोर सत्यसाची ।।
विषही बने सुधा रे जेव्हा अतीत होते
हे विश्व सर्व माझे तरि मी पल्याड उरते
का केतकीस बाधा होईल पन्नगाची ।।
भरतीस थांबवोनी मिटतील काय लाटा
का मखमली तृणाने बुजतील पायवाटा
कमला कधी पडे का रे भूल चांदण्याची ।।
या धुंदल्या झऱ्याने गाण्यात गुंग व्हावे
वेड्यावल्या घरेने की श्रावणात न्हावे
तैशीच साजणा रे झाली स्थिती मनाची ।।

—उषा लिमये

गौतमा

यशोधरा निद्रिस्त होती,
राहुलाला कुशींत घेऊन–
तूं मात्र जागा होतास
विचारांचे काहूर, म्हणून !
निर्बलांची क्रूर हत्या
सारेच डोळे पहात होते
तुझी कथा वेगळी गौतमा,
तुझे डोळे वहात होते–
सुख प्राप्तीच्या शर्यतींत,
धुंद मानव धावत होता
मानव मूल्यें अविचाराने
पायांखाली तुडवित होता
तीच व्यथा उरीं वाळगून
अंतर्मुख तूं झाला

चुकलेल्या मानवांना,
बुद्ध मार्ग तूं दिला
आजही यशोधरा
कीर्तीच्या निद्रेंत आहे
अज्ञानाचा राहूल,
तिच्या कुशींत स्वस्थ आहे
तेव्हां होतें तसेंच आहे,
रंगरूप जरा बदलून
तीच शर्यत, तोच मानव
तीच धूंदी जरा वाढवून
गौतमा तूं हवा आहेस,
तीच व्यथा उरीं घेऊन
तेव्हांच पालटेल हा देखावा,
येशील जेव्हां बुद्ध होऊन

—आशा खोत

शून्य

सारं सारं खरं आहे–
तरी एकुण एक खोटं आहे
खऱ्या खोटयाच्या अभिजात सीमाच
जिथे लोप पावतात
अर्थात् शून्याच्या हिंवळत्या कडीवरच
बांधायचय् आपलं इवलसं घरटं
आणि वेडावत राहायचं शून्यालाच
तळघात कि मळघात
तळघात कि मळघात !

उशीर

सुगंधाची झारी घेऊन मी उभे होते तुझ्या अंगणात–
सिंचन करायला

जिथे माझी स्वप्नवेल तरारून बहरली असती

पण लक्षात आलं – मला खूप उशीर झालाय

त्याच मातीनं लिंपुन टाकले झारीचे

सारे डोळे – आणि परत फिरले

दूऽऽऽर दूऽऽऽर खूप दूऽऽऽर

—कुंदा केकरे

अनुक्रमणिका

व्यंकटेश शंकर वकील

यादव मुकुंद पाठक

मे २८ ला व्यंकटेश वकीलांचा मृत्यु झाला. हे वृत्त कळताच मी त्यांच्यावर 'व्यक्ति आणि कार्य' वजा एक स्फुट 'तरुण भारता'त लिहिले व त्यांच्या 'उत्कंठा' या कवितेतील एक वेचाही तिथेच प्रसिद्ध केला. २६ जूनला विदर्भ साहित्य संघात व्यंकटेश वकीलांवर एक शोक सभा घेण्यात आली. त्यांत डॉ. आष्टीकर, मी आणि आप्पासाहेब देशपांडे बोललो. नागपूरच्या वृत्तपत्रात त्या शोकसभेची बातमी आली पण शोकसभेचा वृत्तांत कुणी दिला नाही. आप्पासाहेबांचा व डॉ. आष्टीकरांचा खूप आग्रह की मी एक लहानसा लेख 'युगवाणी'त लिहावा, म्हणून हा प्रपंच.

व्यंकटेश उर्फ बाबा मला प्रथम १९२६ त फर्ग्युसन कॉलेजात भेटला. त्याच्या कविता मला आवडल्या. मी 'विहंगम-वृंद' म्हणून एक मंडळ स्थापन केले व एक 'पिंपळपान' म्हणून काव्यसंग्रह प्रकाशित केला. त्यातील वकीलांच्या कवितांनीही समीक्षकांची मने आकर्षित केली होती. त्यांची 'पोर ग मुलखाची लाजरी' ही कविता पुण्याच्या मुलींच्या तोंडी कधी कधी ऐकावयास मिळे. फर्ग्युसन कॉलेजच्या एका मासिकाच्या अंकात माझी 'राजा-राणी' ही गोष्ट व व ती संपताच खाली वकीलांची एक अवखळ कविता छापून आली होती. माधव ज्यूलियनच्या एका "पुला-जवळच्या वळणावरती" या कवितेचे ते मार्मिक विडंबन होते. मुलींच्या वसतीगृहाजवळ असलेल्या कालव्याच्या काठावरील निमुळत्या पायवाटेवर एक मुलगी उभी आहे आणि कवि तिला माझी वाट सोड म्हणून विनंती करीत आहे, अशी ती एक पात्री आळवणी होती. अखेर इतके काव्यातून आर्जवे करूनही ती हटे ना तेव्हा कवीने शेवटी चार ओळी लिहून कवितेची समाप्ती केली ती अशी --

शिंगे रोखुनी उभि एक म्हैस
ये आड मार्गी नच देइ पैस
काव्यात तीते अळवोनि थकलो
निराश हृदये परतोनि गेलो.

ही कविता तेव्हा पुण्यात फारच लोकप्रिय झाली होती. लकडी पुलावरून मी व वकील सायंकाळचे चाललो होतो. तो सायकलवरून अत्रे उतरले व वकीलांना म्हणाले, "पोरा, तू मला नवी स्फूर्ति दिलीस रे. तू माझा गुरु आहेस .. तुझ्या कवितांसारखी अनेक विडंबने मी लिहितोय हल्ली." पुढे अत्र्यांचा "झेंडूची फुले" हा विडंबनांचा संग्रह प्रसिद्ध झाला त्याची एक प्रत त्यांनी वकीलांना भेट दिली.

"पिंपळपान" हा वैदर्भीय कवींचा गाजलेला पहिला कविता संग्रह. पुढे "विदर्भ-वीणा" हा समृद्ध संग्रह प्रसिद्ध झाला. त्यातील वकीलांच्या कवितेने रसिकांची मने आकर्षून घेतली.

" जीवन केवळ नाही आशा
जीवन केवळ नसे निराशा
काटेरी बन-
कळी हसे पण !
जीवन-अश्रुफुले."

ही कविता आजही मान्यता-प्राप्त आहे. "वागीश्वरी" मासिकात वकीलांच्या काही चांगल्या कविता प्रसिद्ध झाल्या. तेव्हाची 'यक्षकन्या' ही उत्तम कविता आहे. वागीश्वरीतील 'संजीवन' या क्रांतिकारी कवितेमुळे वागीश्वरीकडून जामीन मागण्यात आला, इतकी ती कविता इंग्रजांच्या राज्यात ज्वलत्-जहाल वाटली. मुक्तच्छंदाच्या रचनेत वकीलांचा मुक्तच्छंदही वा. ना. देशपांडे यांच्या आवडीचा होता. अशा या उत्तम कवीच्या कवितांचा काव्यसंग्रह मात्र निघाला नाही.

पुढे वकीलांनी अनेक कथा लिहिल्या. त्यांचा पहिला संग्रह "अश्रुफुले" म्हणून प्रसिद्ध झाला. नंतर "नव्या ज्योती" हा त्यांच्या एकांकिकांचा संग्रह प्रकाशित

झाला. ही दोन्ही पुस्तके त्यांनी मजकडे पाठवली व 'विहंगम' मासिकातील पुस्तकपरीक्षणातून मी त्यांचा यथोचित गौरव केला.

अनेक स्थळी, अनेक शाळाकॉलेजातून शिक्षण घेऊन वकीलांनी शिक्षक, संपादक, तात्पुरते सरकारी नोकर, वगैरे अनेक क्षेत्रात जीवन-व्यवसाय चालवला. मोठ्या पदावर जाण्याचे ते टाळत असत. १९३५त आजच्या भारत महिला विद्यालयाचा आरंभ मी महाल-मधील खरे वाड्यात केला. त्याच वेळी माझे संबंध वर्ध्याच्या नॅशनल कॉलेजशी गुंतले होते. मी प्राध्यापक म्हणून तिथे जायचे ठरविल्यावर व्यंकटेश वकीलांना मी काढलेल्या शाळेची सूत्रे हाती घेण्यास सांगितली. त्यांनी शिक्षक व्हायचे कबूल केले पण सूत्रचालकत्व नाकारले. अखेर सोनूताई सुळे यांनी सुळे कन्या शाळा म्हणून ती चालविण्याचे कबूल केले व पांडे यांची मुख्याध्यापक म्हणून नियुक्ती केली. वकीलातील साहित्यिकाला अधिकारलालसा नव्हती.

गेल्या तीस वर्षांपासून तरी त्यांचे वास्तव्य मुंबईला होते. त्यांचा '८, लक्ष्मी नारायण बिल्डिंग, तेजपाल ट्रस्ट, मुंबई ७' हा ग्वालिया टँक जवळचा ब्लॉक आज तीस वर्षे तरी त्यांच्या ताब्यात आहे. इथेच ते आपल्या संसारात रमले आणि मुलामुलींनी त्यांचे घर भरले. त्यांची एक लाडकी कन्या शोभा कलानिपुण नटी म्हणून विख्यात झाली. अमृत फार्मसीचे औषधकारखानदार श्री. प्रधान यांची ती स्नुषा झाली. मुंबईचा कारभार त्यांच्या कर्तृत्ववान पत्नीने फार चांगल्या रीतीने सांभाळला.

हा संसार चालवतांना त्यांनी अर्थार्जनाकरिता आपल्या लेखणीचा व कलेचा उपयोग केला. मुंबईला त्यांनी जवळ जवळ १०० पुस्तके लिहिली. १९६० पर्यंतच्या त्यांच्या पुस्तकांची यादी शेवटी जोडली आहे. त्यावरून त्यांनी साहित्याची निरलस सेवा केली हे दिसून येईल. १९६० साली त्यांनी 'संतोष प्रकाशन' म्हणून संस्था काढून नाटिकांचे संग्रह प्रकाशित केले.

वकीलांच्या 'नव्या ज्योती' या एकांकिका व 'जन्माचे सोबती' हे नाटक रसिकाग्रणी प्रा. वनहट्टी यांना दर्जेदार अभिजात साहित्य-कृती वाटत. स्फूर्तीच्या घगीतून उफाळून आलेली त्यांची कोणतीही कृती लक्ष-वेधी असेच, पण गरजेतून लिहाव्या लागलेल्या साहित्यात-ही त्यांची कलात्मकता व अभिजात साहित्याच्या लकबी प्रकट होत. १९३८ साली काँग्रेस सरकारने वर्धा जिल्ह्यात संपूर्ण दारुबंदीचा प्रयोग करताना वकीलांवर जिल्ह्याच्या प्रचाराचा भार सोपवला असावा. त्यावेळी लिहिलेल्या एकांकिका मुंबई, पुणे आकाशवाणी-वर पुढे गाजल्या व त्यांचे ध्वनिक्षेपण १९५८ व १९५९ साली पुन: पुन्हा झाले.

नागपूरच्या मध्यवर्ती वाचनालयाने विदर्भातील साहित्यिकांच्या पुस्तकांची सूची करण्याचे काम हाती घेतले आहे. शक्य ती पुस्तकेही मिळवून एका कक्षात सुरक्षित ठेवण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे.

वकील वर्ध्याच्या शालेय जीवनापासूनच समाजा-तील सर्व थरात मिसळून अनुभव घेत. पुण्याला सुद्धा त्यांची ही समाज निरीक्षणाची समरसतेची वृत्ति कायम होती. मानवी जीवनाचे नेमके माधुर्य टिपूनच त्यांनी साहित्यात आदर्शाची उपासना व जोपासना केली. विद्यापीठातील उदयोन्मुख संशोधकांनी 'वकील व्यक्ति व कार्य' अशा सारखा प्रबंध लिहिला तर त्यांच्या वाङ्मयातील वैशिष्ट्ये, खोली आणि दर्जा यांचा नक्की अदमास घेता येईल. साहित्य-क्षेत्रातील प्रत्येक दालनात त्यांनी विपुल लेखन केले. म्हणूनच ज्ञानोपासकांना हे कळकळीचे आवाहन.

वकीलांनी लिहिलेली पुस्तके

नाटके : नवसाचा देव, भिमीची सवत, जन्माचे सोबती, सोन्याचा पिंजरा, आगरकर, सूडाचा संदेश.

एकांकिकांचे संग्रह : नव्या ज्योती, जळती घरे, तीन घटका, चकवा, मायलेकी.

लघुकथांचे संग्रह : अश्रुफुले, धूमकेतू, तृणांकुर, तिसरे सत्य, गप्पाष्टके.

संकीर्ण : विशाल संसार, नेते आणि नियंते, जनता साहित्य, आपले अण्णा.

रहस्यकथा : वकिलांची करामत, वहिनीसाहेबांचे रहस्य, भीषण कडेलोट, रक्तरंगी अत्तर, टॅक्सीतील तरुणी, छोटूची करामत.

कादंबरी : विटाळलेला देव, व्याकरणशुद्ध प्रेम, वरदान.

अनुवादित साहित्य :

कादंबरी : श्रावणातले खेडे, माती, सूर्यातळी अंधार, दोन विघे जमीन, सुप्रभात, विराट.

कथा व्होल्गा ते गंगा, वाहुला नवरा, कथा-निकेतन, तेनालीराम, आणि लोककथांचे पंधरा संग्रह.

नाटके : व्हेनिसचा सौदागर, दोन विघे जमीन, देव जागा झाला, मन्याची मावशी, सारेच सज्जन, नंदिनी, प्राणेश्वरी, तपती.

एकांकिका : काळे मांजर.

संकीर्ण : थोरोंचे वाल्डेन, इमर्सनचे निवडक साहित्य, गरुड आणि आस्वल, नेहरू-एक अध्ययन, अहिंसा दर्शन, सत्याचे प्रयोग, उदारमतवादी लोकशाही, जागतिक राजकारण आणि लोकशाही, सर्व नागरिकांना हाक, आव्हान, विजयाची पताका, एक साहसी योजना, शिवाय तुलसी रामायणाचे आठ भाग.

आपण हे करू शकाल !

ग्रंथ सहाय्य : आपल्याजवळ दुर्मिळ ग्रंथ किंवा विदर्भातील जुन्या दिवगंत मान्यवर साहित्यिकांचे ग्रंथ असतील तर वि. सा. संघाच्या श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालयाला आपण देणगी म्हणून द्यावे. संघाचे अधिकारी वा सेवक आपल्याशी संपर्क साधून ग्रंथ आणवून घेण्याची व्यवस्था करतील.

अनुक्रमणिका

रसिक पत्रे

डॉ मधुकर आष्टीकर यांना स. न. वि. वि.

" आपण संपादिलेला युगवाणीचा श्री ज्ञानेश्वर विशषाङ्क अनेक बाबतीत वैशिष्टयपूर्ण आहे. श्री. बहिरट, श्री. म. रा. जोशी, श्री. देवीसिंह चौहान इत्यादिकांच्या लेखांनी अंकाचे संशोधनपर अंग साकारले असून, ओवीबद्ध संपादकीय, माझा ज्ञानियांचा राजा, घनु वाजे घुणा घुणा इत्यादि लेखांनी अंकाला लालित्य आणले आहे. प्रो. बाबगांवकर यांनी प्रसिद्ध केलेले चांगदेव पासष्टीचे हस्तलिखित फार मोलाचे आहे. आणि प्रो. श्री. ना. बनहट्टी यांचा लेख प्रसिद्ध करून आपण युगवाणीला प्रतिष्ठा आणण्यावरोबरच त्यांच्या विषयी आदरभाव व्यक्त केला हे औचित्यपूर्ण आहे. अंकातील प्रत्येक लेख आपापल्या परी तोलाचा असल्यामुळे ज्ञानेश्वरांच्या अभ्यासाकरिता अंक फार उपयोगी झाला आहे. युगवाणीचा हा अंक पाहून वा. ना. देशपांडयांच्या संपादनकालातील युगवाणीचे स्मरण होते.

या अंकाची पुरवणी म्हणून अचलपूर संमेलनातील आपले अध्यक्षीय भाषण प्रसिद्ध झाले आहे. विदर्भ साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावरून जी अनेक पहिल्या प्रतीची अध्यक्षीय भाषणे झाली त्यांत या भाषणाची गणना व्हावी. आजवर आपला लौकिक ललित लेखक म्हणून होता; या भाषणाने आपले शास्त्रपटुता आणि परामर्शक्षमता हे विशेष प्रकाशात आले आहेत. साहित्य निर्मितीच्या मूलभूत प्रेरणा आणि सिद्धान्त यांच्या प्रकाशात आपण केलेला वर्तमान मराठी ललित वाङमयाचा परामर्श आणि लेखकांना केलेल्या काही मोलाच्या सूचना, हे या भाषणातील काही विशेष आहेत. सर्व विवेचन शास्त्रीय असूनहि आपण आपल्या ललित शैलीने त्याला मार्दव आणले आहे. "शास्त्रो प्रतिष्ठा सहजश्च बोधः प्रागल्भ्यमभ्यस्त गुणाच वाणी। कालानुरोधः प्रतिभानवत्त्वम्" — भवभूतीच्या या शब्दांची मला आपले भाषण वाचून आठवण झाली. आपल्या भाषणाला शास्त्राची प्रतिष्ठा आहे; पण त्याने येणारी दुर्बोधता नाही, ते सुबोध आहे; आपण प्रगल्भ विचार प्रवाही भाषेत मांडले आहेत; केवळ कोरडया तत्वचर्चेतच न रमता आपण तिचा वर्तमानाशी अनुबंध साधला आहे; आणि या सर्वांना ललित शैलीची जोड देण्यात आपली प्रतिमा आविष्कृत झाली आहे.

ज्ञानेश्वर विशेषाङ्काचे उत्तम संपादन आणि संमेलनातील उत्तम भाषण याबद्दल मी आपले मनःपूर्वक अभिनंदन करतो.

६-७-७६ आपला स्नेहशील

ग. त्र्यं. देशपांडे

संपादक 'युगवाणी'

यांस स. न. वि. वि.

आपर पाठविलेला एप्रिल – मे महिन्याचा युगवाणीचा जोड अंक मिळाला. आभारी आहे.

गंभीर विषयावरील विवेचक लेखांमुळे अंक भारदस्त झाला आहे. आपल्या संपादकत्वाखाली डिसें. जानेवारीं पासून निघालेले सगळेच अंक भारदस्त आणि विचारांना चालना देणारे निघाले आहेत. अलीकडे हलके फुलके वाचण्याकडे बहुतांश वाचकांची प्रवृत्ती असते अशा वाचकातील कांहीना तरी गंभीर विषयावरील लेखन वाचण्याची सवय युगवाणीचे अंक वाचून झाली तरी ती आपल्या संपादनाची योग्य फलश्रुतीच म्हणावी लागेल. कळावे

२७-६-७६ आपला

गुणवंत हनुमंत देशपांडे

वाटखेड बु ।। जि. यवतमाळ

स. न. वि. वि.

युगवाणीचा ज्ञानेश्वरी विशेषाङ्क आपल्या वैशिष्टयाने रसिकांचा आवडता ठरावा. इथे महिला मंडळात त्याचे सामुदायिक वाचन झाले. महिला विशेषाङ्क तर महिला सदस्यांनी घरोघरी नेऊन वाचला. आपल्या संपादकत्वाखाली निघणारे अंक भरीव आणि सदभिरुचिसंपन्न असतात. पण आपण मुंबईतील महिला लेखिकांना स्थान का देत नाही ? बऱ्याच महिलांचे लेख परत आले. महिला विशेषाङ्क अधिक पानांचा केला असता तर त्यांना स्थान मिळाले असते. पुढे कधीतरी वाव द्यावा. हार्दिक अभिनंदन !

सुषमा घैसास

मुंबई

विदर्भ साहित्य संघ

कार्यवृत्त

(१ जून १९७६ ते १५ जुलै १९७६)

गो. स. वेहाडराय, सरचिटणीस

१. कार्यालय व्यवस्थापन :

१.१. कार्यकारी मंडळाची सोळावी सभा दि. १३ जून १९७६ ला झाली.

१.२. या सभेत १९७६–७७ सालच्या जमाखर्चाला मान्यता देण्यात आली.

१.३. तसेच, नागपूरचे चिटणीस व युगवाणी मासिकाचे कार्यकारी संपादक श्री. वसंत खेरडीकर हे बदली होऊन, नागपूर सोडून बुलढाण्याला गेल्यामुळे त्यांच्या जागी का. का. चे सदस्य श्री. ग. स. देशपांडे यांची नागपूरचे चिटणीस व दुसरे सदस्य डॉ. वि. बा. प्रभुदेसाई यांची युगवाणीचे कार्यकारी संपादक म्हणून नियुक्ती करण्यात आली. सौ. सुमतीबाई धनवटे ह्यांनी आपण बहुतांशी मुंबई मुक्कामी वास्तव्य करीत असल्यामुळे कार्यकारी मंडळाच्या सभांना उपस्थित राहू शकत नसल्याचे कळवून त्यागपत्र दिले. त्यांच्या रिक्त झालेल्या जागी डॉ. प्रा. सौ. शकुंतलाबाई खोत यांची नियुक्ती करण्यात आली.

२. सांस्कृतिक कार्यक्रम

२.१. दि. ११-६-७६ ला सानेगुरुजी स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करण्यात आली.

२.२. दि. १२-६-७६ ला नाटयसमितीने गतवर्षी आयोजिलेल्या बालनाटय स्पर्धा, कै. डावरे एकांकिका स्पर्धा व खोलकुटे आंतर महाविद्यालयीन नाटय ढाल स्पर्धा यातील यशस्वी नाटय-संस्थांना व कलावंतांना; त्याचप्रमाणे परीक्षा समितीने आयोजित केलेल्या मराठी भाषेच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षात प्रथमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिकांचे वितरण नागपूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. बलराज अहेर यांच्या हस्ते झाले.

२.३. दि. २०-६-७६ ला महाराष्ट्राचे गृहउपमंत्री नामदार श्री. बाबूराव काळे यांचा व नागपुरातील वयोवृद्ध स्वातंत्र्य सैनिक व आदर्श शिक्षक श्री. हरिभाऊ पत्तरकिने यांच्या ८१ व्या वाढदिवसा-निमित्ताने त्यांचा नागपूर नागरिक सत्कार समितीतर्फे मोर भवन मध्ये सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता, त्या प्रसंगी वि. सा. संघातर्फे या दोघा माननीय व्यक्तींना पुष्पहार अर्पण करण्यात आले.

२.४. ख्यातनाम कवी प्रा. या. मु. पाठक यांनी बहात्तराव्या वर्षात पदार्पण केले. त्यानिमित्त दि. २७ जूनला सायंकाळी ६–३० वाजता श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांच्या अध्यक्षते-खाली त्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. माणिक बेतुले, श्री. रेवतकर, श्री. त्रि गो. देशमुख यांची गुणगौरवपर भाषणे झाली.

२.५. दि. २८ जूनला सुप्रसिद्ध जादूगार श्री. के. लाल यांचा सत्कार करण्यात आला. त्यांनी भाषणाचे शेवटी संघाला २५१ रु. ची देणगी देण्याचे जाहीर केले. त्याबद्दल संघ त्यांचा ऋणी आहे.

२.६. मुंबई नगराचे भूतपूर्व शेरीफ श्री. जनार्दन गणपत बोधे यांनी २-७-७६ ला सायंकाळी ६–३० वाजता वि. सा. संघाला भेट दिली. या प्रसंगी त्यांचे "माघे सन्ति त्रयोगुणः" या विषयावर सुश्राव्य व अभ्यासपूर्ण भाषण झाले. श्री. बोधे यांनी संस्कृत मधील पाच महाकाव्यांचे सोदाहरण रसग्रहण आपल्या भाषणात केले. डॉ. ग. त्र्यं. देशपांडे, डॉ. वि. भि कोलते, प्रा. म. श्री. पंडित व डॉ. के. रा. जोशी प्रभृती पंडितांची उपस्थिती हे या कार्यक्रमाचे वैशिष्टय होते. डॉ. मधुकर आष्टीकर यांनी आभार मानले.

३. शोकसभा :

सुप्रसिद्ध लघुकथा लेखक, नाटककार व कवी व्यंकटेश शंकर वकील यांच्या दुःखद निधनानिमित्त दि. २६ जूनला सायंकाळी ६-३० वाजता श्री. आ. रा. देशपांडे 'अनिल' यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा आयोजित करण्यात आली. प्रा. या. मु. पाठक, डॉ. मधुकर आष्टीकर, श्री. आ. रा. देशपांडे यांची याप्रसंगी भाषणे झाली. सभेच्या शेवटी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून शोकसंवेदना व्यक्त केली.

४. श्री शिवाजी संदर्भ ग्रंथालय :

१२ जून ७६ पासून नवीन अभ्यासत्र सुरू झाले.

५. नाटयसमिती

५.१. नाटयप्रयोग : नाटयसमितीने श्री. गजानन उपाध्य बाळ पांडे लिखित व श्री. देवाशिस रॉय दिग्दर्शित 'शतकावली' या नाटकाचा प्रयोग दि. ४-६-७६ ला सादर केला.

५.२. महिला एकांकिका स्पर्धा : या वर्षी महिला एकांकिका स्पर्धा हा अभिनव उपक्रम प्रथमच आयोजित करण्यात आला. या स्पर्धेतील एकांकिकेचे प्रयोग दि. ३ जुलै ते ७ जुलै पर्यंत धनवटे रंगमंदिरात सादर करण्यात आले. स्पर्धेत एकूण दहा महिला नाटयसंस्थांनी भाग घेतला आणि प्रयोगात ७८ स्त्री कलावंत होते. दि. ३ जुलैला सायंकाळी ६ वाजता सुप्रसिद्ध अभिनेत्री सौ. सुधा करमरकर यांनी महिला एकांकिका स्पर्धेचे उद्घाटन केले. शेवटच्या एकांकिके नंतर ७ जुलैला स्पर्धेचा निकाल घोषित करण्यात आला. तो असा :– प्रथम क्रमांक– हर्षे महिला समाज, नागपूर "माया"; द्वितीय क्रमांक – नवरंग, नागपूर 'बायकात पुरुष लांबोडा'; तृतीय क्रमांक– कलातरंग, नागपूर 'नळ आला रे आला'. अभिनयाचे गुणवत्ता पारितोषिक क्रमांक (१)कु. शुभदा खरे – नवरंग 'बायकात पुरुष लांबोडा' यातील पेडकरची भूमिका. (२)कु. संध्या अहेर – कलातरंग 'नळ आला रे आला' यातील वैजयंतीची भूमिका. (३) सौ. वंदना सप्रे – रामनगर महिला मंडळ 'मद्रासीने केला मराठी भ्रतार' यातील किशनची भूमिका. दिग्दर्शनाच्या पारितोषिकांचे क्रमांक (१) डॉ. सौ. माधवी चोरघडे 'माया', (२) सौ. मंजूषा वेलणकर 'बायकात पुरुष लांबोडा'. एकांकिका लेखनाचे पारितोषिक डॉ. सौ. माधवी चोरघडे 'माया' एकांकिके बद्दल.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून प्रा. ज. रा. फणसाळकर, प्रा. प्रभाकर चांदेकर व श्री. रमेश अंभईकर यांनी काम केले. या साऱ्या एकांकिका वि. सा. संघाचे सभासदांकरिता निःशुल्क होत्या. प्रयोगांना प्रेक्षकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. याप्रसंगी उत्कर्ष कला मंदिराच्या स्मरणार्थ

महिला एकांकिका स्पर्धेत प्रथम क्रमांक प्राप्त करणाऱ्या संस्थेला देण्यासाठी श्री. हरीश जानेफळकरांतर्फे फिरती ढाल वि. सा. संघाला देण्यात आली. तसेच सौ. ज्योत्स्ना धर्माधिकारी यांनी श्रीमती मनोरमाबाई पोतदार यांच्या स्मरणार्थ महिला एकांकिकेत प्रथम क्रमांकाला रु. ५१ चे रोख पारितोषिक दिले. विदर्भ साहित्य संघ सर्व साहाय्यकांचा आभारी आहे.

६. नवीन आजीव सभासद :

श्री. प्रभाकर रामचंद्र मुंडले, नागपूर; श्री. गो. ह. उपाध्य काकासाहेब पुराणिक, नागपूर; सौ. मेधाविनी मधुकर आप्टीकर, नागपूर; डॉ. वामन शिवदास बार्लिंगे, नागपूर.

७. शाखावृत्त:

७.१. **वणी :** शाखेची सर्व साधारण सभा दि. ३ जुलैला शाखाध्यक्ष श्री. नानाजी भागवत यांच्या अध्यक्षतेखाली झाली. त्यात कार्यकारिणी निवडून आली ती अशी :– अध्यक्ष – श्री माधव गं. सरपटवार, उपाध्यक्ष – सौ. विजयाताई पाटील व श्री. पु. मा. रेभे, सरचिटणीस – श्री. वामन ठाकरे, चिटणीस – सर्वश्री गौतम सुत्रावे व ना. ब. कावडकर; सदस्य – प्राचार्य राम शेवाळकर, प्रा. शां. सो. कवडे, सर्वश्री म. ना. राजूरकर, के. ना. काटपातळ, ना. मा. सरपटवार, ना. रा. भागवत, क. रा. अय्यंगार, बा. झा. कांवळे.

७.२. इतर शाखांचे वृत्त हाती आले नाही.

साभार पोच

[दि० १६–५–७६ ते १५–७–७६ पर्यंत युगवाणीला भेट म्हणून आलेली पुस्तके :]

साहित्य साधना प्रकाशन, औरंगपुरा, औरंगाबाद

शिवाची वाडी : महावीर जोंधळे, मूल्य रु. ३.५०, पृष्ठसंख्या ६४.

शब्दुली : प्रकाश कामतीकर, मूल्य रु. १२, पृष्ठसंख्या १३५.

पॉप्युलर प्रकाशन, ३५ सी ताडदेव रोड, मुंबई ३४

कस्तुरी मृग : वसंत कानेटकर, मूल्य रु. ८, पृष्ठसंख्या ७६.

गतीमानी : द. ग. गोडसे, मूल्य रु. १२ पृष्ठसंख्या २ + ८०.

मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४

आदिकथा : दि. बा. मोकाशी, मूल्य रु. १५ पृ. सं. १५६.

एरिअल आणि पोरकं पाखरू : अनिल डांगे मूल्य रु. १५, पृ. सं. १६०.

अभिनव प्रकाशन, ५३, गुरुनानक मार्केट, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४

ग्रह आणि आग्रह : वसंत शिरवाडकर, मूल्य रु. १२, पृ. सं. १४८.

मृगया शरदिनी महाडेश्वर, मूल्य रु. ४, पृ. सं. ८३.

महानदीच्या तीरावर : दुर्गा भागवत, मूल्य रु. ५ पृ. सं. ६३.

तणावा : राजा मुकुंद, मूल्य रु. ५, पृ. सं. ७०.

जेव्हा मी जात चोरली होती बाबुराव बागुल, मूल्य रु. १२, पृ. सं. १५६.

शापित वात्सल्य : का. म. आव्हाड, मूल्य रु. ५; पृष्ठ संख्या ६६.

बारा भाषणे : श्रीपाद अमृत डांगे, मूल्य रु. १५, पृ. सं. २०७.

तामीळनाडचे संगमकालीन सुवर्णयुग : वि. वा. जोग व ज. सा. देशपांडे, मूल्य रु. ८, पृ. सं. १०+१३१

प्रजापतो ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, पांडव भवन, माऊंट आबू, (राजस्थान)

दिव्य गुणांचा पुष्प गुच्छ : मूल्य दिले नाही. पृ. सं. २५६.

साप्ताहिक पाठयक्रम मूल्य दिले नाही, पृ. सं. २३२.

राजयोग से शक्तिया मूल्य दिले नाही. पृ. सं. ३६०.

मनाची शांती : मूल्य दिले नाही. पृ. सं. ३२.

श्रीकल्याण सेवक प्रकाशन मंदिर, संकेश्वर, बेळगाव.

सचित्र गीतश्री : रंगनाथ ना. जोशी, मूल्य रु. ३, पृ. सं. ६ + ४८

कल्याण सेवक : बाळ नंदलाल, मूल्य रु. ३, पृ. सं. ११४.

भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

समाजशास्त्र परिभाषा कोश : मूल्य नाही, पृ. सं. १०७.

रसायनशास्त्र परिभाषा कोश मूल्य ९५ पैसे पृ. सं. ५०.

ग्रंथालय परिभाषा कोश मूल्य नाही, पृ. सं. ३५

गणितशास्त्र परिभाषा कोश : ,, ,, , पृ. सं. ११५

वाणिज्यशास्त्र परिभाषा कोश : मूल्य रु. ३.४५, पृ. सं. २२९

तत्वज्ञान व तर्कशास्त्र परिभाषा कोश : मूल्य ३० पैसे, पृ. सं. १३.

इतर प्रकाशने

श्रीराम रक्षा स्तोत्रम: श्रीगणपत्यथर्व शीर्ष: व पसायदान लेखक व प्रकाशक गो. ह. पुराणिक, रुईकर पथ, नागपूर. अनुक्रमे मूल्य ३५ पैसे पृ. सं. ४८; मूल्य नाही, पृ. सं. २५; व मूल्य नाही पृ. सं. ६.

सांगता : राम देशमुख, श्रीवत्स प्रकाशन, वणी; मूल्य रु. ५, पृ. सं. ८८.

सुगंध : के. एन्. नांदूरकर, मंगल प्रकाशन, नशिराबाद जि० जळगाव; मूल्य रु. ४ पृ. सं. ३४.

ऋतुरंग : राम पंडित, कालचक्र प्रकाशन, टिळकपथ, औरंगाबाद; मूल्य रु. ६, पृ. सं. ६६.

धुंद किनारा : वि. सो. निंबाळे, रवींद्र प्रकाशन, रे. ला. रे. क्वा. ३।६४, सोलापूर १; मूल्य रु. २ पृ. सं. ३२.

संशोधन साधना : डॉ. वसंत जोशी, प्राज्ञ पाठशाळा मंडळ, वाई जि. सातारा; मूल्य रु. १२, पृ. सं. १८४+५

सुरुंग त्र्यंबक सपकाळे, अस्मितादर्श प्रकाशन, ३७, लक्ष्मी कॉलनी, छावणी, औरंगाबाद; मूल्य रु. ७ पृ. सं. ६ + ४७.

श्रीकृष्ण जीवन दर्शन पांडुरंगशास्त्री आठवले यांची प्रवचने, सद्विचार दर्शन ट्रस्ट, मुंबई ४; मूल्य रु. ९ पृ. सं. २४ + ३७५.